# ज्ञान प्रबोधिनी

॥ राष्ट्रदेवा: भवेम ॥

## वार्षिक वृत्त २०१७-१८

सौर शके १९३९-४० (इ.स. २०१७-१८)
(दि. १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८)



## क्षणचित्रे:



▲ गुहिणी येथील विहिरीचे नूतनीकरण



▲ फेरोसिमेंट टाकी, पाणी साठवण टाकीचा वेल्हे तालुक्यातील पहिला प्रयोग




▲ शेनवड (ता. वेल्हे) येथील ग्रामस्थांतर्फे पर्सिस्टंट फौंडेशनच्या सोनाली देशपांडे यांचा सत्कार




▲ रंगत-संगत प्रतिष्ठान तर्फे आयोजित पाणी कविसंमेलनात प्रबोधिनीचे प्रतिनिधित्व करताना मध्यभागी सुनीता गायकवाड




▲ पाणी फौंडेशनच्या स्पर्धेत राज्य पातळीवर दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस स्वीकारताना जायभायवाडीकर, ता. धारूर, जि. बीड




▲ समाजदर्शन उपक्रमात वारीत सहभागी झालेल्या सोलापूर ज्ञान प्रबोधिनीच्या विद्यार्थिनी

## क्षणचित्रे:



▲ विवेक इन्सपायर प्रकल्प, इटानगर आणि रोईंग, अरुणाचल प्रदेश






▶ साळुंब्रे येथील तंत्रशिक्षण विभागाच्या इमारतीचे उद्घाटन



▲ संगणक कक्षाचे उद्घाटन : मा. अरुणजी निगवेकर



▲ श्री. संतोष वैद्य (IAS, AGMUT) यांची जागतिक बँकेत ज्येष्ठ सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या सत्काराचा पारिवारिक कार्यक्रम



◀ मा. यशवंतराव लेले यांचा गुरुतत्व पुरस्कार देऊन सन्मान






▲ पितांबरीचे मा. रवींद्र प्रभुदेसाई यांच्या हस्ते 'प्रकाशयात्री' पुरस्कार स्वीकारताना मा. प्रसाद चिक्षे

▲ आ. वा. ना. अभ्यंकर (भाऊ) यांना पद्मश्री अनुताई वाघ विशेष व्यक्ती पुरस्कार प्रदान



▲ मा. इरेश स्वामी यांच्या हस्ते 'जीवनगौरव' पुरस्कार स्वीकारताना मा. स्वर्णलता भिशीकर



▲"चिरवसंत स्मृतिवन" या स्मरणिकेचे प्रकाशन

**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ, पुणे – ४११ ०३०
☎:(०२०)२४२ ०७ ०००, (९१)(२०)२४४ ९१ ८०६
web : www.jnanaprabodhini.org
e-mail : contact@jnanaprabodhini.org

vrutta Cover photo 1.indd 4 31/08/2018 11:40:35 AM

# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

(सौर शके १९३९-४०)

दि.१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८


| | | |
|---|---|---|
| पत्ता | : | ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |
| दूरभाष क्र. | : | (०२०)२४२०७००० |
| फॅक्स | : | (९१)(२०)२४४९११८०६ |
| संकेत स्थळ | : | www.jnanaprabodhini.org |
| ई-मेल | : | contact@jnanaprabodhini.org |


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 1 31/08/2018 3:19:41 PM

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

**सन्माननीय सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **श्री. अण्णा हजारे** | – | सामाजिक कार्यकर्ते |
| **श्रीमती अनु आगा** | – | उद्योजिका |
| **डॉ. रघुनाथ माशेलकर** | – | माजी संचालक, CSIR, नवी दिल्ली |
| **डॉ. जयंत नारळीकर** | – | माजी संचालक, आयुका, पुणे |

**पदाधिकारी २०१८–२०२१**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | – | डॉ. रघुनाथ माशेलकर |
| **उपाध्यक्ष** | – | श्री. अण्णा हजारे<br>वा. विजय केळकर |
| **कार्याध्यक्ष** | – | श्री. श.बा तथा रवि पंडीत |
| **संचालक** | – | वा. गिरीश श्री. बापट |
| **कार्यवाह** | – | श्री. वि.शं./सुभाष देशपांडे |
| **सहकार्यवाह** | – | श्री. वि. ध. गुर्जर |

---

## ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ

**निर्वाचित सदस्य**

१. श्री. श. बा. तथा रवि पंडित
२. वाच. गिरीश श्री. बापट
३. प्रा. वि. शं./सुभाष देशपांडे
४. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर
५. प्रा. वा. ना. अभ्यंकर
६. श्री. रामकुमार राठी
७. श्री. मोहन चि. गुजराथी
८. वा. विवेक बा. कुलकर्णी
९. श्री. विवेक द. पोंक्षे
१०. वाच. सुधाताई कोठारी
११. श्री. महेश आठवले
१२. प्रा. महेन्द्र सेठिया
१३. श्री. मनोज देवळेकर
१४. वा. अनघाताई लवळेकर

**नियुक्त सदस्य**

१५. सौ. सुवर्णा गोखले
१६. सौ. सविताताई कुलकर्णी
१७. प्रा. मिलिंद नाईक
१८. श्री. प्रशांत दिवेकर
१९. श्री. आशुतोष बारमुख

---

▷ **मुख्य केंद्रे** : पुणे, निगडी, सोलापूर, हराळी (उस्मानाबाद)

▷ **उपकेंद्रे** :

| | | |
|---|---|---|
| पुणे केंद्र | : | शिवापूर, वेल्हे, |
| निगडी केंद्र | : | साळुंब्रे |
| पुणे केंद्र | : | शिरवळ (जिल्हा सातारा) |

▷ **विस्तार केंद्रे** : डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई (जिल्हा बीड)

▷ **ज्ञान प्रबोधिनीशी संलग्न विविध न्यास**

१) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२) ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३) ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४) ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था व
५) ग्राम प्रबोधिनी

या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.

# हितगुज

ज्ञान प्रबोधिनीचे सन २०१७-१८ या वर्षाचे वार्षिक वृत्त आपल्या हाती देताना आनंद होत आहे. प्रबोधिनीच्या कामामध्ये उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करता यावे यासाठी २०१२ ते २०२२ अशा दहा वर्षांचा भवितव्य लेख तयार केला होता, त्यातील दुसऱ्या टप्प्यातील हे शेवटचे वर्ष. या वर्षाच्या कार्यसंकल्पाची आखणी करताना सर्व केंद्रांनी व तेथील प्रत्येक विभागाने भवितव्य लेखाचा आढावा घेतला होता. त्यामुळे काही मागे पडलेली कामे वृत्तांत वर्षात मार्गी लावता आली. अर्थातच वृत्तान्त वर्षात चालून आलेल्या नव्या संधींचा लाभही विभागांनी घेतला.

वर्षभरात प्रबोधिनीतील ज्या व्यक्तींना आणि विभागांना विशेष पुरस्कार मिळाले यांचा एकत्रित उल्लेख सुरुवातीला केलेला आहे. त्यामध्ये, अंबाजोगाई विस्तार केंद्राने बीड जिल्ह्यातील पंधरा गावांमध्ये पाणी फौंडेशनच्या 'सत्यमेव जयते' या वॉटरकप स्पर्धेत जो भाग घेतला होता त्या गावांमधील पाच गावांनी एकूण रु. ९१.५० लक्षची बक्षिसे पटकावली, याचा विशेष आनंद होतो. या स्पर्धेच्या निमित्ताने खेड्यांमध्ये जे लोकसंघटनाचे काम झाले, गावकऱ्यांनी जे एकत्र होऊन पाणलोट क्षेत्रामध्ये श्रमदान केले त्याचे मोल विशेष आहे. 'रूप पालटू देशाचे' या प्रबोधिनीच्या उद्दिष्टानुसार पाण्याच्या उपलब्धतेमुळे या खेड्यांचा कायापालट होतो आहे हे नोंदविण्यास विशेष आनंद होतो.

पुण्यातील शिक्षणाच्या बाबतीत मनुष्यघडण हे उद्दिष्ट डोळ्यासमोर येऊन अनेक उपक्रम नित्याप्रमाणे चालू होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'अभिव्यक्ती' हा जो शैक्षणिक प्रयोग ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत सुरू आहे त्या संबंधीचा संशोधन निबंध फिनलंड येथे झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रशालेच्या प्राचार्यांनी सादर केला, याचीही विशेष नोंद घ्यावी लागेल.

मानसशास्त्रातील संशोधनामध्ये 'जीवनाची गुणवत्ता' या विषयावर सर्वांगीण आणि सखोल संशोधन करण्याच्या दृष्टीने प्रज्ञा मानस संशोधिकेने अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यांची वाटचाल सर्वांसमोर यावी या हेतूने एक राष्ट्रीय परिषद नोव्हें. २०१७ मध्ये घेण्यात आली.

प्रबोधिनीच्या शिक्षण प्रक्रियेचा लाभ महाराष्ट्रातील व अन्य राज्यांमधील विद्यार्थ्यांना व्हावा, ठिकठिकाणच्या उत्साही शिक्षकांना नवीन तंत्रज्ञानावर आधारित असे शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे, प्रकल्प पद्धतीतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची प्रेरणा वाढावी या हेतूने प्रबोधिनीचा शैक्षणिक उपक्रम संशोधिका हा विभाग काम करीत आहे. वृत्तान्त वर्षात विविध प्रांतांमधील २६३ शाळांनी यात सहभाग घेतला. आसाम व अरुणाचल प्रदेशातील विवेकानंद केंद्राच्या शाळांचा त्यात महत्त्वाचा सहभाग आहे. 'छोटे सायंटिस्ट्स्' हा केपीआयटी या उद्योगसमूहाच्या आर्थिक साहाय्यातून चालू असलेला उपक्रम अनेक ठिकाणी विस्तारला आहे. देशपातळीवर नीती आयोगाने त्याची दखल घेतली आहे. या प्रकारचे शिक्षण मुलांना मिळावे यासाठी सुरू झालेल्या अटल टिंकरिंग लॅब अशा उपक्रमाची निगडी येथील नवनगर विद्यालयात चांगली सुरुवात झाली आहे. छात्र प्रबोधन मासिकाच्या रौप्य महोत्सवाची या वर्षी सांगता झाली. त्यानिमित्त महाराष्ट्रातील ठिकठिकाणच्या वितरकांचे वैशिष्ट्यपूर्ण मेळावे गतवर्षात झाले.

महाविद्यालयीन शिक्षण प्रणालीमध्ये प्रबोधिनीची कार्यपद्धती वापरून पाहता यावी या हेतूने नेतृत्व संशोधन केंद्र २०१२ मध्ये सुरू झाले. जिज्ञासा व आकांक्षा या नावाने चालणाऱ्या सायंकालिन वर्गांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे. प्रशासकीय सेवेत जाऊ इच्छिणाऱ्यांबरोबरच सामाजिक क्षेत्रातील नेतृत्वाची वाट चोखाळणाऱ्या युवक-युवतींना नेतृत्व कौशल्याचे प्रशिक्षण देण्याचा हा प्रयोग यशस्वी होत आहे. राज्य व केन्द्र शासनाच्या स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीचे आपले मार्गदर्शन केंद्र नावाजले जाते आहे. सध्या शासकीय सेवेत असलेल्या अनेक अधिकाऱ्यांनी या केंद्रातील विद्यार्थ्यांशी हितगुज केले व त्यांचा हुरुप वाढविला. राज्य व देश पातळीवर या विद्यार्थ्यांचे जे अभ्यासदौरे झाले त्यातूनही प्रबोधिनीची भूमिका त्यांना उत्तरोत्तर कळत गेली.

उद्योग क्षेत्रामध्ये युवक-युवतींनी वाढत्या प्रमाणात पाऊल टाकावे यासाठी उद्योजकता विकास केन्द्राची २०१२ मध्ये सुरुवात झाली. नवउद्योजकांच्या सुप्त क्षमतांचा नेमका आलेख त्यांच्या डोळ्यासमोर यावा यासाठी Battery of Entrepreneurship Aptitude Measurement (BEAM) ही मानसशास्त्रीय चाचणी या वर्षी सिद्ध झाली व ती वापरण्यास सुरुवात झाली. पुण्यातील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स या प्रख्यात संस्थेबरोबर या संदर्भात साहचर्य सुरू झाले.

प्रबोधिनीतील अन्य अनेक उपक्रम विस्तारत आहेत. संस्कारविधींसाठी काम करणाऱ्या संत्रिका विभागाने विविध प्रकारचे सुमारे ७,००० संस्कार कार्यक्रम राज्यभरात केले. त्यातील काही परदेशातही झाले. विविध सामाजिक शास्त्रांचा एकात्मिक अभ्यास होण्यासाठी 'सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र' नव्याने सुरू केले आहे. अनेक मान्यवर वक्त्यांची यामध्ये व्याख्याने झाली.

ग्राम विकसन कार्यामध्ये सह्याद्रीच्या डोंगराळ भागात सुमारे पंधरा दुर्गम धनगर वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचे काम झाले. सौर ऊर्जेच्या आघाडीवर ३ ते ५ वॅटची पॅनल्स् तयार करण्याचे प्रशिक्षण प्रबोधिनीत दिले जाते. अशी


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 3 31/08/2018 3:19:41 PM

५०० पॅनल्स आता पूर्ण होऊन अंबाजोगाई व हराळी परिसरातील खेड्यांमध्ये त्यांची क्षेत्रचाचणी यंदा सुरू झाली.

'स्त्री शक्ती प्रबोधन' ही प्रबोधिनीच्या कामाची एक महत्त्वपूर्ण दिशा आहे. शहरांमध्ये व ग्रामीण भागामध्ये या दृष्टीने अनेक उपक्रम चालतात. पुणे जिल्ह्यातील हवेली, भोर व वेल्हे तालुक्यांमध्ये कात्रज ते शिरवळ या परिसरात ६५ गावांमध्ये बचतगटांचे काम चालते. त्यांची संख्या यंदा ३२० झाली. तो पाया मानून आरोग्य, स्वयंरोजगार व नेतृत्व शिक्षण असे उपक्रम सुरू केले आहेत. किशोरी व युवतींसाठी नऊ शाळा व तीन महाविद्यालये यात दर पंधरवड्यास एकदा तासिका होतात. प्रबोधिनीच्या विद्याव्रत या उपक्रमाचे ग्रामीण भागातही चांगले स्वागत होत आहे. बालवाड्या, नवमातांसाठी हिरकणी व निराधार महिलांसाठी एकल महिला असे प्रकल्प वाढत आहेत. वेल्हे येथील शोलय मुलींसाठीचा 'गिरीकन्या' सहनिवास व आंबवणे येथील 'जीवनज्योती प्रशिक्षण केंद्र' अशी दोन अधिष्ठाने या कामासाठी आता तयार झाली आहेत. शहरी भागामध्ये 'संवादिनी' या संघटनेच्या माध्यमातून 'ओळख स्पर्शाची' व 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना' अशा अतिशय महत्त्वपूर्ण विषयांवर विद्यार्थी-विद्यार्थिनी व पालक यांच्यासाठी अनेक कार्यशाळा महाराष्ट्रभरात आपण घेत आहोत. समतोल या मासिकाद्वारे विविध विषयांवरील जागृती केली जाते. पुण्याबरोबरच डोंबिवली, बोरीवली व सोलापूर येथे संवादिनीच्या शाखा सुरू झाल्या आहेत. ज्येष्ठ महिलांसाठी चालणाऱ्या जिजामाता दलामध्ये औषधी वनस्पतींवरील माहितीच्या संकलनाचा एक चांगला प्रकल्प गतवर्षी पूर्ण झाला.

पुण्यातील युवक विभागाने १९ शालेय दलांवर आणि ५ महाविद्यालयीन दलांवर नियमित क्रीडा उपक्रम घेतले. तसेच विज्ञान दल व अभ्यासगट यातही युवकांना आकर्षित केले. साहस शिबिरे, विज्ञान प्रबोधन शिबिरे, अभ्यासदौरे, गणेशोत्सव व विक्री उपक्रम अशा विविध अंगांनी सुमारे ८८५ युवकांपर्यंत प्रबोधिनीचा विचार पोहोचविला. युवतींनी प्रशालेय व प्रबोध शालेय तसेच महाविद्यालयीन दलांमधून अनेक उपक्रम केले त्यासाठी एकूण सतरा मार्गदर्शिकांनी पुढाकार घेतला. नागरी वस्ती अभ्यासगटामध्ये काशीवाडी व वडारवाडी येथे नियमित साप्ताहिक दले झाली. ३९ किशोरींचे विद्याव्रत झाले व महिलांचे दोन उद्योजकता मेळावे झाले. सर्व जाती-धर्मांच्या भारतीय नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होण्याच्या दृष्टीने हे उपक्रम चांगले मूळ धरीत आहेत. गतवर्षात एकूण १,९२८ सदस्यांनी अशा उपक्रमात भाग घेतला.

पुण्याबाहेरील प्रबोधिनीच्या विस्तार केंद्रामध्ये डोंबिवली मधील कार्यकर्त्यांनी कोकण अभ्यासदौरा केला. अंबाजोगाईच्या पाणीविषयक कामासाठी महत्त्वपूर्ण निधी गोळा केला व काही जणांनी प्रत्यक्ष मराठवाड्यात जाऊन श्रमदानही केले. विद्याव्रत संस्कार हा महत्त्वाचा उपक्रम डोंबिवलीच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी गेली अनेक वर्षे चालू आहे. आता प्रबोधिनी प्रणीत संस्कारविधी करणाऱ्या तेरा महिला पुरोहितांचा गट तेथे तयार झाला असून त्यांनी गतवर्षात ७९४ संस्कारविधी केले. बोरीवली येथे शाळांमध्ये चालणाऱ्या विकसिकांना विद्याव्रत आणि मातृभूमिपूजन यांची जोड आहे. जयराज नगर येथे वापरावयास मिळालेल्या उद्यान पडवीमध्ये अनेक उपक्रम नियमितपणे झाले. मार्च २०१८ मध्ये स्वा. सावरकरांविषयी एक अभ्यास शिबिर झाले. अंबाजोगाई विस्तार केंद्रावर शिशु शाळेचे काम नियमितपणे चालले.

प्रबोधिनीच्या निगडी केंद्रामध्ये आता बारा उपविभाग आहेत. पूर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या बरोबरच गुरुकुल व क्रीडाकुल यांनी आपली वैशिष्ट्ये जपली आहेत. त्याशिवाय संगणक विभाग, जम्मतघर, जैव तंत्रज्ञान विभाग आणि अटल टिकरिंग लॅब या उपक्रमांनी गतवर्षात चांगली कामगिरी केली. तेथील युवक-युवती विभागाबरोबरच पालक महासंघ मोठ्या दमदारपणे प्रबोधिनीच्या विचारांनी संघटित झाला आहे.

ज्ञान प्रबोधिनी सोलापूर व या न्यासाचे हराळी केंद्र यांची गतवर्षातील वाटचाल समाधानकारक झाली. त्याविषयीचे स्वतंत्र छापील वृत्त प्रकाशित झाले आहे. त्यातील सारांश या वृत्तात समाविष्ट केला आहे.

ग्राम प्रबोधिनी या न्यासाच्या आस्थापनेत व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीची भर पडली व तेथे तारतंत्री अभ्यासक्रमाची एक तुकडी शिकून बाहेर पडली. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्थेच्या कमला मेहता नेत्र रुग्णालयामध्ये डोळ्यांवरील ८०० शस्त्रक्रिया गतवर्षात झाल्या. तर १२,३८२ बाह्य रुग्णांनी तेथील नेत्रसेवेचा लाभ घेतला. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश या सदस्य संस्थेद्वारे शिवापूर येथे कृषी तांत्रिक विद्यालयात कातारी (टर्नर) अभ्यासक्रम चालू आहे. या न्यासाच्या जमिनीवर वेल्हे येथे ३० मुलींचे गिरीकन्या वसतीगृह गतवर्षात उभे राहिले. आता अशा सुविधेची मागणी उत्तरोत्तर वाढते आहे. प्रबोधिनीची तीन विस्तार केंद्रे व वरील पाच सदस्य संस्था यांच्याद्वारे प्रबोधिनीचे विविधांगी काम गतवर्षात अधिक पुढे गेले. भवितव्य लेखाच्या २०२२ पर्यंतच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये अधिक भरीव काम व्हावे अशी अपेक्षा आहे. त्यासाठी समाजातील सर्व सहानुभूतीदार, देणगीदार व हितचिंतक यांचा असाच वाढता पाठिंबा मिळावा अशी अपेक्षा व्यक्त करीत आहोत.

आपले,

वि. शं./सुभाष देशपांडे
कार्यवाह

गिरीश श्री. बापट
संचालक

# अंतरंग ....


| | पान क्र. |
|---|---|
| ⅄ विशेष उल्लेखनीय | ६ |
| ⅄ मध्यवर्ती कार्यक्रम | ८ |
| ⅄ ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र | |
| १) ज्ञान प्रबोधिनी प्रशाला | ९ |
| २) शैक्षणिक उपक्रम संशोधिका | १२ |
| ३) छात्र प्रबोधन | १७ |
| ४) नेतृत्व संवर्धन केंद्र | १९ |
| ५) स्पर्धा परीक्षा केंद्र | २१ |
| ६) प्रज्ञा मानस संशोधिका | २५ |
| ७) संस्कृत संस्कृति संशोधिका | २८ |
| ८) सामाजिक अध्ययन केंद्र | २९ |
| ९) ग्रामविकसन | ३० |
| १०) कृषी तांत्रिक विद्यालय, शिवापूर | ३२ |
| ⅄ कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ | ३२ |
| ⅄ ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र | |
| ११) स्त्री शक्ती प्रबोधन - ग्रामीण | ३३ |
| १२) स्त्री शक्ती प्रबोधन - शहरी | ३५ |
| १३) जिजामाता दल | ३७ |
| १४) नागरी वस्ती सल्ला व प्रशिक्षण केंद्र | ३८ |
| १५) युवक विभाग | ४० |
| १६) युवती विभाग | ४३ |
| १७) उद्योजकता विकास केंद्र | ४५ |
| ⅄ विस्तार केंद्रे | |
| १) डोंबिवली | ४६ |
| २) बोरीवली | ४७ |
| ३) अंबाजोगाई | ४९ |
| ⅄ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र | ५० |
| ⅄ ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र | ५४ |
| ⅄ ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र | ५६ |
| ⅄ ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र | ५९ |
| ⅄ सन्माननीय देणगीदार | ६० |


ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 5 31/08/2018 3:19:41 PM

# १ विशेष उल्लेखनीय

सन २०१७-१८ या वृत्तान्त वर्षात ज्ञान प्रबोधिनीची विविध केंद्रे, विभाग व व्यक्ती यांनी जे विशेष यश मिळविले व समाजाने त्याची दखल घेतली, असे उल्लेखनीय काही येथे सुरुवातीला ......

- प्रबोधिनीचे ज्येष्ठ संस्थापक सदस्य **मा. यशवंतराव लेले** यांना 'निनाद पुणे गुरुतत्त्व पुरस्कार' आदर्श शिक्षक सन्मान, श्री. सूर्यकांत पाठक यांच्या हस्ते देण्यात आला. ''ज्ञान प्रबोधिनीचे संचालक वा. गिरीश बापट व पुण्याचे पालकमंत्री मा. गिरीश बापट व मा. प्रकाश जावडेकर हे माझे विद्यार्थी. असे विद्यार्थी मोठे झालेले पाहणे यात जी धन्यता आहे ती शाल-श्रीफळामध्ये नाही. हे विद्यार्थी हेच आपल्या अभिमानाचे स्थान, हे माझे विद्यार्थी आहेत असे अभिमानाने सांगता येणे हेच खरे भाग्य आहे. ''
- ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या कार्यवाह **वा. सुजलताई वाटवे** यांना चैतन्य मेंटल हेल्थ केअर सेंटर व मनोरुग्णालय, येरवडा यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वयंसिद्धा २०१८' हा पुरस्कार पद्मश्री मा. राणी बंग यांच्या हस्ते दि. १० मार्च २०१८ रोजी प्रदान झाला.
- **विस्तारकेंद्र अंबाजोगाई** : 'सत्यमेव जयते' वॉटरकप स्पर्धेत या वर्षी ज्ञान प्रबोधिनीने जलसंधारणाचे काम केलेल्या गावांपैकी राज्य पातळीवर जायभायवाडी ३० लाखाचे बक्षीस घेऊन दुसऱ्या क्रमांकावर आले. तर तालुका पातळीवर रु. १८ लाखाचे पहिले बक्षीस अनुक्रमे काशीदवाडी, कोळपिंपरी व वाठवडा या गावांना मिळाले. अंबाजोगाई तालुक्यातील ७,५०,००० रुपयांचे दुसरे बक्षीस शेपवाडीला मिळाले. अशी एकूण रु. ९१,५०,०००/- ची पाच बक्षिसे आपल्या पाच गावांना मिळाली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पुण्यात बालेवाडीत मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला.
- **विस्तार केंद्र, डोंबिवली** : डोंबिवलीकर मासिकातर्फे दिला जाणारा सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामासाठीचा 'आर्दश डोंबिवलीकर २०१७' चा पुरस्कार यंदा ज्ञान प्रबोधिनी डोंबिवली विस्तार केंद्राला मिळाला.
- **छात्र प्रबोधन** : छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक व दिनमार्क पब्लिकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी अंक २०१७ च्या स्पर्धेतील स्व. कमलाबाई रसिकलाल धारीवाल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा या वर्षीचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार यंदा छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकास मिळाला आहे. रोटरी लोकमान्य दिवाळी अंक २०१७ चा द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार देखील यंदा छात्र प्रबोधनला मिळाला आहे.
- **कै. काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजकता पुरस्कार** : या वर्षीच्या कै. काकासाहेब सुपनेकर महिला उद्योजकता पुरस्काराचे वितरण झाले. स्वतःचे हॉटेल चालवून चार जणांना रोजगार दिला आहे अशा सौ. लीला कोंडे यांना उद्योजकता पुरस्कार, तर कविता रेणुसे (शेवई उद्योग) व हर्षदा शिंदे (कापडी पिशव्या उत्पादन) या दोघींना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमास श्री. अनिल व सौ. अनुराधा सुपनेकर, श्री. शशिकांत सुपनेकर उपस्थित होते.
- **स्पर्धा परीक्षा केंद्र** : भारतीय वनसेवा २०१७-१८ या परीक्षेचा निर्णय लागला. महाराष्ट्रात सोळा विद्यार्थी भारतीय वनसेवेसाठी निवडले गेले. आपल्या केंद्राचा त्यात निरंजन दिवाकर हा विद्यार्थी भारतात तिसरा व महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाने निवडला गेला. तसेच निरंजनसह ज्ञान प्रबोधिनीमधील काजोल पाटील, निखिल थावल, कस्तुरी सुळे, सतिश गोंधळी, अक्षय भोरडे, राहुल जाधव या विद्यार्थ्यांची भारतीय वनसेवेत निवड झाली आहे.
- **प्रज्ञा मानस संशोधिका** : प्रणीता जगताप यांना एस्. एन्. डी. टी. विद्यापीठातून डॉ. शीला गोळविलकर यांच्या मार्गदर्शनाखाली 'The efficacy of an Achievement Motivation Training Programme for 8th standard girls' या विषयावरील संशोधन पूर्ण होऊन विद्यावाचस्पती अशी पदवी मिळाली.
- **नवनगर विद्यालय, निगडी, क्रीडाकुल** : माजी विद्यार्थी खेळाडू चि. संतोष घाडगे याला महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा सन २०१४-२०१५ चा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे. क्रीडाकुलचा मल्लखांबचा राष्ट्रीय खेळाडू चि. संतोष घाडगे याला महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च शिवछत्रपती क्रीडापुरस्कार मिळाल्याबद्दल दि. २७ फेब्रुवारीला भव्य मिरवणूक काढण्यात आली.
- **ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे** : दि. ५ ते १४ नोव्हे. या कालावधीत प्राचार्य मिलिंद नाईक यांनी प्रशालेत चालणाऱ्या 'अभिव्यक्ती' या शैक्षणिक प्रयोगावरील एका शोधनिबंधाचे फिनलंड येथे वाचन केले. तसेच तेथील शाळांना भेटी दिल्या व तेथील शिक्षणपद्धती समजावून घेतली. 'Council for Creative Education, Finland' या संस्थेतर्फे 'Creativity in Education' या विषयावर ही परिषद योजण्यात आली होती.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 6 31/08/2018 3:19:42 PM

## कै. डॉ. वसंत सीताराम (आण्णा) ताम्हनकर प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम

ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक आदरणीय आण्णा तथा कै. डॉ. व. सी. ताम्हनकर यांचा प्रथम पुण्यस्मृतिदिन दि. १३ मे २०१८ रोजी सोलापूरच्या रंगभवन इथे संपन्न झाला.

आदरणीय वा. स्वर्णलता भिशीकर यांच्या धीरगंभीर आवाजात बरोबर ४.३० ला कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर मा. आण्णांच्या पुणे, सोलापूर व हराळी येथील कार्याचा आढावा आदरणीय महेंद्रभाई सेठिया, अमोलदादा गांगजी व अभिजितदादा कापरे यांनी अतिशय समर्पक अशा शब्दात घेतला 'चिरवसंत स्मृतिवन' या स्मरणिकेचे प्रकाशन विवेकानंद केंद्राच्या उपाध्यक्षा पद्मश्री निवेदितताई भिडे यांच्या हस्ते झाले. मा. शरदराव सुंकर यांनी स्मरणिकेचा आढावा आपल्या खास वक्तृत्व शैलीत घेतला. मा. निवेदितताईंनी त्यांच्या कार्यकर्ता-जीवनात सुरुवातीच्या काळातील आण्णांच्या बाबतीत अनुभवलेला आपलेपणा- आत्मीयता यांचे वर्णन करत जिव्हाळ्याची शिस्त आणि झोकून देणे या दोन गुणांबद्दल सांगितले. मा. संचालकांनी समारोपात काही आठवणी सांगितल्या. प्रेरणास्रोतांचे वाहक आपण व्हायला हवे असे सांगितले.

त्यानंतर मध्यंतरात कार्यक्रमाला उपस्थित पुणे, शिवापूर, निगडी, सोलापूर, हराळी व देश-विदेशातून आलेल्या सर्व विद्यार्थी, कार्यकर्ते, हितचिंतक अशा सर्वांनी गप्पा, हितगुज केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात कै. आण्णांच्या आवडणाऱ्या पद्य व अभंगांचा 'स्वरवंदना' हा कार्यक्रम झाला. मा. गायत्रीताई सेवक यांनी कार्यक्रमाचे निवेदन/ निरूपण केले. मिलिंद संत, समीर दुबळे, अमोल निसळ, दीपा औरंगाबादकर, कल्पना भालेकर-आठल्ये, नेहा जोशी अशा आण्णांच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत भावपूर्ण असा कार्यक्रम सादर केला.

## ♦ शालान्त परीक्षा सुयश २०१७-१८ ♦

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे ❖

☞ एकूण परीक्षार्थी : ८०
☞ उत्तीर्ण : १००%
☞ ९०% पेक्षा जास्त ४१ विद्यार्थी
- प्रथम : अखिल अत्रे ९८.४%
- द्वितीय : मृण्मयी करवंदे ९७.२%
  गार्गी म्हसकर ९७.२%
- तृतीय : ऋता डिके ९६.८%
  गायत्री साने ९६.८%

### ❖ ज्ञान प्रबोधिनी सोलापूर ❖

१००% निकाल. एकूण ८० विद्यार्थी
☞ ९०% पेक्षा जास्त गुण २९ विद्यार्थी
☞ ८०% पेक्षा जास्त गुण ३२ विद्यार्थी
☞ १००/१०० गणित २ विद्यार्थी
☞ १००/१०० संस्कृत ५ विद्यार्थी
- प्रथम : वैष्णवी अनिल शेडे ९७.८१ %
- द्वितीय : प्रज्ञा सुनील बलदवा ९७.६ %
- तृतीय : कौमुदी कौस्तुभ मंगरुळकर ९७.२ %

### ❖ ज्ञान प्रबोधिनी हराळी ❖

☞ विद्यालयाचा निकाल १००%
- प्रथम : समर्थ गायकवाड ८९%
- द्वितीय : कृष्णकांत कुलकर्णी ८८.२० %
  प्रतिक सोमवंशी ८८.२०%
  कौशिक वाले ८८.२०%
  रेखा सुरवसे ८८.२०%
- तृतीय : नवनाथ जाधव ८७.८०%

### ❖ ज्ञान प्रबोधिनी निगडी ❖

☞ एकूण परीक्षार्थी : २२३
☞ उत्तीर्ण : ९७.७५%
☞ १००/१०० गणित २ विद्यार्थी
☞ १००/१०० संस्कृत ४ विद्यार्थी
- प्रथम : अथर्व कुलकर्णी ९९.८०%
- द्वितीय : साक्षी महाजन ९७.४०%
- तृतीय : श्रेया जगताप ९७.२०%
- मराठी माध्यम प्रथम क्रमांक : अथर्व कुलकर्णी
- गुरुकुल प्रथम क्रमांक : हृषिका भोंडवे
- क्रीडाकुल प्रथम क्रमांक : सुरभि शर्मा
- इंग्रजी माध्यम प्रथम क्रमांक : सोहम बाबर

### ❖ ग्राम प्रबोधिनी साळुंब्रे ❖

☞ विद्यालयाचा निकाल ९३%
☞ १००/१०० गणित १ विद्यार्थी
- प्रथम : कृष्णाई वाजे ९३%
- द्वितीय : तेजल शितोळे ९२%
- तृतीय : वैष्णवी पाटील ९१%

### ❖ इ. १२ वी चे पहिले वर्ष ❖

☞ विद्यालयाचा निकाल ९०%
- प्रथम : पूजा राक्षे ७०.७१%
- द्वितीय : दिव्या येवले ६७.३३ %
- तृतीय : सायली सावंत ५३%

# २ मध्यवर्ती कार्यक्रम

## वर्षान्त उपासना व सेतुबंधन मेळावा

दि. १ एप्रिल २०१७ रोजी पुणे केंद्रावरील सर्व विभागांतील कार्यकर्ते व कर्मचारी सदस्यांसाठी वर्षान्त उपासना व सेतुबंधन मेळावा झाला. कार्यक्रमासाठी २२१ जण उपस्थित होते. विभागांचे पाच गट करून त्यांची सचित्र निवेदने सदस्यांनी सादर केली.

सेतुबंधन मेळाव्यात सदस्यांचा आपसांतील परिचय दृढ होण्यासाठी काही छोटे छोटे खेळ घेतले. वेगवेगळ्या विभागातील सदस्यांची परस्पर ओळख व्हावी व एकमेकांच काम कळावे असा हेतू ठेऊन खेळाच्या माध्यमातून मोकळा संवाद झाला. समारोप कार्यक्रमांत मा. संचालकांनी मागील वर्षातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विविध विभागांतील निवडक सदस्यांचे जाहीर कौतुक केले तर गुणवत्तापूर्ण कामगिरीसाठी अकरा सदस्यांचा सत्कार केला.

## आकाशवाणी वर झालेली मुलाखत

गणेशोत्सवानिमित्त आकाशवाणी वर युवतींची मुलाखत झाली आणि दि. ६ सप्टें. रोजी त्याचे प्रक्षेपण. यात अनघाताई व सुवर्णाताई यांनी विभागाच्या बर्ची व वादक गटाच्या सुरुवातीच्या काळातील अनुभव सांगितले. मीरा शेटे, वेदांगी पटवर्धन, प्रणाली गोगटे, मुक्ता भिडे, प्रज्ञा प्रभुदेसाई, मृणाल जोशी व निवेदिता जोशी या सध्या कार्यरत असणाऱ्या युवतींनी एकूण बर्चीचा इतिहास, गणेशोत्सवाची तयारी व सराव, शालेय गटाचा सहभाग, वादक व ध्वजधारी गटाचा सहभाग या बद्दल माहिती दिली.

## राष्ट्रीय परिषद (Quality of Life)

प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे जीवनाची गुणवत्ता (Quality of Life : Concept, Measurement Enhancement) या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन डॉ. नीतू मांडके सभागृह, IMa, पुणे येथे दिनांक १७ व १८ नोव्हेंबर या दिवशी करण्यात आले होते. या परिषदेचे उद्घाटन डॉ. मोहन आगाशे यांनी केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोकजी कुकडे अध्यक्षस्थानी होते. उद्घाटन प्रसंगी शोधनिबंधाचे सारांश रूपातील Book of abstract चे प्रकाशन झाले. दुसऱ्या दिवशी ज्ञान प्रबोधिनीत झालेल्या स्त्री विषयांच्या संशोधनाचे संकलन असलेल्या 'स्त्री-विधा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

दोन दिवसांमध्ये दोन परिसंवाद व दोन चर्चासत्रे झाली. यामध्ये पद्मभूषण प्रा. माधव गाडगीळ, IIT कानपूरच्या प्रा. लीलावती कृष्णन्, प्रा. मानस मंडल, वा. अनघा लवळेकर, डॉ. अनुराधा सोवनी (मानसशास्त्र प्रमुख - एस्.एन्.डी.टी, मुंबई), पि.चिं.म.न.पा. चे आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, मा. विद्याताई बाळ, डॉ. रोहिणी पटवर्धन, डॉ. कल्पना श्रीवास्तव, प्रा. डॉ मीना हरिहरन, हैद्राबाद विद्यापीठ, IPS अधिकारी मा. श्री. प्रमोद फळणीकर या अकरा मान्यवरांनी विविध विषयांची मांडणी केली. चार समांतर सत्रांमध्ये ३७ शोधनिबंधांचे सादरीकरण झाले. समारोपाच्या सत्रात मा. संचालकाच्या हस्ते समाजकार्यासाठी समर्पित असणाऱ्या श्री. सय्यदभाई, श्री. नरसिंग झरे, मा. शीतल तेली-उगले (आय.ए.एस.) व मा. दीपा पाटील या चौघांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. MKCL चे संचालक मा. विवेक सावंत यांनी परिषदेचा समारोप केला.

## सेतुबंधन मेळावा व वार्षिक सभा

दि. २७ जाने. २०१८ रोजी स. ९.३० ते सायं. ५.०० या वेळात या वर्षी सर्व केंद्रांवरचा एकत्रित असा सेतुबंधन मेळावा झाला. यासाठी पुणे, निगडी, साळुंब्रे, चिखली, सोलापूर, हराळी, शिवापूर, आंबवणे, वेल्हे, ठाणे, बोरीवली, डोंबिवली येथून सुमारे २५५ सदस्य आले होते. स. १०.०० ते १०.५० स्वत:ची ओळख व गेल्या वर्षभरात 'मी अनुभवलेली विशेष घटना' यावर गटचर्चा घेण्यात आली.

यानंतर स. ११ ते दु. १ या वेळात सदस्य मंडळ वार्षिक सभा झाली. औपचारिक सभा झाल्यानंतर मा. अध्यक्ष मा. डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी सभेला उद्देशून भाषण केले. त्यांनी भविष्यात होणाऱ्या बदलांचा आढावा घेऊन आपल्या तरुण पिढीसमोर काय काय आव्हाने असणार आहेत, हे सांगितले. 'रूप पालटू देशाचे' असे म्हणत असताना आपल्याला नवीन भारत घडवायचा आहे आणि नवीन भारत हा नवीन विचारांनी घडणार आहे. त्याचे नेतृत्व नेहमी देशाच्या पुढे, जगाच्या पुढे असायला हवे. ज्ञान प्रबोधिनी नक्कीच असा विचार करेल, असा आत्मविश्वास त्यांनी प्रकट केला.

भोजनानंतर दुपारच्या सत्रात सकाळच्याच चौदा गटांमध्ये चार विषयांवर गटकार्ये व गटचर्चा घेतली. समारोपात मा. गिरीशराव बापट यांनी मार्गदर्शन करताना सेतुबंधन मेळाव्याचा हेतू एकमेकांना भेटणे, स्नेहाच्या-मैत्रीच्या धाग्यांना उजाळा देणे हा होता. आपण इतके जण आहोत हे पाहून आपल्या कामाची प्रेरणा त्यातून वाढते. या सगळ्यातून आपल्याला एकत्र काम करायचे आहे.आजच्या सेतुबंधन मेळाव्यातून जे काही आपल्याला मिळाले आहे, या सगळ्यातून आपण आपली एकजुटीची ताकद वाढावी आणि या सगळ्यांच्या पलीकडे आणखीन लांबचे दिसावे यासाठी या सेतुबंधन मेळाव्याचा आपण उपयोग करूया असे सांगितले.

# ३ ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र

## १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

**डॉ. अरुण निगवेकर संगणक कक्षाचे उद्‌घाटन**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेला अद्ययावत संगणक कक्ष उभारण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर यांनी रु. ४ लाख देणगी दिली.त्यांच्याच नावाने उभारण्यात आलेल्या संगणक कक्षाचे उद्‌घाटन दि. १० मार्च रोजी झाले. यावेळी सौ. हेमा निगवेकर, ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह सुभाष देशपांडे, शैक्षणिक विभागाचे कार्यवाह विवेक पोंक्षे, प्राचार्य मिलिंद नाईक तसेच निगवेकर कुटुंबीय उपस्थित होते.

यावेळी मा. अरुणजींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. 'तंत्रज्ञान मोठ्या वेगाने बदलत असून एकविसाव्या शतकातील विद्यार्थ्यांना बाविसाव्या शतकासाठी सज्ज करण्याची जबाबदारी शिक्षण क्षेत्रावर आली आहे. ज्ञान प्रबोधिनीसारख्या संस्थांनी ही जबाबदारी स्वीकारून विद्यार्थ्यांना पुढील मार्ग दाखवावा' असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना डॉ. निगवेकर म्हणाले, 'शिक्षण ही सोन्यासारखी संधी आहे, विद्यार्थ्यांनी ती योग्य तऱ्हेने वापरली पाहिजे. शिक्षणातील संधींचा वापर करून नवे काही करता येईल का, याचा विचार केला पाहिजे. ज्ञान प्रबोधिनी ही शिक्षण क्षेत्रात वेगळी प्रशाला म्हणून भारतात आणि भारताबाहेर ओळखली जाते. सामाजिक बांधिलकी असलेली संस्था, झोकून देण्याची वृत्ती असलेल्यांची संस्था असा लौकिक आहे. म्हणून ज्ञान प्रबोधिनीने पुढील मार्ग दाखवावा आणि विद्यार्थ्यांनी देखील शाळेला पुढे नेण्याची संधी घ्यावी.

**अभिव्यक्ती-सादरीकरण**

- आपले विचार व भावना मोकळेपणाने व्यक्त करण्यासाठीचे 'अभिव्यक्ती' हे महत्त्वाचे माध्यम मानले गेले आहे. त्यामुळेच यंदाच्या वर्षी 'मुक्तछंद' या विषयाअंतर्गत प्रत्येक अभिव्यक्ती विषयाच्या गटाने त्यांच्या विचारांच्या अनुषंगाने मांडणी केली. गायन, वादनाच्या माध्यमातून राष्ट्रगीताच्या पुढील कडव्यांना वेगवेगळ्या प्रकारे चाली लावून त्याची मांडणी, तसेच यावर्षी अभिव्यक्ती विषयावरचे गीत प्रतिभाशाली लेखन गटातील मुलामुलींनी लिहिले व त्यास अध्यापकांच्या मदतीने चाल लावली व गायन गटातील मुलामुलींनी ते गायले.
- चित्रकला अभिव्यक्तीतील मुलामुलींनी कॅनव्हास पेंटिंगचा अनुभव घेतला व त्यावर बोटांनी चित्र रंगविली. ब्रशपेक्षा बोटांनी चित्र रंगविण्याचा वेगळा अनुभव मिळाला. शिल्पकला अभिव्यक्तीतील मुलामुलींनी यावर्षी पुण्यातील दोन उद्यानांच्या प्रतिकृती तयार करण्याचा अनुभव घेतला
- एप्रिल महिन्यातील दि. ९ ते २१ मध्ये कार्यक्रमासाठीची तयारी व सराव यासाठी शिबिर घेतले. दि. २४ एप्रिल रोजी मुलांचा व दि. २५ एप्रिल रोजी मुलींचा अभिव्यक्ती सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. मुलांकडे सुप्रसिद्ध व्हायोलिन वादक पंडित अतुलकुमार उपाध्ये व मुलींकडे सुप्रसिद्ध नृत्यांगना सौ. शमाताई भाटे ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

**विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम**

**१) विद्याव्रत संस्कार (इ. ८वी साठी)**

- इ. ८वी तील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी केला जाणारा हा महत्त्वपूर्ण शैक्षणिक संस्कार. याच्या अंतर्गत इ. ८वीच्या मुला-मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दिशा दाखविणारी एक व्याख्यानमाला एप्रिल २०१७ ते जानेवारी २०१८ या कालावधीत आयोजित केली होती.
- विद्याव्रताच्या अंतर्गत 'सज्जनगड' येथे दि. १८ ते २० जानेवारी २०१८ या काळात मुलींचे व दि. २० ते २२ जानेवारी २०१८ मुलांचे शिबिर झाले. तेथील व्रतार्थींचे जीवन जवळून बघणे व त्याचा थोडा स्वत: देखील अनुभव घेणे हा शिबिराचा हेतू होता. या शिबिरात उपासना, व्यायाम, श्रमकार्य, भजन, दैनंदिनी लेखन अशा सत्रांची योजना केलेली होती.
- दि. ३ व ४ फेब्रुवारीला अनुक्रमे इ. ८वी मुले व मुलींचा विद्याव्रत ग्रहण कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना आशीर्वाद देण्यासाठी बासरीवादक श्री. राजेंद्र कुलकर्णी व विद्यार्थिनींना आशीर्वाद देण्यासाठी चैतन्य संस्थेच्या डॉ. सुधाताई कोठारी यांना निमंत्रित केले होते.

**२) गणेशोत्सव**

दि. २५ ऑगस्ट ते दि. ५ सप्टेंबर २०१७ या कालावधीत गणेशोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

| दिनांक | आरतीचे पाहुणे |
|---|---|
| २५ ऑगस्ट | प्रतिष्ठापना - मा. शिवाजी कचरे, चॅरिटी कमिशनर |
| २६ ऑगस्ट | मा. वंदना देशपांडे (नूतन बालविकास माध्यमिक) |
| २८ ऑगस्ट | मा. उज्ज्वला देशमुख (अशोक विद्यालय) |
| २९ ऑगस्ट | मा. अस्मिता जानराव (हुजुरपागा) |
| ३१ ऑगस्ट | मा. सुजाता नायडू (डी.ई.एस.) |
| १ सप्टेंबर | मा. तिलोत्तमा रेड्डी (रमणबाग) |
| ४ सप्टेंबर | मा. नंदकुमार नगरकर (अभिनव मराठी माध्यम) |
| ८ सप्टेंबर | उत्तरपूजा - श्री. ओंकार बाणाईत |


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 9 31/08/2018 3:19:42 PM

गणेशोत्सवानिमित्त इ. ५वी ते ८वीच्या गटासाठी विविध अभिव्यक्तींच्या सादरीकरणाची योजना केलेली होती. त्यात पुढील सादरीकरणे झाली.

❍ **अभिव्यक्ती- सादरीकरण (इ. ५वी ते ८वी)**

| दिनांक | विषय व सादरकर्ते | |
|---|---|---|
| २८ ऑगस्ट | तबला व सतार वादन सादरीकरण | श्री. मंगेश करमरकर व कुमार पटवर्धन |
| २९ ऑगस्ट | नाट्यवाचन | भैरवी पुरंदरे, अमृत सामक व सहकारी |
| ३१ ऑगस्ट | कथक कीर्तन | श्री. पुष्कर औरंगाबादकर |
| १ सप्टेंबर | देशभक्तीपर गीते | श्री.आशुतोष जातेगावकर व सहकारी |
| ४ सप्टेंबर | विविध तालवाद्यांचे सादरीकरण | श्री. अवधूत धायगुडे |

**३) बुद्धिबळ दिवस**

'किंडर स्पोर्टस् इन्स्टिट्यूट ' ह्या सौ. मेघना अभिजीत कुंटे ह्यांनी चालविलेल्या संस्थेतर्फे प्रशालेमध्ये इ. ६वी साठी दर शनिवारी बुद्धिबळाच्या तासिका घेतल्या जातात. संस्थेतर्फे दि. २० मार्च रोजी बुद्धिबळ दिवस साजरा करण्यात आला. यावेळी ग्रँडमास्टर अभिजीत कुंटे ह्यांनी इ. ६वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संवाद साधला व बुद्धिबळातील यशाचे रहस्य सांगितले. उत्तम बुद्धिबळ खेळण्यासाठी त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले.

**२) अभ्यासशिबिर –** दि. ९ ते १३ फेब्रवारी २०१८ या कालावधीत इ. १०वीच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासशिबिर झाले. दि. २५ ते २८ डिसेंबर २०१७ या कालावधीत विद्यार्थिनींचे अभ्यासशिबिर झाले. यात मुख्यत: परीक्षातंत्र, वेळेचे नियोजन, प्रश्न सोडविण्याच्या पद्धती, लिखाण व अभिव्यक्त करणे कसे असावे इ. विषयांवर मार्गदर्शक व्याख्याने तसेच अनुभवकथनेही करण्यात आली.

**३) विशेष अभिरुची वर्ग :** ६ नोव्हें. पासून विशेष अभिरुची वर्ग प्रशालेत सुरू करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय विषयांबरोबरच अन्य काही शिकावेसे वाटत असते. प्रत्येकाच्या अभिरुचीप्रमाणे त्याला ते शिकता आले पाहिजे. परंतु शाळेच्या ११ ते ७ ह्या चौकटीत ते शक्य नाही. म्हणून सुरुवातीला इ. ६वी व ७वी ह्या दोन इयत्तांसाठी सोमवार ते गुरुवार ९.४५ ते १०.४५ ह्या वेळात हे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. हे वर्ग ६ नोव्हेंबर ते १५ मार्चपर्यंत घेण्यात आले.

१० विद्यार्थ्यांच्या गटाने एखादा विषय शिकवण्याची मागणी केल्यास असा वर्ग सुरू करण्यात येतो. सध्या प्रशालेत चीनी भाषा (इ. ७वी मुली), फ्रेंच भाषा (इ.६वी मुले, मुली), जगाचा इतिहास (७वी मुले), धडपड प्रयोगशाळा (६, ७वी मुले आणि मुली) असे पाच वर्ग सुरू आहेत.

**४) प्रकल्प शिबिर –** इ. ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. ९ ते १९ एप्रिल रोजी शिबिर आयोजित केले होते. यात संशोधनात्मक प्रकल्पाच्या दृष्टीने मार्गदर्शक सत्रे घेण्यात आली. त्यात प्रा. नचिकेत नित्सुरे, प्रा. शांतला कुलकर्णी, प्रा. तुषार बोरोटीकर, प्रा. उपेंद्र कहाणे, प्रा. माया भानू, श्री. सोहम डांगे आणि श्री. साहिल बेलसरे यांनी मार्गदर्शन केले.

## सामाजिक जाणीव

१) इ. ९वी, १०वी व प्रौढ सदस्य यांच्यासाठी देशप्रश्नांशी निगडीत अशा सामाजिक विषयावरील व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. त्यात पुढील वक्त्यांनी आपले विचार मांडले. या विषयांवर मुलांनी काढलेल्या उत्तम, निवडक प्रश्नांसाठी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

व्याख्यानमाला (इ. ९वी, १०वी)

| दिनांक | विषय | व्याख्याते प्रस्तावना-परिचय |
|---|---|---|
| २८ ऑगस्ट | पर्यावरण | श्री. सतीश खाडे<br>श्री. दीपक बीडकर |
| २९ ऑगस्ट | ग्रामविकसन -ग्राम विकसनातील भविष्यातील आव्हाने | श्री. दर्शन मुंदडा, सौ. सुवर्णाताई गोखले |
| ३१ ऑगस्ट | मानसशास्त्र - कला व मानसशास्त्र | डॉ. आनंद गोडसे, ईशा कान्हेरे |
| १ सप्टेंबर १७ | अर्थशास्त्रातील आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन | डॉ. मानसी फडके, प्रा. मेधाविनी वाटवे |
| ४ सप्टेंबर १७ | अर्थशास्त्र- अर्थव्यवस्था कशी चालते | श्री. कृष्ण कांता रॉय, श्री. रवी जगताप |

## मानसिक समृद्धी

### वर्षारंभ, वर्षान्त व साप्ताहिक उपासना

❍ **विद्यारंभ (इ. ५वी साठी)**

दि. १६ जून रोजी इ. ५वीची विद्यारंभ उपासना झाली. या कार्यक्रमात इ. ५वी च्या विद्यार्थ्यांचे सर्व पालकही सहभागी झाले होते. उपासनेनंतरच्या सभेत मा. कार्यवाह श्री. सुभाषराव देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

## शारीरिक कौशल्य

❍ **क्रीडाशिबिरे** – समूहजीवनाचा आनंद घेत त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये व वृत्ती आत्मसात करण्याच्या हेतूने विविध शिबिरे डिसेंबर अखेर घेण्यात आली.

| इयत्ता | युवक | युवती |
|---|---|---|
| ५वी | अनिवासी क्रीडा शिबिर | अनिवासी क्रीडा शिबिर |
| ६वी | अनिवासी क्रीडा शिबिर | अनिवासी क्रीडा शिबिर |
| ७वी | निवासी शेती अनुभव शिबिर, साळुंब्रे | अनिवासी क्रीडा शिबिर |
| ८वी | साहस शिबिर, केळद | अनिवासी क्रीडा शिबिर |
| ९वी | साहस शिबिर, केळद | अनिवासी क्रीडा शिबिर |
| १०वी | साहस शिबिर, केळद | अभ्यास शिबिर |

❍ **नेतृत्व गुणविकास**

**अग्रणी प्रशिक्षण शिबिर –** २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये अग्रणी म्हणून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण शिबिर दि. १८ डिसेंबर (मुली) व २२ डिसेंबर (मुले) रोजी घेण्यात आले.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 10 31/08/2018 3:19:42 PM

मुलांकडे मा. सुभाषराव देशपांडे तर मुलींकडे श्री. अमोल फाळके यांनी नेतृत्वाची संकल्पना स्पष्ट केली. मा. प्राचार्यांनी 'गटबांधणी' या विषयावर दोन सत्रे घेतली. प्रा. रागिणीताई यांनी अग्रणी योजना समजावून सांगितली व नव्या वर्षीचे अग्रणी जाहीर केले.

**गुरूपौर्णिमा –** अग्रणी योजनेच्या अंतर्गत इ. १०वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आपापल्या वर्गासाठी गुरूपौर्णिमेनिमित्त गुरुपूजनाच्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन केले होते.

**विशेष :** दि. ५ ते १३ नोव्हेंबर या दरम्यान मा. प्राचार्य वा. मिलिंदराव नाईक फिनलँड येथे दौऱ्यावर गेले होते. त्यांनी ताम्पेरे येथील 'सेंटर फॉर क्रिएटिव्ह एज्युकेशन' या संस्थेतर्फे आयोजित 'क्रिएटिव्हीटी इन एज्युकेशन' या विषयावरील परिसंवादात प्रशालेतील अभिव्यक्ती शिक्षणाच्या प्रयोगावरील शोधनिबंधाचे वाचन केले व तेथील शिक्षणव्यवस्था समजावून घेतली.

## यश

**बाह्यपरीक्षा – होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा**

बृहन्मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेमध्ये प्रशालेच्या

| | | |
|---|---|---|
| ऐश्वर्या अभ्यंकर | इ. ६वी | सुवर्ण पदक |
| प्रियांका कुमार | इ. ९वी | रौप्य पदक |
| श्रीवल्लभ पोळ | इ. ९वी | रौप्य पदक |
| आभा बोंद्रे | इ. ६वी | कांस्य पदक |

या विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

**गणित प्रभुत्व स्पर्धा**

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ, पुणे तर्फे घेण्यात येणाऱ्या 'गणित प्रभुत्व स्पर्धा' परीक्षेमध्ये खालील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले.

इ. ५वी : आर्य गुजर – शिष्यवृत्ती

इ. ८वी : कल्याणी नागुरे – शिष्यवृत्ती

**स्पर्धांतर्गत : रामकृष्ण मठ :** वक्तृत्व

| | | |
|---|---|---|
| गौरी ठोंबरे | इ. ९वी | प्रथम |
| उदिता काळे | इ. ८वी | द्वितीय |
| कुणाल कुरंदळे | इ. ५वी | तृतीय |
| कौस्तुभ जोशी | इ. ५वी | उत्तेजनार्थ |

**भारतीय हवामान शास्त्र संस्थेतर्फे आयोजित :** वक्तृत्व

| | | |
|---|---|---|
| उदिता काळे | इ. ८वी | पहिले |
| अदिती देशमुख | इ. ९वी | दुसरे |
| चित्रकला, मिहीका खरे | इ. ७वी | दुसरे |
| प्रश्नमंजूषा, श्रीवाणी जगताप | इ. ९वी | पहिले |

दिवाकर नाट्यछटा स्पर्धा मुग्धा जोशी इ. ५वी तिसरे

पथनाट्य : व्यसनमुक्ती इ. ९वी , १०वी द्वितीय

**संस्कृत सोळावा अध्याय पाठांतर**

| | | |
|---|---|---|
| सई जोशी | इ. ७वी | प्रथम |
| वैष्णवी उरमोडे | इ. ७वी | उत्तेजनार्थ |

**एकपात्री सादरीकरण –**

| | | |
|---|---|---|
| भक्ती धर्माधिकारी | इ. ५वी | द्वितीय |
| मुग्धा जोशी | इ. ५वी | तृतीय |
| मारीशा थोरात | इ. ७वी | उत्तेजनार्थ |

**रानडे वक्तृत्व स्पर्धा –**

उत्स्फूर्त व नियोजित दोन्ही प्रथम पारितोषिक

गौरी ठोंबरे इ. ९वी प्रथम

नाट्य – सांघिक – दुसरे

**टिळक वक्तृत्व स्पर्धा –**

| | | |
|---|---|---|
| उदिता काळे | इ. ८वी | पहिले |
| कुणाल कुरंदळे इ. | इ. ५वी | दुसरे |

सर्वसाधारण विजेते पदक

**केसरीवाडा गणेशोत्सव – नाट्यछटा स्पर्धा**

| | | | |
|---|---|---|---|
| लहान गट – | सानिका जोशी | इ. ५वी | प्रथम |
| | भक्ती धर्माधिकारी | इ. ५वी | तृतीय |
| | मुग्धा जोशी | इ. ५वी | उत्तेजनार्थ |
| मोठा गट – | गौरी ठोंबरे | इ. ९वी | प्रथम |

**रानडे वक्तृत्व स्पर्धा – उत्स्फूर्त व नियोजित**

गौरी ठोंबरे इ. ९वी प्रथम

**मराठी अध्यापक मंडळातर्फे आयोजित स्वरचित कविता**

| | | |
|---|---|---|
| वेदश्री थेऊरकर | इ. ८वी | तृतीय |
| तन्मयी दोशी | इ. ८वी | तृतीय |

**कराड येथील यशवंत व्यासपीठ वक्तृत्व स्पर्धा**

उदिता काळे इ. ८वी तृतीय

**कराड – लाहोटी कथाकथन स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| मुग्धा जोशी | इ. ५वी | प्रथम |
| भक्ती धर्माधिकारी | इ. ८वी | उत्तेजनार्थ |

शाळेस सांघिक विजेतेपदाची ढाल

**ग्राहक पेठेतर्फे आयोजित चित्रकला स्पर्धा**

| | |
|---|---|
| कौशिक ठाकूर | इ. ५वी |
| समृद्धी कानडे | इ. ५वी |
| सुदिक्षा बनकर | इ. ५वी |

**दादा फुलंब्रीकर स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| मुग्धा जोशी | इ. ५वी | तिसरे |
| श्रीराम सावरकर | इ. ५वी | तिसरे |

भास्कराचार्य प्रतिष्ठान ने घेतलेल्या Maths Talent Search Exam मध्ये इ. ६ वीतील ऐश्वर्या अभ्यंकर राज्यात दुसरी आली. याशिवाय इतर ६ विद्यार्थ्यांनी विशेष नैपुण्य मिळवले.

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 11 31/08/2018 3:19:42 PM

## २. शैक्षणिक उपक्रम संशोधिका

### ❖ वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र ❖

- **राज्ये :** उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम, अरुणाचल प्रदेश, गोवा, महाराष्ट्र
- **प्रशिक्षणाचे दिवस :** ८८
- **सहभागी शाळांची संख्या :** २६३
- **प्रशिक्षणार्थी संख्या :** १२४०

**विवेकानंद केंद्र शिक्षा प्रसार विभाग, आसाम**

**टप्पा १ (१३ ते १९ जुलै, २०१७)**

विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी यांच्या आसाम येथील २४ शाळांमधील विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक संशोधन पद्धती शिकावी यासाठी विवेकानंद केंद्रामार्फत 'आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प स्पर्धेची' योजना करण्यात आली. विज्ञानातील संशोधनात्मक प्रकल्पाची पद्धत शिकणे व त्याप्रमाणे आपल्या शालेय परिसरातील संशोधनाचा विषय निवडून या प्रकल्प स्पर्धेत सहभागी होणे हे या स्पर्धेचे उद्दिष्ट होते. यासाठी अध्यापकांना संशोधनात्मक प्रकल्प पद्धतींचा परिचय करून देणे या प्रशिक्षणाच्या योजनेतील पहिल्या टप्प्यात दि. १३ ते १९ जुलै या कालावधीत विवेकानंद केंद्रातील साधन व्यक्तींसाठी नवनगर विद्यालय, ज्ञान प्रबोधिनी-निगडी येथे संशोधनात्मक प्रकल्प पद्धतीतून विज्ञान अध्ययन (Project based Learning) या विषयावर सात दिवसांचा प्रशिक्षण वर्ग योजण्यात आला. प्रकल्प पद्धतीच्या प्रशिक्षण सत्रांबरोबरच वैज्ञानिकांशी गप्पा, विविध वैज्ञानिक संस्थांना भेटी (IISER, NCL इ.) योजण्यात आल्या.

**टप्पा २ (ऑक्टोबर – नोव्हेंबर २०१७)**

टप्पा १ मध्ये प्रशिक्षण घेतलेल्या विवेकानंद केंद्राच्या अध्यापकांनी पाच ठिकाणी 'प्रकल्प पद्धतीतून विज्ञान अध्ययन' या विषयावर चार दिवसांची विज्ञान शिबिरे आयोजित केली. या विज्ञान शिबिरात संशोधनात्मक प्रकल्प पद्धतीसाठी लागणारी कौशल्ये यासाठीची कृती सत्रे योजली होती. विद्यार्थ्यांच्या गटाने एक छोटा संशोधनात्मक विज्ञान प्रकल्प तयार केला. पाच शिबिरात २५० विद्यार्थी सहभागी झाले. शिबिराच्या शेवटी सहभागी विद्यार्थी व विज्ञान शिक्षकांनी आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प स्पर्धेसाठी संशोधन प्रस्ताव तयार केले .

**टप्पा ३ (जानेवारी २०१८)**

विवेकानंद केंद्र विद्यालय रामनगर, सिलचर, आसाम येथे आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प स्पर्धेत सहभागी झालेल्या शिबिरात बाल वैज्ञानिकांच्या गटांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले व त्यांचे मूल्यमापन करण्यात आले. आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प स्पर्धेमध्ये सुमारे १५० विद्यार्थ्यांचे साठ प्रकल्प सादर करण्यात आले.

**शिक्षक प्रेरणा जागृती वर्ग**

चतुरंग प्रतिष्ठान बरोबर चिपळूण परिसरातील आठ संस्थांच्या २२ शाळांतील ३८ शिक्षकांसाठी यावर्षी शिक्षक प्रेरणा जागृती वर्गाचे आयोजन करण्यात आले. चार टप्प्यांमध्ये १७ दिवसांचे निवासी प्रशिक्षण घेण्यात आले. या वर्गाच्या निमित्ताने अध्यापकांसाठी ज्ञान, कौशल्य समृद्धी व प्रेरणा जागरण यासाठी सेवांतर्गत प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार झाला.

### ❍ शालेय गुणवत्ता विकास कार्यक्रम

शालेय गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत शिक्षण संस्थांबरोबर त्यांच्या उद्दिष्टानुसार आणि गरजेनुसार वार्षिक प्रशिक्षणाची योजना आखली जाते. या शालेय गुणवत्ता विकास योजनेत ज्ञान प्रबोधिनीच्या सर्वांगीण व एकात्म शिक्षणपद्धतीतील उपक्रमांचा अन्य शाळांमध्ये विस्तार करण्यासाठी वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम योजला जातो. वर्ष २०१७-१८ या वर्षी सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीच्या नाशिक येथील भोसला मिलिटरी स्कूलच्या आवारातील सहा शाळांसाठी अकरा दिवसांचे शालेय गुणवत्ता विकास प्रशिक्षण घेण्यात आले. दोन प्रशिक्षणांदरम्यान कृती तासिकांसाठीच्या योजनेचे नियोजन करण्यात आले.

### ❖ शैक्षणिक साधन केंद्र ❖

**ज्ञान प्रबोधिनी आणि टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने तयार होणारा शिक्षकांचा परिवार**

(TCS and JP Partnership to build biggest teachers network )

ज्ञान प्रबोधिनी आणि टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेस (TCSiON) यांच्यात दि. ३ एप्रिल रोजी करार करण्यात आला. यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी online courses तयार करण्यात येणार आहेत. हे कोर्सेस लवकरच www.learning.tcsionhub.in या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. भारतातील शैक्षणिक गुणवत्ता वाढ आणि कृतीशील शिक्षण पद्धतीचा अधिकाधिक वापर हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. पूर्व प्राथमिक तर उच्च माध्यमिक अशा सर्व स्तरांवरील शिक्षकांना वर्गात व वर्गाबाहेर वापरण्याची अध्यापन तंत्रे आणि पद्धती शिकण्यासाठी या कोर्सेसचा उपयोग होईल. यामध्ये 'रूप पालटू शिक्षणाचे' या नावाने एक शिक्षक परिवार (Teachers Community) तयार करण्यात आला आहे. या परिवाराची निर्मितीच शिक्षकांनी परस्परांशी संवाद करावा यासाठी केलेली आहे. प्रयोगशील, धडपड्या अध्यापकांच्या दृष्टीने वर्ग म्हणजे मनुष्यघडणीच्या प्रयोगाची जिवंत प्रयोगशाळा असते. ती अधिकाधिक समृद्ध करण्याचे काम ह्या प्रयोगातून होईल. सध्या या परिवारात २५०० सदस्य आहेत.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 12 31/08/2018 3:19:42 PM

पूर्व प्राथमिक शिक्षकांसाठी ज्ञानेंद्रियांचा विकास हा परिपूर्ण ऑनलाइन अभ्यासक्रम प्रकाशित करण्यात आला. हा अभ्यासक्रम संपूर्ण नि:शुल्क उपलब्ध आहे. ९५ जणांनी कोर्सची नोंदणी केली. https://goo.gl/jGeV6c या संकेतस्थळावर हा कोर्स उपलब्ध आहे. पुढील वर्षात यावर सहा नवीन अभ्यासक्रम उपलब्ध होतील.

**बालभारती :** महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) साठी संस्कृत विषयाचे इयत्ता ८वी, ९वी, १०वी साठी QR Code व्हिडीओ निर्मितीचे काम करण्यात आले. नवीन पाठ्यपुस्तकात हे साहित्य उपलब्ध होईल.

**Happy Teacher app** ची पुढची आवृत्ती तयार करण्याचे काम सुरू आहे. यात महाराष्ट्र बोर्ड, आसाम बोर्ड, छत्तिसगढ बोर्ड आणि केंद्रीय बोर्ड च्या अभ्यासक्रमासाठीची पाठ नियोजने आणि वर्ग अध्यापनासाठी साहित्य उपलब्ध होईल. २०१८-१९ ला हे ॲप प्रकाशित करण्यात येईल.

**Compete Prabodhini Way**

५वी व ८वी साठी शिष्यवृत्ती परीक्षेच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमासाठी १०० सराव प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना उपलब्ध केल्या. याशिवाय होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा, राष्ट्रीय शिष्यवृत्ती (NTS) अशा वेगवेगळ्या परिक्षांसाठी यावर्षी ३२५ मुलांनी याचा लाभ घेतला.

**Learn Prabodhini Way** हे शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी Online Courses चे पोर्टल विकसित करण्यात आले. ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण आणि अध्यापन पद्धतीची ओळख करून घेण्याची आणि आपल्या क्षमतेनुसार शिकण्याची सोय यात केलेली आहे. नवीन शैक्षणिक वर्ष जून २०१८ पासून कोर्स उपलब्ध होतील.

### ❍ छोटे सायंटिस्ट्स् उपक्रम

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात छोटे सायंटिस्ट्स् उपक्रमाने सातव्या वर्षात पदार्पण केले. या वर्षी केपीआयटीच्या अर्थसाहाय्यातून चार कृतीसत्रांद्वारे छोटे सायंटिस्ट्स उपक्रम राबविला गेला.

सेवा सहयोग संस्थेतर्फे पुणे शहरातील ९ अभ्यासिकांद्वारे इयत्ता ८वी मधील १६५ विद्यार्थ्यांना छोटे सायंटिस्ट्स् उपक्रमाचा लाभ झाला.

एक्सेल इंडस्ट्रीज, रोहा यांच्या अर्थसाहाय्यातून रोहा तालुक्यातील इयत्ता ८वी व ९वीच्या ४९१ विद्यार्थ्यांना छोटे सायंटिस्ट्स् उपक्रमाचा लाभ झाला. एकूण १३४३७ विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला. यामध्ये इयत्ता ८वीच्या विज्ञान अभ्यासक्रमावर आधारित सहा विज्ञान संकल्पनांची निवड केली आहे. १) विज्ञान खेळणी २) दाब ३) विद्युत प्रवाह ४) प्रकाश ५) ऊर्जा ६) चुंबकत्व या सहा संकल्पनांवर एकूण २७ प्रयोगांची रचना केली आहे.

सन १७ - १८ या शैक्षणिक वर्षात इ. ९वीचा अभ्यासक्रम बदलला आहे. त्यामुळे काही विज्ञान संकल्पनेवर आधारित नव्याने प्रयोग करावे लागले आहेत. १) गतीचे नियम २) कार्य आणि ऊर्जा ३) धाराविद्युत ४) प्रकाश ५) ध्वनी.

तसेच इ. ७वीचा ही अभ्यासक्रम या वर्षी बदलला आहे. या नवीन अभ्यासाक्रमातील नवीन विज्ञान संकल्पनांचा विचार करून त्यावर आधारित प्रयोग व प्रात्यक्षिके, विद्यार्थ्यांना खेळण्याच्या माध्यमातून शिकविले जातात.

केपीआयटी अभियंत्यांचे प्रशिक्षण दरमहा एका विज्ञान संकल्पनेवर झाले. बेंगलुरू व नवी मुंबई येथील केपीआयटी अभियंत्यांचे प्रशिक्षण online व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे झाले. त्यांना कुरियरने साहित्य पाठविले जात होते.

### विज्ञान अध्यापक प्रशिक्षण

दि. २७ ऑगस्ट २०१७ रोजी पुणे जिल्ह्यातील २८ माध्यमिक शाळेतील २८ विज्ञान अध्यापकांचे प्रशिक्षण झाले. धुळे जिल्ह्यातील अकरा माध्यमिक शाळेतील ११ विज्ञान शिक्षकांचे प्रशिक्षण १८ डिसेंबर २०१७ रोजी झाले. पुणे म.न.पा., पिंपरी - चिंचवड म.न.पा. आणि उस्मानाबाद जिल्हा येथे काम करीत असलेल्या विज्ञान मित्र शिक्षकांचा जुलै व सप्टेंबर मध्ये एकदिवसीय प्रशिक्षण वर्ग आयोजित केला होता.

| मॉडेल | कोणाद्वारे | ठिकाण | सहभागी शाळा | इयत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| मॉडेल १ | केपीआयटी अभियंते ४०० | मावळ तालुका, मुळशी तालुका, बेंगलुरू, नवी मुंबई, धारवाड, मैसुरू, हुबळी | ९६ | ८ वी, ९ वी | ७५४१ |
| मॉडेल २ | विज्ञान मित्र | पुणे म. न. पा., पिंपरी-चिंचवड, म.न.पा., उस्मानाबाद जिल्हा | २७ | ७ वी, ८ वी, ९ वी | १६५४ |
| मॉडेल ३ | विज्ञान अध्यापक | पुणे जिल्हा, धुळे जिल्हा | ३९ | ८ वी | १८८२ |
| मॉडेल ४ | महाविद्यालयीन विद्यार्थी | चिपळूण तालुका, जालना जिल्हा | २९ | ८ वी | १७०४ |

जालना जिल्ह्यातील जे.ई.एस. महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण ४ जानेवारी २०१८ रोजी झाले.

❍ **निवासी विज्ञान शिबिर**

दि. २४ ते २८ डिसेंबर २०१७ या कालावधीत ज्ञान प्रबोधिनीच्या विज्ञान दलातर्फे निवासी विज्ञान शिबिराचे आयोजन केले होते. या विज्ञान शिबिरात छोटे सायंटिस्ट्स् उपक्रमात पुणे जिल्ह्यातील भोर, हवेली, आंबेगाव, शिरूर तालुक्यातून नऊ सहभागी शाळेतील एकूण २७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

❍ **सुबोध द्वैमासिक अंक**

दर दोन महिन्याला छात्र प्रबोधन सुबोध द्वैमासिक अंक दिला जातो. विद्यार्थ्यांना अंकातील लेख, कविता, कथा खूप आवडतात. या अंकांमध्ये खास छोटे सायंटिस्ट्स उपक्रमाची विज्ञान पुरवणी जोडलेली असते. या पुरवणीमध्ये विद्यार्थ्यांना घरी करून बघता येतील असे साधे, सोपे प्रयोग/खेळणी यांची कृती दिलेली असते. वर्षभरात एकूण सहा अंक दिले जातात.

❍ **समस्या परिहार स्पर्धा २०१८**

ज्ञान प्रबोधिनी पुणे व केपीआयटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'छोटे सायंटिस्ट्स्' उपक्रम राबविला जातो. या उपक्रमांतर्गत इयत्ता ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांची समस्या परिहार स्पर्धा दि. २२ फेब्रुवारी २०१८ रोजी केपीआयटी, हिंजवडी येथे आयोजित केली होती. या स्पर्धेला नीती आयोगाच्या अटल टिंकरिंग (Lab)चे कार्यकारी अधिकारी डॉ. उन्नत पंडित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. केपीआयटीचे सहसंस्थापक श्री. रवी पंडित यांनी स्पर्धेला भेट देऊन मुलांशी संवाद साधला. पुणे जिल्ह्यातील मावळ व मुळशी तालुक्यातून २१ शाळा व पुणे म. न. पा. च्या दहा शाळा तसेच अटल टिंकरिंगच्या अकरा शाळांचा सहभाग या स्पर्धेत होता. एकूण ४२ शाळांमधील १८० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. बक्षीस वितरण प्रमुख पाहुणे डॉ. उन्नत पंडित व ज्ञान प्रबोधिनीचे शिक्षण प्रभागाचे उपकार्यवाह प्रा. विवेक पोंक्षे यांच्या उपस्थितीत झाले.

❍ **विवेक इन्स्पायर**

विवेक इन्स्पायर या प्रकल्पाचे हे तिसरे वर्ष होते. अरुणाचल प्रदेशातील विवेकानंद विद्यालयाच्या २६ शाळांतल्या ६वी ते ८वीच्या मुलांसाठी विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

**वर्षभरातील शिबिरे तपशील**

❍ **मुख्य केंद्र :** इटानगर, निर्जुली, झिरो, रोइंग, सुनपुरा

इ. ६वी ते ८वीच्या निवडक विद्यार्थ्यांसाठी ऑगस्ट २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत प्रत्येक वर्गासाठी दोन ते तीन शिबिरे घेण्यात आली. या शिबिरात एकूण ६७८ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तसेच एकूण ६७ साधन व्यक्तींनी GMAT, वाचन कौशल्य, निरीक्षण कौशल्य, भाषा विकास, NNMS स्पर्धा परीक्षा तयारी, Technovation challenge app developing स्पर्धेची तयारी या विषयांवर मार्गदर्शन केले.

**इयत्ता ८वी – पुणे अभ्यासदौरा (exposure visit) :**

विवेक इन्स्पायरच्या पहिल्या तुकडीचे ६६ विद्यार्थी आणि दहा शिक्षक डिसेंबर महिन्यात बारा दिवसांच्या exposure visit साठी पुण्याला आले होते. या दौऱ्यात विद्यार्थ्यांना मुख्यतः पुणे आणि परिसरातील विविध सांस्कृतिक आणि भौगोलिक ठिकाणे आणि संस्थांची ओळख करून दिली. त्याचबरोबर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या अनुभव-कथन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

सहभागी शिक्षकांनी ज्ञान प्रबोधिनी आणि जिज्ञासा लर्निंग सेंटरला भेट देऊन शिक्षणातले अनोखे प्रयोग बघितले. शेवटच्या चार दिवसात केलेला कोकण दौरा आणि समुद्र दर्शन अरुणाचलातल्या दुर्गम भागातून आलेल्या विद्यार्थी-शिक्षकांसाठी अविस्मरणीय ठरले.

❍ **ज्ञानसेतू उपक्रम**

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिकेतर्फे भारतातील दुर्गम व दुर्लक्षित राज्यांपैकी काही निवडक राज्यांत ज्ञानसेतू उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात या उपक्रमाने पाचव्या वर्षात पदार्पण केले. या उपक्रमांतर्गत दि. १ एप्रिल ते १७ डिसेंबर २०१७ या कालावधीत सहा विज्ञान कार्यशाळा झाल्या. यामध्ये एकूण १५७ स्वयंसेवकांचा सहभाग होता. प्रशिक्षण झालेल्या स्वयंसेवकांपैकी ७७ स्वयंसेवकांनी मेघालय, आसाम (पार्वतीपुरा), जम्मू, सिक्कीम, छत्तीसगढ (सुकमा) या राज्यांतील एकूण ८६ शाळेतील ६४३५ विद्यार्थ्यांकरिता विज्ञान कार्यशाळा घेतल्या. या वर्षी महाराष्ट्रातील काही महाविद्यालयात ज्ञानसेतू उपक्रमाची परिचय सत्रे झाली.

**ज्ञानसेतू मेळावा**

स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट २०१७ रोजी ज्ञानसेतू मेळाव्याचे आयोजन केले होते. मेळाव्याचा मुख्य हेतू जास्तीत जास्त जणांपर्यंत या उपक्रमाची माहिती पोचवणे आणि या उपक्रमातील सहभागाबद्दल माहिती देणे हा होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आयपीएस अधिकारी श्री. रवींद्रनाथ पाटील आणि प्रबोधिनीचे कार्यवाह श्री. सुभाषराव देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्ञानसेतू कार्यकर्त्यांचे अनुभव कथन आणि ज्ञानसेतू कार्यशाळा घेऊन आलेल्या स्वयंसेवकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

❍ **खेळघर प्रकल्प**

शैक्षणिक उपक्रम संशोधिका व भारत फोर्ज, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील केशवनगर मध्यवस्ती व गायरान वस्ती, महात्मा फुले वस्ती या तीन वस्त्यांमध्ये 'खेळघर प्रकल्प' सुरू करण्यात आले. हडपसर येथील वंचित घटकांतील मुला-मुलींसाठी (वय ६ ते ११ वर्षे) खेळघर सुरू करण्यात आले. खेळघर या अनौपचारिक शिक्षण केंद्रात मुख्य म्हणजे विचार कौशल्य, अभिव्यक्ती कौशल्य, ऐकणे, बोलणे,



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 14 31/08/2018 3:19:42 PM

वाचणे, लिहिणे, निरीक्षण करणे या क्षमतांचा तसेच मुलांच्या जाणिवांचा विकास व्हावा यासाठी विविध उपक्रम केले गेले. महात्मा फुले वस्ती मधील खेळघरचे उद्‌घाटन भारत फोर्जचे मा. राहुल आरोळे व ज्ञान प्रबोधिनीच्या सुजाताताई होनप यांच्या हस्ते झाले. या उपक्रमात मार्गदर्शक म्हणून त्या वस्तीत किंवा त्याजवळ राहणाऱ्या शिक्षिका ताईंची निवड केली. त्यांचे दरमहा ज्ञान प्रबोधिनीत प्रशिक्षण घेतले गेले. अभ्यास, कला-छंद, व जीवन व्यवहार मुलांमध्ये यावा यासाठी पुढील काही उपक्रम घेतले गेले. चित्र काढणे, कागद काम, नाट्य, पद्य गायन, गोष्टी, बौद्धिक खेळ घेतले गेले. प्रत्येक वस्तीतील सुमारे ४० ते ५० विद्यार्थी या खेळघरात नियमित येतात. दररोज सायंकाळी वर्ग घेतले जातात, त्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्यांना नियमित पूरक आहार दिला जातो.

वर्षभरात काही विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यापैकी १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणादिन व दिवाळी फराळ करण्यात आला. १४ नोहेंबरला 'बालदिन' तीनही ठिकाणी साजरा केला. या कार्यक्रमाला श्री. राजीव नातू व श्री. प्रकाश रणनवरे यांनी मुलांशी संवाद साधला. तसेच शिवरात्री, शिवजयंती परिसरातील मंदिरात व मंडळांत जाऊन साजरी करण्यात आली. २५ डिसेंबर ला केशवनगर मध्ये ख्रिसमसच्या कार्यक्रमाला तसेच उन्हाळी सुट्टीतील शिबिराला भारत फोर्जच्या सीएसआर प्रमुख मा. लीनाताई देशपांडे यांनी भेट देऊन मुलांना मार्गदर्शन केले.

मकर संक्रांती निमित्ताने खेळघरातील मुलांच्या आईसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम केशवनगर व हडपसर येथे झाले. या निमित्ताने केशवनगरला पालक व मुलांनी एकत्रित चित्र काढली.

२६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. त्यात समूहगान, नाट्य, भाषण सादर केले. कार्यक्रमानंतर खाऊचे वाटप केले. दि. २८ फेब्रुवारीला विज्ञान दिनानिमित्ताने तिन्ही खेळघरात एकाच वेळी विज्ञान दिन साजरा करण्यात आला. ज्ञान प्रबोधिनीत चालणाऱ्या विज्ञान दलातील विद्यार्थी तसेच प्रकाश रणनवरे, विशाल गायकवाड यांनी मुलांना विज्ञानाचे प्रयोग दाखवून काही प्रयोग मुलांकडून करून घेतले. तसेच खेळघरातील मुलांच्या हस्ते 'विज्ञान प्रबोधक' या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

**❍ प्रज्ञा विकास कार्यक्रम - पुणे**

दि. १४ ते २६ एप्रिल २०१७ या कालावधीत प्रज्ञा विकास कार्यक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांचे उन्हाळी शिबिर आयोजित केले होते. बौद्धिक खेळ, गटकार्य, पद्य, चित्रपट्टीका पाहणे असा भरगच्च कार्यक्रम झाला. शिबिरातील उपस्थित विद्यार्थ्यांशी सुबोध अंकाच्या साहाय्यक संपादिका सुनिता गायकवाड यांनी संवाद साधला. तसेच दि. १७ एप्रिल रोजी एकदिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. सहलीत विज्ञान आश्रम, पाबळ व शिवनेरी किल्ला इ. ठिकाणी भेटी झाल्या. एकूण ८७ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. सन १७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रज्ञा विकास कार्यक्रमाची सुरुवात वर्षारंभ कार्यक्रमाने झाली. मुलांनी वैयक्तिक संकल्प केले. वर्षारंभ उपासना झाल्यावर विद्यार्थ्यांमध्ये आपण ठरवून प्रगती करू शकतो. असा आत्मविश्वास प्राप्त झाला.

दिवाळीच्या सुट्टीमध्ये दिनांक २७ ते २९ ऑक्टोबर मधील शिबिरात एकूण ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते. यात मुख्यतः बौद्धिक विकसन, विज्ञान प्रयोग, विविध कलाकृती, खेळ व क्राफ्ट इ. सत्रे झाली. मेकर स्पेस मध्ये बर्ड हाउस, पेन स्टँड तयार केले. रंगीत कागदाच्या पिशव्या तयार करणे. फिल्म पाहणे अशी सत्रे झाली. प्रज्ञा मानस संशोधिकेच्या नीलिमाताई पाठक यांनी करिअर मार्गदर्शन केले. नौदलातील माजी अधिकारी प्रमोद महाजन यांनी त्यांचे अनुभव कथन केले. टिळक स्मारक मंदिरात झालेल्या ओरिगामी प्रदर्शनाला मुलांनी भेट दिली. त्याठिकाणी काही नवीन गोष्टी समजून घेतल्या. डॉ. अनिल अवचट यांच्याशी मुलांच्या गप्पा झाल्या. एक दिवसाची जनता वस्तीतील मुलांसह मुक्कामी तोरणा गड साहस व अभ्यास सहल झाली. सामाजिक प्रश्नांचा अभ्यास, विज्ञान चर्चा व प्रयोग, विक्री अनुभव, धडपड प्रयोगशाळा इत्यादी अनुभव वेळोवेळी देण्यात आले.

**वाचन प्रेरणा दिन -** दिवाळीच्या सुट्टीत दिनांक १५ ऑक्टोबर ला तीनही वस्त्यांमध्ये वाचन प्रेरणा दिन छात्र प्रबोधन दिवाळी अंकाचे वाचन करून साजरा करण्यात आला. तसेच दिवाळीचा फराळ वस्तीतील मुलांना देऊन दिवाळी साजरी करण्यात आली.

**आयसर चित्रकला स्पर्धा व विज्ञान प्रदर्शन -** दि. ११ नोहेंबर रोजी आयसर येथे झालेल्या चित्रकला स्पर्धेत २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यानंतर डॉ. मिलिंद वाटवे यांचे व्याख्यान झाले. तसेच दि. १८ नोहेंबरला ८० विद्यार्थी आयसर मध्ये विज्ञान प्रदर्शन पाहायला गेले होते. तेथे पाहिलेली काही मॉडेल्स वर्गात पुन्हा करून पाहिली. आयसर मध्ये दरमहा योजलेल्या काही व्याख्यान सत्रांना मुलांनी हजेरी लावली. त्यात प्लास्टिक पुनर्वापर, अणु संरचना, इ.

**पालक सभा व पालक भेटी** - इयत्ता १०वीच्या पालकांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या छोट्या सभा झाल्या. वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या घरी पालकांच्या भेटी घेतल्या. तसेच १०वीच्या विद्यार्थ्यांना सरावासाठी प्रश्नपत्रिका देण्यात आल्या. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा पत्र व परीक्षेच्या काळात करावयाचा अभ्यास पुस्तिका विद्यार्थ्यांना देऊन शुभेच्छा दिल्या.

**अभ्यास सहली** - इयता ९ व १०वीतील विद्यार्थ्यांनी करिअर अभ्यास सहलीसाठी आय. टी. आय., औंध तसेच ज्ञानदा प्लंबिंग इन्स्टिट्यूटला ३० विद्यार्थ्यांनी भेट दिली. त्याठिकाणी सुरू असलेल्या अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांनी करून घेतली.

कोरेगाव भीमाला दंगल झाल्यानंतर तीन दिवसांनी आपल्या विद्यार्थ्यांनी तिथे भेट दिली. एकूण सामाजिक परिस्थिती


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 15 31/08/2018 3:19:42 PM

समजून घेतली. असे वाद का होतात याचा विचार केला. पुन्हा होऊ नये यासाठी काही मुद्दे सुचविले.

**फिलिप्स कंपनी भेट –** दि. २३ मार्च रोजी चाकण येथील फिलिप्स कंपनीला इयता ९वी व १०वी तील विद्यार्थ्यांची सहल झाली. दहावीच्या विद्यार्थ्यांना पुढच्या करिअरची निश्चिती करताना विविध भेटींचा उपयोग होतो. या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. दहावीच्या विद्यार्थ्यांची नुकतीच दहावीची परीक्षा संपली होती. तर इयता ९वीची सराव परीक्षा सुरू होती. शाळेतून परवानगी घेऊन मुले-मुली यात सहभागी झाली होती. एकूण ४३ विद्यार्थी फिलिप्स कंपनी पाहायला आले होते.

**कुमार साहित्य मेळावा –** केशवनगर केंद्रावर कुमार साहित्य मेळावा झाला. त्यात लेखन, काव्यपूर्ती, कोडी, संवादपूर्ती, प्रश्नमंजुषा, अशा खूप साऱ्या गोष्टी झाल्या. सुनिताताई गायकवाड (सहसंपादक, सुबोध छात्र प्रबोधन) यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्यासाठी श्री. ओंकार बाणाईत (प्रकल्प समन्वयक) उपस्थित होते.

**गटकार्य स्पर्धा –** दिनांक ३ फेब्रुवारी ला 'स्मार्ट पुणे सिटी' या विषयावर गटकार्य स्पर्धा झाली. त्यात पुणे शहरातील १४ शाळांनी सहभाग नोंदविला होता. आपल्या तीनही वस्तीतील तीन गटात विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. नवीन कल्पना मांडून त्याचे सादरीकरण केले. प्रज्ञा विकास फिल्म -"students telling a story' ही शॉर्ट फिल्म यावर्षी तयार झाली.

❍ **प्रज्ञा विकास कार्यक्रम रोहा**

एक्सेल इंडस्ट्री रोहा व शैक्षणिक उपक्रम संशोधिकेच्या माध्यमातून २०१५ साली रोहा तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास कार्यक्रमाची सुरुवात झाली. इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू झालेला हा कार्यक्रम यावर्षी तिसऱ्या वर्षात होता. त्यामुळे त्यात सहभागी विद्यार्थी यावर्षी इयत्ता १०वीच्या वर्गात होते. तीन वर्षाने हा कार्यक्रम शाळेमध्ये त्यांच्या शिक्षकांनी पुढे चालू ठेवावा ही अपेक्षा होती. यासाठी, इयता ८वीच्या आशयाचे प्रशिक्षण प्रा. प्रशांत दिवेकर व प्रा. ओंकार बाणाईत यांनी शाळेतील शिक्षकांना दिले. विर्जोली, घोसाळे, सानेगाव, शेणवी, खांब, चिले या सहा शाळेतील सुमारे ३५० विद्यार्थ्यांना त्याचा लाभ झाला.

इयता ९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रज्ञा विकास कार्यक्रमात स्वयं अध्ययन कौशल्ये, कृती द्वारा विज्ञान व समाज अभ्यास, संभाषण कौशल्ये, विचार कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकसनासाठीचे उपक्रम, गटकार्य, सहाध्याय भेटी, नेतृत्व कौशल्ये, दहावी नंतरच्या करिअरच्या वाटा, तसेच दहावीच्या परीक्षेच्या दृष्टीने सराव पेपर घेतले. इयत्ता ९वी व १०वीतील एकूण १६० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

इयत्ता १०वीच्या वार्षिक बोर्डाच्या परीक्षेची चांगली तयारी व्हावी यासाठी ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी प्रशालेतून शिक्षक वर्षभर मार्गदर्शनासाठी रोह्याला येत होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या शंका दूर करण्यास व परीक्षेची भीती कमी होण्यास मदत झाली. तसेच MYSSC या ई-लर्निंग सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला.

उद्योजकता विकास व संभाषण कौशल्य विकासासाठी रोह्यातील बाजारपेठांचे सर्वेक्षण, प्रश्न शोधणे व त्यावर गटात उत्तर शोधणे असे काही वेगळे उपक्रम झाले. रोह्याला ओरिगामी प्रशिक्षण घेण्यासाठी पुण्यातील प्रज्ञा विकासचा विद्यार्थी संकेत भुवडला शाळा चालू असताना मुख्याध्यापकांनी परवानगी दिली.

❍ **गणित महायज्ञ**

संपूर्ण एक दिवस फक्त गणिते सोडवण्यासाठी सहा शाळेतील इयता १०वीचे १६० विद्यार्थी एकत्रित आले. त्यांनी ३०,३१६ गणिते साडेचार तासात सोडविली. निरीक्षण कौशल्य व प्रश्न कौशल्याच्या विकासासाठीचे सत्र, तसेच २१व्या शतकातील सर्जनशील विचार काही उपक्रमातून विद्यार्थ्यांनी समजून घेतले. प्रज्ञा विकास प्रकल्प रोहा अंतर्गत इयता ८वी ते १०वी तील सहा शाळेतील वर्षभर एकूण ५१० विद्यार्थी सहभागी झाले.

ωωω

## ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी

### ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्यातील विभागांद्वारा विविध वयोगटासाठी होणारे उपक्रम

### पहिली ते पाचवीतील बालगटासाठी

१) बालविकास शिबिरे, निरंतर विकास कार्यक्रम - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४३३११११०

२) पाचवी प्रवेश - ज्ञान प्रबोधिनी प्रशाला - २४२०७१२१, क्रीडाकुल-निगडी- २७६५५२४९



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 16 31/08/2018 3:19:42 PM

## ३. छात्र प्रबोधन

| तपशील | | संख्या |
|---|---|---|
| 'नित्य' अंकाबाबत – | 'समाजभान' व 'क्रीडा' हे दोन विशेषांक प्रसिद्ध | २००० सभासद (नित्य अंक) |
| | २ लेखमाला व ७ सदरे प्रकाशित | ११,२०० सभासद (सुबोध द्वैमासिक) |
| राज्यस्तरीय हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धांचे आयोजन | | ९६ गट, ८०० विद्यार्थी |
| कुमार साहित्य मेळावे | | २६ ठिकाणी, १५०० विद्यार्थी |
| नित्य, सुबोध, इंग्रजी दिवाळी अंकांचे प्रकाशन | | ४६,००० अंकांची नोंदणी व वितरण |
| छात्र प्रबोधन नित्य दिवाळी अंकाला दोन पुरस्कार | | |
| खास कुमारांसाठी दिनदर्शिका प्रकाशित २४०० घरांमध्ये | | |
| छात्र प्रबोधनमधील साहित्यातून नवीन पुस्तके प्रकाशित | | ३ (आत्तापर्यंत पुस्तके प्रकाशित ४४) |
| वर्ग ग्रंथालय योजना | | १८८ वर्गांमध्ये चालू, ८००० विद्यार्थ्यांचा सहभाग |
| वाचक शिष्यवृत्ती योजना | | ९० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती |
| छात्र प्रबोधनमधील निवडक कथांचे 'कुमारकथा' kumarkatha या नावाचे ॲप प्ले स्टोअरवर विनामूल्य उपलब्ध! | | १०० कथा |
| छात्र प्रबोधनच्या संकेतस्थळावर २५ वर्षांचे अंक मोफत उपलब्ध! | | ३०२ अंक |

### तीन वैशिष्ट्यपूर्ण मेळाव्यांनी छात्र प्रबोधनच्या रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता

❍ **बालकुमार साहित्य संपादक मेळावा** – दि. ८ जुलै २०१७ रोजी बालकुमार साहित्य संपादक मेळाव्याचे आयोजन केले होते.

बालकुमार वयोगटासाठी साहित्य प्रकाशित करणारे ज्योत्स्ना, मनोविकास, व्यास क्रिएशन्स् इ. प्रकाशक तर किशोर, वयम्, ऋग्वेद, निर्मळ रानवारा, सृष्टिज्ञान इ. नियतकालिके चालवणारे संपादक तसेच सकाळ, लोकसत्ता, पुढारी या वृत्तपत्रांमधून बालकुमारांसाठी पुरवणी प्रसिद्ध करणारे संपादक अशा २८ जणांची या मेळाव्यात उपस्थिती होती. ज्येष्ठ लेखिका, संपादिका व पटकथाकार श्रीमती ज्ञानदा नाईक या पहिल्या सत्राच्या अध्यक्षा होत्या. या चर्चासत्रामध्ये **बालसाहित्य प्रकाशित करताना संपादकांना आलेले अनुभव व अडचणी आणि त्यावर त्यांनी केलेली मात** या मुद्द्यांचा समावेश होता. त्यात भाषेची समस्या, लेखकवर्गाची कमतरता, वितरण व्यवस्थेतील अडचणी, शासनाची उदासीनता या मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यानंतर अनेक संपादकांनी त्यांच्या मासिकाविषयी आनंददायी आठवणींनाही उजाळा दिला.

'कोणतेही मासिक लोकप्रिय होण्यासाठी संपादन कौशल्य, मुखपृष्ठाची सजावट, अंतरंग व वितरण या बाबी महत्त्वाच्या असतात. अडचणींमुळे खचून न जाता एकमेकांना सहकार्य करत बालकुमार साहित्य चळवळ पुढे नेली पाहिजे व जाणत्या लोकांचे मार्गदर्शन घेऊन सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करत राहिले पाहिजे', असे विचार श्रीमती ज्ञानदा नाईक यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले.

दुसऱ्या सत्रात '**कुमारसाहित्य चळवळीसमोरील भविष्यातील आव्हाने व उपाययोजना**' या विषयावर चर्चा झाली. त्यात नवनवीन लेखकांना कुमारांसाठी लिहिण्यास प्रोत्साहन देणे, स्वतःच्या संपर्कातील लेखक, चित्रकार यांचा संपर्क इतर संस्थांना देणे, वितरण व्यवस्थेतील दोष सुधारण्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे, मासिकाच्या आशयामध्ये काळानुरूप बदल करणे, मासिकातील चित्रकलेची सजावट, मांडणी या बाबींकडे विशेष लक्ष देणे, शासनाकडून आर्थिक साहाय्य मिळवण्यासाठी प्रयत्न करणे अशा अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

सत्राच्या शेवटी प्रबोधिनीच्या 'शिक्षण प्रभागा'चे उपकार्यवाह मा. श्री. विवेक पोंक्षे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. 'आजच्या पिढीतील किशोर वयोगटाची नेमकी मानसिकता समजून घेऊन, त्यांची अभिरुची ओळखून, त्यांच्यात वाचनाची रुची वाढेल, असे साहित्य त्यांना द्यायला हवे. त्याचसोबत Co-Creation ही काळाची गरज ओळखून त्यावर भर देत काम केले पाहिजे', असेही त्यांनी सांगितले.

'बालकुमार साहित्य चळवळ पुढे नेण्यासाठी 'छात्र प्रबोधन'चा नेहमीच सक्रीय सहभाग असेल. तसेच छात्र प्रबोधनच्या अंकात वर्षभर इतर अंकांच्या जाहिरातींसाठी एक चौकट राखून ठेवण्यात येईल', असे आश्वासन यावेळी 'छात्र प्रबोधन'चे संपादक महेन्द्रभाई सेठिया यांनी सर्वांना दिले. आनंदाची गोष्ट म्हणजे आत्तापर्यंत सात बालकुमार मासिकांचा परिचय 'छात्र प्रबोधन'मधून दिला गेला. हा उपक्रम पुढेही चालू राहील.

❍ **केंद्रप्रमुख मेळावा** – गावोगावी 'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकांची मोठ्या प्रमाणावर नोंदणी व वितरणाचे काम स्वयंस्फूर्तपणे करणाऱ्या महाराष्ट्रभरातल्या सुमारे १०० केंद्रप्रमुखांसाठी एक मेळावा दि. ३० जुलै २०१७ रोजी आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यासाठी चंद्रपूर, वरोरा, अकोला, चाळीसगाव, दौंडाइचा, साक्री, धुळे, उस्मानाबाद, कोपरगाव, बत्तीस शिराळा, सांगली, सातारा, खंडाळा, खोपोली, रसायनी, अलिबाग, चिपळूण, रत्नागिरी, ठाणे, बोरीवली, डोंबिवली, पंढरपूर, जेऊर, इंदापूर, सासवड, शिवापूर, बारामती, चिखली इ. गावांमधील ४८ सदस्यांचा सहभाग होता.


केंद्रप्रमुखांना मार्गदर्शन करताना मा. संचालक



तीन पुस्तकांचे प्रकाशन करताना मान्यवर

पहिल्या सत्राच्या सुरुवातीला 'छात्र प्रबोधन'चे संपादक महेंद्र सेठिया यांनी सर्व केंद्रप्रमुखांशी अनौपचारिक संवाद साधत गेल्या २५ वर्षांत केंद्रप्रमुखांनी केलेले सहकार्य आणि त्यांनी विस्तारासाठी केलेले प्रयत्न याची दखल घेतली. त्यानंतर सर्व केंद्रप्रमुखांची एकमेकांशी अनौपचारिक ओळख व्हावी; यासाठी गटागटांमध्ये गप्पांचा खेळ घेण्यात आला. या खेळात 'छात्र प्रबोधन'शी झालेला पहिला संपर्क, केंद्रप्रमुख म्हणून काम करताना आलेले, मिळालेले अनुभव, यांविषयी सर्वजण उत्साहाने सांगत होते व एकमेकांची ओळख करून घेत होते.

यानंतर **'छात्र प्रबोधन–काल–आज–उद्या'** या विषयावर चर्चासत्र घेण्यात आले. 'छात्र प्रबोधन' ही एक चळवळ असून ती पुढे नेण्यासाठी भविष्यात कुठल्या योजना असाव्यात यावर केंद्रप्रमुखांनी आपले विचार मांडले. जानेवारीमध्ये झालेल्या कुमार साहित्य संमेलनाची व ज्ञान प्रबोधिनीची चित्रफीत दाखवण्यात आली. त्यानंतर **'ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या विस्ताराच्या दिशा'** या विषयावर मानसीताई बोडस यांनी मांडणी केली. 'ज्ञान प्रबोधिनीच्या विविध विभागांच्या विस्तारणाऱ्या उपक्रमांची थोडक्यात माहिती दिली गेली. अधिकाधिक विभागांचे उपक्रम आपापल्या केंद्रांवरही कसे आयोजित करता येतील, यावर विचार व्हावा', असे आवाहन मानसीताईंनी केले.

'इतकी वर्षे आपण छात्र प्रबोधनच्या विस्ताराचे काम केले, आता सर्वांनी ज्ञान प्रबोधिनीच्या व्यापक चळवळीमध्ये सहभागी व्हावे', असे आवाहन त्यावेळी महेंद्रभाईंनी सर्वांना केले.

तिसऱ्या सत्राच्या सुरुवातीला ज्ञान प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीश बापट यांच्या हस्ते दिवाळी अंकांची सातत्यपूर्ण नोंदणी केलेल्या **केंद्रप्रमुखांना प्रातिनिधिक स्वरूपात कृतज्ञता सन्मानपत्र** प्रदान करण्यात आले. मा. संचालक गिरीश बापट यांनी सर्व केंद्रप्रमुखांना उद्देशून मार्गदर्शनपर भाषण केले. 'गेल्या २५ वर्षाच्या काळात 'छात्र प्रबोधन'ने **वाचन– श्रवण–कृती** या त्रिसूत्रीचा वापर करून अनेक उपक्रम आयोजित केले तसेच यापुढेही सुरू राहावेत. तसेच संपर्क वाढवण्यासाठी ई–माध्यमांचा वापर जरूर करावा. मात्र संपर्काचा जिवंतपणा टिकून राहील याकडे लक्ष द्यावे. प्रत्यक्ष भेटीवर भर द्यावा, वेळोवेळी विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जाणून घ्याव्यात व छात्र प्रबोधनचा अधिकाधिक विस्तार करावा', असे मा. संचालकांनी सांगितले. मेळाव्याचा समारोप करताना महेंद्रभाईंनी २५ वर्षातील सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले व 'पुढील काळातही छात्र प्रबोधन चळवळीचा वारसा सर्वांनी पुढे न्यावा', अशी अपेक्षा व्यक्त केली.

❍ **स्नेहमेळावा –** दि. ३० जुलै रोजी फडके हॉल, सदाशिव पेठ, पुणे येथे स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला **'वर्ग ग्रंथालय योजना'** व **'वाचक शिष्यवृत्ती योजना'** या दोन योजनांचा प्रारंभ पुण्याच्या महापौर मा. मुक्ता टिळक व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आला.

विद्यार्थ्यामध्ये वाचनाची आवड व अभिरुची निर्माण व्हावी यासाठी 'वर्ग ग्रंथालय योजना' हा उपक्रम राबवण्यात आला आहे. इयत्ता ७ वी व ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना असून त्यासाठी नाममात्र असे १० रुपये शुल्क भरून त्यांना वर्षभरात किमान ५० ते ६० छात्र प्रबोधनचे अंक वाचता येतील. अशाप्रकारे ५०० वर्ग ग्रंथालये सुरू करण्याचा संकल्प छात्र प्रबोधनचे संपादक श्री. महेंद्र सेठिया यांनी यावेळी व्यक्त केला. या योजनेसोबतच 'वाचक शिष्यवृत्ती' योजनेचाही प्रारंभ माननीयांच्या हस्ते करण्यात आला. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील २५०० गुणवान विद्यार्थ्यांना 'छात्र प्रबोधन'चे अंक वर्षभर मोफत देण्याचा संकल्पही जाहीर करण्यात आला.

दुसऱ्या कार्यक्रमात छात्र प्रबोधनच्या साहित्यातून तयार झालेल्या 'समाजशिल्पी अप्पा', 'कवितेच्या गावा' व 'चला प्रकल्प करूया!' या **३ पुस्तकांचे प्रकाशन** मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी कवियत्री अरुणा ढेरे, स्नेहालय संस्थेचे संस्थापक गिरीश कुलकर्णी तसेच उदयोजक अतुल ठकार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

तिसऱ्या कार्यक्रमात कुमारांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी यासाठी 'छात्र प्रबोधन'च्या **३०१ व्या 'समाजभान' विशेषांकाचे प्रकाशन** राज्य मराठी भाषा विकास संस्थेचे प्रभारी संचालक मा. आनंद काटीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

सातत्यपूर्ण लेखन करणाऱ्या लेखकांचा, सजावट करणाऱ्या चित्रकारांचा तसेच भरीव आर्थिक योगदान करणाऱ्या जाहिरातदार व प्रायोजकांचा कृतज्ञतापूर्वक प्रातिनिधिक सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या सोहळ्यासाठी प्रशासकीय अधिकारी, शिक्षण, संशोधन, साहित्य, प्रसारमाध्यमे इ. क्षेत्रांतील मान्यवर, लेखक, चित्रकार, जाहिरातदार, प्रायोजक, छात्र प्रबोधनचे हितचिंतक इ. २०० मान्यवर आवर्जून उपस्थित होते. त्यावेळी छात्र प्रबोधनच्या २५ वर्षांच्या वाटचालीच्या क्षणचित्रांचे प्रदर्शनही अनेकांनी आवर्जून पाहिले. औपचारिक कार्यक्रम व अनौपचारिक गप्पांचा सुरेख मिलाप या स्नेहमेळाव्यामध्ये पाहायला मिळाला.

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 18 31/08/2018 3:19:43 PM

# ४. नेतृत्व संवर्धन केंद्र

### ❍ वर्षभरातील महत्त्वाच्या घटना

**प्रशासकीय नेतृत्व–** फाउंडेशन व प्रिपरेटरी वर्गाच्या बेसिक कोर्सच्या दोन तुकड्या तर ॲडव्हान्स कोर्सची एक तुकडी पूर्ण झाली. बेसिक कोर्स आत्तापर्यंत ४-४ महिन्यांचे दोन भाग होते त्याऐवजी यावर्षीपासून वर्षभराचा कोर्स केला. त्याचा चांगला परिणाम झालेला जाणवत आहे. UPSC अभ्यासावरील भर वाढावा या दृष्टीने वर्गात अभ्यास विषय शिकविण्याबरोबरच त्या विषयाची पाक्षिक परीक्षा व प्रत्येक विषयाच्या Assignments आणि Presentations घेण्यात आले.

**शिष्यवृत्ती व अनुभव शिक्षण योजना** – आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांसाठी केंद्रातर्फे आर्थिक शिष्यवृत्ती देण्यात आली. एकूण दहा विद्यार्थ्यांना मिळून रू. ५०,०००/– शिष्यवृत्ती देण्यात आली. यावर्षी प्रथमच विद्यार्थ्यांनी प्रबोधिनीतील वेगवेळ्या विभागांमध्ये तेथील कार्यकर्त्यांसह काम करण्याचा अनुभव घेतला. त्यांनी केलेल्या कामाचे मानधनही त्या-त्या विभागामार्फत विद्यार्थ्यांना देण्यात आले. यामध्ये नेतृत्व संवर्धन केंद्र, नागरवस्ती अभ्यासगट, स्त्री शक्ती ग्रामीण यांचा समावेश होतो. साधारण तीन महिने ते एक वर्ष अशा कालावधी साठी मुलांनी काम केले.

**अभ्यास सहल** – दिवाळी व उन्हाळी सुट्ट्यांमध्ये मुलांनी स्वत:च्या सामाजिक जाणीवा विस्तारण्यासाठी, विविध प्रदेशातील सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी उपयोगात आणावी यादृष्टीने केंद्रातर्फे गडचिरोली-वर्धा, ठाणे- पालघर व गुजरात अशा ठिकाणी अभ्याससहलींचे आयोजन केले होते. यामध्ये प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भेटी, सामाजिक संस्था परिचय, राजकीय तसेच स्थानिक पातळीवरील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींच्या मुलाखती यांचा समावेश होता.

**युवोन्मेष –** युवकांसाठी नेतृत्व या विषयाला समर्पित युवोन्मेष या मासिकाचे हे दुसरे वर्ष होते. आठ मासिक अंकांसह दिवाळी अंकाचे प्रकाशन या वर्षात झाले. या मासिकांमधील विविध लेखांवर केंद्रातील विद्यार्थ्यांची चर्चा सत्रे घेण्यात आली.

**सामाजिक नेतृत्व –** यावर्षी ५ महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सामाजिक क्षेत्रातील नेतृत्व कसे असावे यादृष्टीने विविध कार्यशाळा घेण्यात आल्या. C.O.E.P. महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली गांधी वस्ती व पाटील एस्टेट, पुणे येथे ७५ विद्यार्थ्यांसाठी ८० दिवस अभ्यासिका चालवली. सिंहगड कॉलेज व फर्ग्युसन महाविद्यालयात N.S.S. मधील गटप्रमुखांसाठी एक दिवसाचे पूर्णवेळ शिबिर झाले.

**प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग –** (Faculty Development Programme) – नेतृत्व या विषयाशी संबंधित कार्यशाळा घेण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तींची आवश्यकता नेहमीच भासते. अशा प्रकारे प्रशिक्षक म्हणून काम करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी एक दिवसाचा Orientation Program घेण्यात आला.

**केंद्रातील उपक्रमांविषयी संख्यात्मक माहिती –**

| उपक्रम | विद्यार्थी व सदस्य संख्या | |
|---|---|---|
| जिज्ञासा वर्ग (Basic) | १० व ११ वी तुकडी | ११९ |
| विश्वास वर्ग | ८ वी तुकडी | २५ |
| आकांक्षा वर्ग (advance) | ५ वी तुकडी | ३३ |
| अनुभव शिक्षण योजना | ५ | |
| अभ्यास सहली व अभ्यासदौरा | ३० | |
| NSS विद्यार्थ्यांसाठी विविध सत्रे | ५०० | |
| **युवोन्मेष दिवाळी अंक** | | |
| युवोन्मेष मासिक अंक (Email द्वारा) | ३२०० | २००० |
| प्रशिक्षक प्रशिक्षण प्रारंभिक वर्ग | २७ | |

### ❍ या वर्षातील विशेष उपक्रम – साहस शिबिर

जिज्ञासा (बेसिक) वर्गाच्या विद्यार्थ्यांमध्ये फाउंडेशन उपक्रमांपैकी 'साहस शिबिर' विषयी विशेष उत्सुकता असते. आधीच्या वर्गातील विद्यार्थ्यांकडून ऐकलेले शिबिराचे चित्तथरारक अनुभव त्यात भर घालतात आणि कधी एकदा आपण साहस शिबिराला जाणार असे मुलांना वाटू लागते.

या वर्षीचे साहस शिबिर दि. १४ ते १७ डिसेंबर या कालावधीत केळद येथे संपन्न झाले. ३१ मुली व ७ मार्गदर्शिका मुलींच्या शिबिरात तर ३९ मुले व ८ मार्गदर्शक मुलांच्या शिबिरात सहभागी झाले. या शिबिराच्या निमित्ताने मुलांनी त्यांच्या मनात उंची, अंधार, पाणी, एकटेपणा इ. विषयी जी भीती दडलेली असते त्यावर मात करण्याचा प्रयत्न केला. या शिबिरात विविध साहसी क्रीडा प्रकारांचा समावेश होता. जसे की —

**Rapling –** केळद येथील मढेघाटातील धबधब्या शेजारील सुमारे १२५ फुटांच्या कड्यावरून दोरीच्या साहाय्याने उतरण्याचा चित्तथरारक अनुभव विद्यार्थ्यांना एक वेगळाच आत्मविश्वास देऊन गेला. गिरीप्रेमीच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी यासाठी मार्गदर्शन केले.

**Boxing –** मार देण्याबरोबरच मार खाण्याचाही अनुभव आलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्याचा धडा देणारा ठरला. प्रसंगी अरे ला कारे म्हणण्याची क्षमता आपल्या अंगी पाहिजे ही जाणीव विद्यार्थ्यांना झाली.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 19 31/08/2018 3:19:43 PM

**रात्रभ्रमंती –** एकट्याने अंधारात चालत जाणे अनेकांना त्यांच्या मनातील भीतीवर मात करायला शिकवणारे-आत्मविश्वास वाढविणारे ठरले.

**मिनी एन्डयुरो–** मुख्यत: गटाने पार पाडायची ही शर्यत गटातील सर्वांना बांधून ठेवणारी तसेच सर्वांच्या शारीरिक व मानसिक क्षमतांची बेरीज करणारी ठरली. शर्यत पार करण्यासाठी दिलेली कार्ये वेळेत पार करण्यासाठी पथकांमध्ये चांगलीच चुरस लागली होती. सर्किट रिले– विविध अडथळे पार करण्याच्या या क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेचा पुरेपूर कस लागला.

❍ **अनुभवकथन –** आपल्या प्रशालेचे २००२ च्या तुकडीतील विद्यार्थी, मेजर नरेंद्र कुलकर्णी यांनी मुलांच्या शिबिरात अनुभवकथन केले. मा. महेंद्रभाई यांनी मुलांच्या शिबिरात तर वंदना कामठे यांनी मुलींच्या शिबिरात 'शारीरिक विकसन' या विषयाचे सत्र घेतले. वेल्हे येथील वसतिगृहातील दोन युवती पूर्णवेळ तर आणखी दोघी Rapling साठी शिबिरात सहभागी झाल्या. नेतृत्व संवर्धन केंद्राचे माजी विद्यार्थी (४ मुली व २ मुले) मार्गदर्शक म्हणून शिबिरात सहभागी झाले. माजी विद्यार्थ्यांनी शिबिर घेण्यासाठी येण्याची एक नवीन सुरुवात यामुळे झाली. विविध साहसी प्रकारांमधून वाढलेला आत्मविश्वास गाठीशी बांधून विद्यार्थी शिबिरातून परतले.

जिज्ञासाच्या पहिल्या तुकडीपासून ते आत्ता अकराव्या तुकडीपर्यंत आपण साहस शिबिर घेतले आहे. या सगळ्या अनुभवातून शिबिरात घेण्यात येणाऱ्या activities मध्ये अधिक नेमकेपणा यावा यासाठी विशेष प्रयत्न डिसेंबर २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या शिबिराच्या वेळी करण्यात आले. प्रत्येक activity घेण्यामागील हेतू, त्यासाठी लागणारे साहित्य, ती activity प्रत्यक्षात कशी होणार याची प्रक्रिया (process), activity कशी करायची यासंदर्भात मुलांना द्यायच्या सूचना याविषयी लेखन झाले. यामुळे activities ची परिणामकारकता वाढविण्यासाठी खूपच मदत झाली.

**साहस शिबिराविषयी विद्यार्थ्यांच्या काही बोलक्या प्रतिक्रिया**

1. Bhupendra Lad (Jidnyasa-१०) – Adventure Camp as the name says was full of adventures. First time in my life I attended such a camp and one thing is for sure 'Life is incomplete without adventures.' All the experiences starting from Night Walk to rappelling were new for me and I have enjoyed them to the best of my heart. The lessons the activities gave me directly or indirectly were such awesome that I wouldn't have learnt them in the four walls of classroom

२. ज्योती खरे (जिज्ञासा १०) – Rapling चा हा माझा पहिलाच अनुभव होता. मुठीत Rapling चा दोर गच्च धरून खाली उतरताना 'जीव मुठीत धरणे' या वाक्प्रचाराचा अर्थ काय याचा आम्ही प्रत्यक्ष अनुभव घेतला. या अनुभवावरून आम्ही भीतीवर मात करायला शिकलो. Rapling करून खाली उतरलो तेव्हा आपण हे साहस यशस्वीपणे पार पाडल्याचा आनंद आणि I can do it हा आत्मविश्वास जाणवला, जो शिबिरातील इतर activities पार पाडण्यासाठी साहाय्यक ठरला. Boxing – आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार प्रत्येकाला करता आला पाहिजे, ती हिंमत आपल्यात निर्माण झाली पाहिजे हा या activity मागचा उद्देश होता असे मला वाटते. यापूर्वी भावंडांसोबत मारामारी केली पण Boxing Gloves घालून आपल्याच मैत्रिणीला कसलीही दया-माया न दाखवता मारण्याचा हा पहिलाच अनुभव होता. यात मारण्याबरोबरच मार खाण्याचा देखील चांगलाच अनुभव आला. सगळ्यांनी (विशेषत: मुलींनी) शरीरिकदृष्ट्या सबल असण्याची किती गरज आहे हे जाणवले.

३. सलोनी गावडे (जिज्ञासा १०) – Night Task – हा अनुभव तर केवळ अविस्मरणीय! तुम्ही तुमच्या ४-५ साथीदारांसह जंगलात जाऊन अत्यंत limited sources मध्ये चार तास तिथे stay करणे, स्वत:चे अन्न स्वत: चुलीवर शिजवून खाणे, चुलीसाठी लाकडे, गवत गोळा करणे, चूल विझल्यावर पुन्हा पेटवणे, पातेले मातीने लिंपणे अशी कामे काळोख्या रात्री करणे म्हणजे केवळ अविस्मरणीय अनुभव... साहसाने भरपूर, आनंद देणारं तरीही भीतीदायक. याच भीतीचं दुसऱ्या दिवशी अप्रूप नव्हते कारण आम्ही त्या भीतीवर मात केली होती.

४. ऐश्वर्या जगताप (जिज्ञासा११) –मिनी एन्डयुरो – ही माझी आवडती activity होती कारण गेल्या तीन दिवसांत जे काही केले त्याचा एकत्रितपणे कस येथे मला लावावा लागला. यातून मला जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट कळली की आपण शेवटच्या मिनिटापर्यंत- सेकंदापर्यंत प्रयत्न करावे. हार न मानता जे कोणी पुढे चालले आहे त्यांना न घाबरता आपल्याला यश कसे मिळेल याचा विचार करावा

**सर्किट रिले–** वेग, चपळाई, Team work, Team Coordination, नियोजन, नियमित व्यायाम याचे महत्व या activity मधून समजले.

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 20 31/08/2018 3:19:43 PM

# ५. स्पर्धा परीक्षा केंद्र

## नियमित उपक्रम

**प्रशिक्षण वर्ग**

- UPSC Comprehensive व Facilitation Batch (UPSC नियमित वर्ग):

१) या वर्षभराच्या वर्गांमधे UPSC २०१८ ची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विषय अध्यापनाबरोबरच अभ्यास कौशल्य, वृत्तीघडण, क्षमता विकास उपक्रम सत्रे घेण्यात आली.

२) दोन्ही वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभरात समुपदेशनाच्या तीन फेऱ्या प्रा. सविताताई, वा. विवेकराव, डॉ. कौस्तुभसर यांनी घेतल्या.

३) अंतिम परीक्षेची उत्तम तयारी व्हावी म्हणून दोन्ही वर्गांच्या संपूर्ण गुणांच्या अठरा सराव चाचण्या झाल्या. त्यातील गुणांचे विश्लेषण करण्यात आले.

४) News Circle या उपक्रमामध्ये वर्तमानपत्र वाचन, बातम्यांचे विश्लेषण, गटचर्चा व वक्तृत्व याविषयीचे मार्गदर्शन तीन गटांमधे, प्रत्येकी १२ सत्रांमध्ये विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आले. प्रा. शशि गोडबोले यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली ही सत्रे अत्यंत प्रभावी झाली.

५) Mentors Guidance - UPSC मुख्य परीक्षा देऊन मुलाखतीची तयारी करणाऱ्या २० विद्यार्थ्यांनी नियमित वर्गाच्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले. या उपक्रमात चार विद्यार्थ्यांच्या गटाला एक mentor अशी योजना केली होती. दर शनिवारी उपासनेनंतर हे विद्यार्थी गटाशी भेट घेऊन मार्गदर्शन करत होते. आठ ते दहा वेळा अशा भेटी झाल्या. यामुळे नियमित वर्ग विद्यार्थ्यांना अभ्यासातील वैयक्तिक अडचणी सोडवण्यास तत्काळ मदत झाली.

- UPSC Mission Mains २०१७ Batch : पूर्व परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर Mission Mains चे वर्ग घेण्यात आले. २०१६ च्या परीक्षेतून निवड झालेल्या १७ विद्यार्थी अधिकाऱ्यांनी या वर्गासाठी मार्गदर्शन केले. यामध्ये महत्त्वाच्या संकल्पनांवर चर्चा, UPSC अपेक्षित उत्तरे लेखन व त्यावर चर्चा झाल्या.

- **UPSC मुलाखत प्रशिक्षण वर्ग (प्रेरणा १७) :** UPSC मुख्य परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुलाखत प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व जडण-घडण, गटचर्चा, गटमुलाखती, अनुभव शिक्षण असे उपक्रम घेण्यात आले. यामधे ग्रामभेटी, राज्यभेटी अभ्यासदौरे विद्यार्थ्यांनी केले. प्रत्येक विद्यार्थ्याला Bio-data आधारित वैयक्तिक मार्गदर्शन विवेकरावांनी केले. तसेच एक विशेष व्याख्यानमाला घेण्यात आली. व्याख्यानमालेचे मान्यवर व विषय खाली तक्ता स्वरुपात ----

| मान्यवर | विषय |
|---|---|
| १) श्री. महेश भागवत (IPS, Commissioner, तेलंगणा) | How to prepare and Face interview 1 |
| २) श्री. संग्राम गायकवाड (IRS, Commissioner, Income Tax) | How to prepare and Face interview 2 |
| ३) श्री. अभिजित राऊत (IAS, Maharashtra) | How to prepare and Face interview 3 |
| ४) श्री. निसर्ग हिवरे (IAS, आसाम) | How to prepare and Face interview 4 |
| ५) डॉ. विवेक कुलकर्णी | How to prepare and Face interview 5<br>Personality Profiling 2 |
| ६) प्रा. सविता कुलकर्णी | Personality Profiling 1 |
| ७) श्री. रविद्रनाथ पाटील (Ex. IPS, Cyber Crime Expert) | How to face interview (Psychological Aspect) |
| ८) श्री. किरण गित्ते (IAS, CEO, PMRDA) | Urban Infrastructure |
| ९) सौ. शीतल उगले (IAS, Addn. Commisioner, Pune MC) | Collectorate working and onfield experiences |
| १०) सौ. प्रेरणा देशभ्रतार (IAS, Addn. Commisioner, Pune MC) | ZP working and onfield experiences |
| ११) श्री. सुवेझ हक (IPS, SP, Pune Rural) | SP Pune Rural (visit to office) |
| १२) श्री. सुभाषराव देशपांडे | Rural Development Issues |
| १३) सौ. सुवर्णा गोखले | Gender Budgeting/ Women Issues |

❊ वर्गसंख्या व कालावधी तक्ता:

| वर्ग | विद्यार्थी संख्या | कालावधी |
|---|---|---|
| Comprehensive Batch | ७४ | १९ जून २०१७ - ५ मे २०१८ |
| Facilitation Batch | २७ | २४ जून २०१७ - ५ मे २०१८ |
| Mission Mains २०१७ | ७८ | २६ जून -२५ ऑगस्ट २०१७ |
| Prerana १७ | २८ | फेब्रुवारी २०१८ |

**संचालक बैठक, वर्षारंभ उपासना व पालक मेळावा :**

दि. १ जुलै २०१७ रोजी संचालकांबरोबर कार्यालय सदस्य व शिक्षक अशा दोन बैठका झाल्या. त्याच दिवशी UPSC च्या वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षारंभ उपासना झाली. Comprehensive व Facilitation Batch च्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा व पालकांशी संचालकांचा संवाद असा कार्यक्रम झाला.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 21 31/08/2018 3:19:43 PM

**संचालक बैठक :** सर्व कार्यालयीन सदस्यांबरोबर संचालकांची बैठक घेण्यात आली. बैठकीत संचालकांनी सर्व सदस्यांची सविस्तर ओळख करून घेत त्यांच्या कामाचे काही तपशील जाणून घेतले. तसेच आपल्या कामामधे सर्वसाधारण प्रबोधिनीपण आणण्यासाठी आपण काय करू शकतो या विषयीचे मार्गदर्शन सदस्यांना केले. तसेच यंदाच्या तीन वर्गांना शिकवणारे सर्व विद्यार्थी अध्यापक व अधिकारी, समन्वयक यांच्या समवेत बैठक घेण्यात आली. शिक्षकांचा प्रबोधिनीत शिकण्याचा व शिकवण्याचा अनुभव यावर संचालक तपशीलवार बोलले. त्याचबरोबर संस्था/संघटना यांची यंत्रणा, मध्यवर्ती रचना, त्यावर काम करणाऱ्या सदस्यांचा संवाद संपर्क याविषयी संचालकांनी अध्यापकांबरोबर चर्चा केली. काही अध्यापकांनी Theoretical तर काहींनी Practical अनुभवांवर चर्चा केली.

वर्षारंभाला जोडूनच पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पालक मेळाव्यात वा. विवेकरावांनी Know your Self, Know your System, Know your Society या सूत्राच्या आधारे विद्यार्थ्यांसाठी केले जाणारे उपक्रम सांगितले. या अनुषंगाने Knowledge, Skill Training, Ability and Attitude building करत असलेल्या सर्व उपक्रमांची ओळख करून दिली. या परीक्षेचे वेगळेपण, परीक्षांसाठी द्यावा लागणारा वेळ, यातील आव्हाने, मानसिक उसंत यांचा आवर्जून उल्लेख विवेकरावांनी केला. तसेच विद्यार्थ्यांना या ठिकाणी आम्ही मार्गदर्शन करीत आहोत, दिलासा व आधार देत आहोत, तसाच पालक म्हणून आपलाही आधार महत्त्वाचा असतो. कोणताही भावनिक ताण मुलांना देऊ नये. त्यांच्याशी उत्तम संवाद साधावा असे आवाहन विवेकरावांनी पालकांना केले. UPSC २०१६ परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम व देशात ११वी आलेली आपली विद्यार्थिनी विश्वांजली गायकवाड हिने पालकांशी संवाद साधला. पालकांशी बोलताना ती म्हणाली की, 'माझ्या पालकांनी माझ्यावर विश्वास दाखवला म्हणून मी मुक्त मनाने अभ्यास करू शकले. परीक्षेच्या काळात होणारे मानसिक चढउतार यात प्रबोधिनी व पालक यांची मोलाची मदत झाली. त्यामुळे Temperament राखण्यास मदत झाली.

## शुभेच्छा व अभिनंदन

आपल्या केंद्राचे विद्यार्थी श्री. संतोष वैद्य (IAS, १९९८), (AGMUT) यांची जागतिक बँकेत ज्येष्ठ सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. ही आपल्या सर्वांसाठी एक आनंदाची व अभिमानाची बाब आहे. या निमित्ताने वैद्य यांचा पारिवारिक कौतुक व शुभेच्छा कार्यक्रम ज्ञान प्रबोधिनी मध्ये मा. यशवंतराव लेले यांच्या हस्ते सत्कार करून करण्यात आला. या कार्यक्रमासाठी दिल्लीहून श्री. श्रीकर परदेशी (Director, PMO) उपस्थित होते. प्रबोधिनीचे मा. संचालक, मा. कार्यवाह, प्रबोधिनीचे नवे-जुने सदस्य, अनेक ज्येष्ठ अधिकारी, केंद्राचे विद्यार्थी, विशेष म्हणजे पुण्यात नियुक्त असणारे विद्यार्थी अधिकारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. सर्वांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आनंद घेतला. सत्कारानंतर उपस्थित सर्व अधिकाऱ्यांचे अनुभव कथन झाले.

UPSC २०१६ चा अंतिम निकाल दि. २ जून ला जाहीर झाला. महाराष्ट्रात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९० हून अधिक असून त्यापैकी केंद्रातील ३६ विद्यार्थी प्रशासकीय सेवेसाठी निवडले गेले. तसेच MPSC, CAPF, IFS (Indian Forest Service), Maharashtra Forest Service, Provident Fund, RBI, NABARD, Other Bank Exams या सर्व परीक्षांचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या तक्ता स्वरुपात खालील प्रमाणे-

| Exams | Posts | Success |
|---|---|---|
| UPSC Civil Services २०१६ | IAS, IPS, IRS | ३६ |
| MPSC २०१६ | DC,Dy.SP, Tahsildar, BDO | २३ |
| UPSC-CAPF २०१६ | CISF,CRPF,BSF, SSB | १० |
| Indian Forest Service २०१६ | IFoS | ५ |
| Maharashtra Forest Service २०१६ | MFoS | ५ |
| Provident Fund | Assistant Commissioner | ३ |
| Reserve Bank Of India, | (RBI-GradeB)+ NABARD | ८ |

## अभ्यास सहली व दौरे - अनुभव शिक्षण

### ❍ हिवरे बाजार व स्नेहालय भेट

Comprehensive व Facilitation Batch च्या १०० विद्यार्थ्यांची अभ्यास सहल हिवरे बाजार व स्नेहालय येथे गेली होती. हिवरे बाजार आदर्श गावदर्शन केले, सरपंचांच्या कार्यालयातील पारितोषिके पाहून मुले भारावून गेली. हिवरे बाजारचे उपसरपंच श्री. मोहनराव छत्तर यांनी हिवरे बाजारचा गत आयुष्याचा संपूर्ण पट विद्यार्थ्यांशी बोलताना मांडला. हाताला काम, पोटाला अन्न, देहाला वस्त्रे एवढीच अपेक्षा करीत झगडणारा समाज आणि समाजाचा दुसरा घटक स्नेहालयाच्या रूपाने विद्यार्थ्यांसमोर आला. श्री. गिरीश कुलकर्णी यांनी उभारलेले स्नेहालय पाहात असताना आपण ज्या प्रशासनाचा भाग बनू इच्छितो त्यामध्ये किती समाजभान व सहवेदना असणे आवश्यक आहे याची प्रकर्षाने जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

### ❍ ग्रामभेटी

अभ्यासिका सदस्य व प्रेरणा वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी अनुभव शिक्षण उपक्रम दि. २५ व २६ जानेवारी रोजी घेण्यात आला. एकूण ३६ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होते. तालुक्यातील आठ गावांमध्ये जाऊन तेथील गाव परिस्थितीचा तालुका



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 22 31/08/2018 3:19:44 PM

योजनांचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी तेथील महिलांची सभा घेतली. महिलांनी त्यांना येणाऱ्या प्रश्नांवर मोकळेपणाने चर्चा केली. २६ जानेवारीला ग्रामसभेत विद्यार्थी सहभागी झाले. परत आल्यावर विद्यार्थ्यांनी ग्रामभेटीची निवेदने तयार करून चालू वर्गाच्या विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण केले.

**❍ छत्तीसगड अभ्यास दौरा व स्पर्धा परीक्षा शिबिर :**

UPSC मुख्य परीक्षा दिलेला विद्यार्थ्यांचा अकरा जणांचा एक गट छत्तीसगडला जिल्हा अभ्यास दौऱ्याकरिता जाऊन आला. छत्तीसगडची राजधानी रायपूर मध्ये पोहोचल्यावर तेथील द्रुतगती सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रकल्प आणि नया रायपूर सारखे आधुनिक शहर विद्यार्थ्यांना पहावयास मिळाले. दि. १७ ते १९ डिसेंबर 'स्पर्धा परीक्षा जागृती शिबिर' सेंट्रल लायब्ररी, रायपूर येथे आयोजित केले होते. १०० विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले. या शिबिराच्या समारोपात केंद्राचे ज्येष्ठ विद्यार्थी अधिकारी श्री. निलेश क्षीरसागर (मुख्य कार्यकारी अधिकारी, रायपूर) व उपजिल्हाधिकारी यांच्याकडून विद्यार्थ्यांना अनेकविध अनुभव ऐकण्यास मिळाले. दि. १९ व २० डिसेंबरला केंद्राच्या विद्यार्थ्यांनी बस्तर जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या जगदलपूरमधे स्पर्धा परीक्षा जागृती शिबिर घेतले. ५० विद्यार्थ्यांनी शिबिरात सहभाग घेतला. केंद्राचे ज्येष्ठ विद्यार्थी अधिकारी श्री. आरिफ शेख (जिल्हा पोलीस अधीक्षक) व श्री. सुंदरराजन पी (उपपोलीस महासंचालक) यांनी नक्षलवाद, त्याचा उगम, प्रसार, बिमोडासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना, प्रतिमा बांधणी इत्यादी घटनांवर विस्तृत मार्गदर्शन केले.

नक्षलवादाचे प्रमुख ठिकाण असणाऱ्या दंतेवाडा व विजापूरला विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. 'बचपन बनाओ' चा शिक्षण प्रकल्प, 'आदिम' या नावाने ओळखला जाणारा सेंद्रिय शेती प्रकल्प विद्यार्थ्यांनी पहिला. या दौऱ्यामुळे नक्षलवादाचे विविध पैलू विद्यार्थ्यांच्या समोर आले. प्रसारमाध्यमांच्या एककल्ली वृत्तांत कथनामुळे समाजात दृढ होणाऱ्या गैरसमजुती समोर आल्या. तेथील उपक्रमांमधून वैयक्तिक व संस्था स्तरावर उपयुक्त अशा नवीन कल्पना, तसेच सरकारी यंत्रणा व त्यांचे कार्य जवळून पहावयास मिळाले. बिजापूरचे कलेक्टर डॉ. अय्याज तांबोळी यांच्या कल्पक सुप्रशासनाची कहाणी प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली.

**❍ ईशान्य भारत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :**

अरुणाचल प्रदेश राज्यसेवा आयोगा (APPSC) तर्फे घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी UPSC मुख्य परीक्षा दिलेल्या अकरा विद्यार्थ्यांचा गट अरुणाचल येथे गेला होता. इटानगर, तेजू, नहरलगून या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांनी APPSC मुख्य परीक्षा मार्गदर्शन वर्ग घेतले. पुढे आसाम, त्रिपुरा, मेघालय असा अभ्यास दौरा होता या दौऱ्या दरम्यान तेथील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय घडामोडी, भौगोलिक स्थितीची विविधता विद्यार्थ्यांना जवळून पाहता आल्या.

ईशान्य भारत दौऱ्यादरम्यान केंद्राचे विद्यार्थी अधिकारी विशाल सोलंकी (IAS, Secretary to CM, आसाम), वैभव निंबाळकर (IPS, SP,माजूली), अभिजित सप्तर्षी (IPS, DCP, आगरतळा), तसेच इतर अधिकारी सागर सिंग (IPS, SP, इटानगर), डॉ. जोरम् बेगी (CIC, अरुणाचल), मिलिंद रामटेके (DM, अरुणाचल), प्रिन्स धवन (IAS) यांच्या भेटी झाल्या. अधिकाऱ्यांसमवेत चर्चेदरम्यान ईशान्य भारताचे वैविध्य, प्रशासनात असणारी आव्हाने, योग्य कृती या विषयीची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

**❍ UPSC/JKPSC मार्गदर्शन वर्ग, कुलगाम (जम्मू–काश्मिर) :** जम्मू-काश्मिर प्रशासन व ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र यांचा संयुक्त प्रकल्प म्हणजे प्रबोधिनीच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी चालणाऱ्या अनेक उपक्रमांपैकी एक महत्त्वाचा उपक्रम. केंद्राचे माजी विद्यार्थी अधिकारी श्री. श्रीधर पाटील (IPS, SSP, कुलगाम) यांच्या कल्पनेतून UPSC पूर्व परीक्षा वर्ग सुरू करण्यात आला. या मार्गदर्शन केंद्रामध्ये दर शनिवारी व रविवारी पुण्यातून ज्ञान प्रबोधिनीचे दोन विद्यार्थी मार्गदर्शक शिकवण्यासाठी जात होते. एकूण दहा आठवड्यांचे नियोजन केले. तेथील सरासरी ५० विद्यार्थी उपस्थित होते. पूर्व परीक्षेचे सर्व विषय व चालू घडामोडी, केंद्रात शिकवली जाणारी अभ्यास कौशल्ये, तंत्रे, मूल्यमापन, अवलोकन यांचे मार्गदर्शन तेथील विद्यार्थ्यांना करण्यात आले. प्रत्येक शनिवारी आधीच्या आठवड्यातील आशयावर सराव परीक्षा व चर्चा झाली. तसेच तेथील विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका रचना दोन विद्यार्थी शिक्षकांनी आठ दिवस तिथे राहून करून दिली. सविताताई व अन्य शिक्षकांचे Videos पण वापरण्यात आले. जाणाऱ्या मार्गदर्शकांना तेथील अधिकाऱ्यांचे काम, तेथील तरुणांची स्थिती आणि काश्मीर प्रश्नांचे बारीक खाचखळगे हे सर्व जवळून अनुभवता आले. कुलगाम जिल्ह्याचे SSP श्री. श्रीधर पाटील व श्रीनगर शहराचे Add' Collector डॉ. सागर डोईफोडे यांच्या भेटी विद्यार्थ्यांना बरेच काही शिकवून गेल्या. अधिकाऱ्यांच्या समोरील आव्हाने व काम करण्याची संधी ह्या इतर राज्यांपेक्षा कशा वेगळ्या आहेत हे अनुभवता आले. या प्रकल्पामुळे तेथील विद्यार्थ्यांची आणि तरुणांची मनःस्थिती जाणून घेता आली. तेथील विद्यार्थ्यांना शिकण्याची आवड आहे आणि त्यांच्यात क्षमताही आहेत. फक्त योग्य दिशेने ऊर्जा मार्गीकृत करून, त्यांच्यासाठी नव्या संधी उपलब्ध करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी काश्मीरची सुंदरता पाहिली, काश्मीरमधे होणारी दगडफेकही पाहिली, गजबजलेल्या बाजारपेठा आणि अचानक काही तासात होणारी भयाण शांतता ही अनुभवली. या संमिश्र अनुभवातून विद्यार्थ्यांना एक मात्र शिकण्यास मिळाले की, भारताच्या इतर भागात बसून काश्मिर प्रश्नांवर भाष्य करून, त्यावर अंदाज बांधण्याइतपत काश्मिर सोपा नाही.

## अन्य उपक्रम

**१) राज्यसेवा अधिकारी भेटी व मुलाखती उपक्रम** – दिवाळीच्या सुट्टीत UPSC नियमित वर्गाच्या विद्यार्थ्यांचा



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 23 31/08/2018 3:19:44 PM

राज्यातील विविध जिल्ह्यांत कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या भेटी व मुलाखतीच्या स्वरूपात गप्पा असा उपक्रम झाला. अधिकाऱ्यांचे कामाचे अनुभव, आत्तापर्यंत झालेल्या बदल्या, तेथील अनुभव, त्यांच्या कामाची पद्धत व परीक्षा देताना अभ्यास कसा करावा याबद्दल विद्यार्थ्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यामुळे विद्यार्थ्यांना खूपच प्रोत्साहन मिळाले व अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा अनुभव मिळाला. एकूण २५ जिल्ह्यांमधून ४५ अधिकाऱ्यांना वर्गाचे ६५ विद्यार्थी भेटले.

**२) भोंडला–** नवरात्रीनिमित्त स्पर्धा परीक्षा केंद्र व नेतृत्व संवर्धन केंद्र यांचा एकत्रित भोंडला करण्यात आला. दोन्ही केंद्राच्या विद्यार्थिनी व कार्यालयीन सदस्य मिळून एकूण १२० जणी सहभागी झाल्या. त्यानंतर विविध गुणदर्शन कार्यक्रम झाला. विविध गावांहून आलेल्या व सतत अभ्यासाचा ताण घेऊन वावरणाऱ्या विद्यार्थिनी या कार्यक्रमामुळे ताणमुक्त होण्यास मदत झाली व अभ्यासासाठी नवीन ऊर्जा मिळाली.

**३) रक्तदान शिबिर –** कै. आप्पा पेंडसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दि. १९ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये १०५ जणांनी रक्तदान केले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयास हे रक्त देण्यात आले.

**४) दिवाळी फराळ –** UPSC मुख्य परीक्षा देणारे विद्यार्थी दिवाळीसाठी घरी न जाता पुण्यातच अभ्यासासाठी थांबले. त्यांच्यासाठी दि. २१ ऑक्टोबर (भाऊबीज) या दिवशी दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले. सुमारे १०० विद्यार्थ्यांनी साप्ताहिक उपासना करून फराळाचा आनंद घेतला.

❍ **साप्ताहिक उपासना :** अभ्यासिका व कार्यालयीन सदस्यांची एकत्रित दर शनिवारी साप्ताहिक उपासना सायं. ५ वाजता होते. उपासनेच्या आधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर चिंतन सविताताई व विवेकराव करतात.

❍ **विविध पुरस्कार, बक्षिसे :** आपले विद्यार्थी अधिकारी प्रशासनात काम करताना विशेष ठसा उमटवत असतात. त्याची दखल घेऊन केंद्र व राज्य स्तरावर अनेकांना पुरस्कार प्राप्त झाले.

❍ **संशोधन :** स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी Critical Thinking Enhancement Programme ची रचना प्रा. सविताताई कुलकर्णी यांनी केली असून त्याचे शास्त्रीय पद्धतीने उपयोजन केले आहे. या संशोधनावर आधारीत एक संशोधन पेपर Pondicherry येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेमधे त्यांनी सादर केला. पेपरचा विषय Gender Differences Of Critical Thinking In Competitive Examination aspirants असा होता.

❍ **श्रद्धांजली :** प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या सदस्या श्रीमती प्रज्ञाताई बनसोड यांचे दुर्धर आजाराने दि.१६ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. उपासनेच्यावेळी सर्व विद्यार्थ्यांसमवेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

ωωω

## ज्ञान प्रबोधिनी... सर्वांची... सर्वांसाठी

### ज्ञान प्रबोधिनीच्या पुण्यातील विभागांद्वारा विविध वयोगटासाठी होणारे उपक्रम

### सहावी ते बारावीपर्यंतच्या किशोर-कुमारांसाठी

१) क्षमता संवर्धन शिबिरे - द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४३३११११०
२) क्रीडा-विज्ञान-कला दले- द्वारा युवक विभाग- अखिलेश - ९३२५६३६८८८
युवती विभाग- मेधाविनी- ९४२३१६२१३४
३) छात्र प्रबोधन मासिक व त्यातील उपक्रम, स्पर्धा - द्वारा छात्र प्रबोधन - २४२०७१०८, २४२०७१७४
४) नागरी वस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम - द्वारा नागरी वस्ती अभ्यास गट - हर्षाताई - ९३२५२७२३३७
५) मानसपट मापन - ५ वी ते ९ वीसाठी द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१४५
६) अभिक्षमता मापन व व्यवसाय मार्गदर्शन -(१०/१२ वी) द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका - २४२०७१३७/२४२०७१४४
७) सामूहिक विद्याव्रत संस्कार - द्वारा संवादिनी - २४२०७२२२, संत्रिका - २४२०७१४६
८) 'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन)- द्वारा संवादिनी - ९९७०१५३२३७
९) NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - द्वारा बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र - २४२०७१९४
१०) नेतृत्व संवर्धन शिबिरे-बारावी व पुढील गटासाठी ५ दिवसांची निवासी शिबिरे, द्वारा नेतृत्व संवर्धन केंद्र २४२०७१७९

# ६. प्रज्ञा मानस संशोधिका

प्रज्ञा-मानस संशोधिका, हा ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेमधील मानसशास्त्र विषयामध्ये काम करणारा विभाग आहे. प्रज्ञा-मानस संसोधिकेचा विस्तारही मोठा असून, विषयातील विविध पैलूंवर काम करणारे सात उपविभाग आहेत.

१) संशोधन विभाग
२) मनोमापन विभाग
३) मानव संसाधन विकास विभाग
४) अभिक्षमता विभाग
५) क्षमता विकसन विभाग
६) समुपदेशन आणि मार्गदर्शन विभाग
७) शैक्षणिक विभाग

**२०१७-१८ एक दृष्टीक्षेप**

| | |
|---|---|
| किती व्यक्तींपर्यंत पोचलो ? | ११०००+ |
| किती संस्थांपर्यंत पोचलो ? | ५०+ |
| नवीन निर्मिती | ६ चाचण्या, प्रशिक्षण |
| नवी प्रकाशने | ५ संशोधन निबंध, २ पुस्तके |
| प्रबोधिनीतील इतर विभागांना मदत | ग्रामविकसन, संवादिनी, नेतृत्व संवर्धन, प्रशाला, हराळी केंद्र सोलापूर केंद्र, निगडी केंद्र |
| नियुक्त सदस्य संख्या | ६० |
| सहयोगी सदस्य | ३०+ |

❍ कामाचा वाढता पसारा लक्षात घेऊन टिळक रस्त्यावर वेगळे कार्यालय आणि विविध प्रवेश प्रक्रियांसाठी अंतर्जालाची (online) सुविधा ही महत्त्वाची भर ह्या वर्षी पडली आहे.

## १) संशोधन विभाग

❍ **संतुलन** - या प्रकल्पामध्ये स्त्रीरोग तज्ञ (महिला) आणि परिचारिका यांमधील व्यावसायिक जीवन आणि वैयक्तिक जीवन यांचे संतुलन कसे आहे याचा अभ्यास करण्यात आला. काही मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आणि मुलाखतींच्या निष्कर्षावरून असे निदर्शनास आले की महिला डॉक्टर आणि परिचारिका यांना दोन्हींचे संतुलन राखण्यासाठी ताण-तणाव व्यवस्थापन, वेळेचे नियोजन अशा विषयांवर कार्यशाळेचे आयोजन करणे उपयुक्त ठरेल.

❍ **मनसा प्रकल्पांतर्गत निरामय मातृत्व** - गर्भवती स्त्रियांना गर्भारपणात मानसिक आरोग्य सांभाळणे महत्त्वाचे असते. म्हणूनच प्रथम गर्भवती स्त्रियांसाठी विवेकनिष्ठ विचार पद्धतीवर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळे नंतर घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये एका सहभागीने सांगितले आहे की, कार्यशाळे नंतर प्रतिक्रिया देण्याची माझी पद्धत बदलेली आहे, मी खूप शांत झाले आहे तसेच दुसऱ्या सहभागीने नोंदवले आहे, की बाळंतपण झाल्यानंतर, बाळाला सांभाळणे, सर्वांचे सल्ले ऐकणे यामध्ये स्वतः शांत राहून आहे तो प्रसंग कसा हाताळावा यामध्ये मला कार्यशाळेचा उपयोग होत आहे.

❍ **जिगीषा : काळजीवाहकांची काळजी** - दीर्घकालीन आजारी असलेल्या मुलांच्या पालकांच्या ताण-तणावाची पातळी खूप वाढलेली असते. अशा पालकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळे नंतर झालेल्या मुलाखतीत सहभागींनी सांगितले, आधी मला वाटायचे कि, माझ्या हातून काहीतरी चूक झालेली आहे आणि म्हणूनच माझ्या मुलाला गंभीर आजार झालेला आहे. पण, आत्ता जेव्हा मी त्याच्या आजाराचा विचार करते तेव्हा वाटते की, मुलाच्या आजारी असण्यात माझा दोष नाही. मी स्वतः खंबीर राहून या कठीण प्रसंगाला सामोरी जाऊ शकते. कार्यशाळेमुळे दीर्घकालीन आजारी असलेल्या मुलांच्या पालकांच्या ताण-तणावाची पातळी तर कमी झालीच पण त्यांचे मनोधैर्य वाढले आणि परीस्थितीचा स्विकार करायला शिकले.

❍ **सतेज** - ग्रामीण भागातील मुलींनी खेळ शिकावे, खेळावे आणि त्या बरोबर इतरही काही जीवनावश्यक गोष्टी शिकाव्यात या हेतूने हा प्रकल्प हाती घेण्यात आला. खेळाच्या बरोबरीने विजिगिषु प्रेरणा, स्वसंकल्पना, स्वच्छता, शिक्षणा बद्दलचे विचार या विषयांवर तास घेण्यात आले. प्रकल्पाच्या शेवटी, सहभागींनी काय शिकायला मिळाले तसेच कसा आनंद मिळाला याबाबत अभिप्राय नोंदवला. निरीक्षणातून असे दिसून आले की प्रकल्पाच्या शेवटी खेळात उस्फूर्त सहभाग घेण्याचे मुलींचे प्रमाण वाढले/ सुसंवाद वाढला, भाषा बदलली, शिक्षणाबद्दलचे विचार बदलले, पुढील आयुष्यातील उद्दिष्टाचा विचार त्या करू लागल्या.

❍ **सुमेधा** : ग्रामीण भागातील विद्यार्थिनीं मधील सुप्त क्षमता/ बुद्धिमत्ता शोधून तिला व्यवहार कौशल्यांची जोड देण्यासाठी हा प्रकल्प आखला होता. एकूण १२३ मुलींना विविध कला कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यातून नंतर अर्थार्जन करता यावे अशा प्रकारे शिकविली गेली. शिबिरे, कृतीसात्रे आणि सहली अशा माध्यमातून त्यांचा गुणविकास करण्याचा प्रयत्न केला.

❍ **युवा** - "Youth Upliftment for Vibrant Adolescent' (YUVA) 'किशोरांसाठी अधिमित्रांना मार्गदर्शन' हा प्रकल्प घेण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील तीन विभागांमधील ११३ युवक-युवती सहभागी झाले होते. या प्रकल्पामध्ये त्याच्यासाठी घेण्यात आलेल्या सात दिवसाच्या कार्यशाळा व त्यांनी कुमारांसाठी घेतलेल्या वीस तासिकांमुळे युवकांच्या व कुमारांच्या लैंगिकते विषयीची अभिवृत्ती, शास्त्रीय ज्ञान व लिंग-समभाव यामध्ये वाढ झालेली दिसून आली.

❍ **सबला** - स्त्री केन्द्री विचार सरणी अवलंबून स्त्रियांवरील हिंसाचाराविरुद्ध अनेक वर्ष समाजात काम करणाऱ्या संस्थांचा

अभ्यास प्रकल्पाद्वारे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या मान्यतेनुसार हाती घेण्यात आला. प्रस्तुत विषयात, आपल्या कामाचा ठसा समाजावर उमटवणाऱ्या संस्थांच्या संचालकांच्या मुलाखती, त्यांचे कार्य आणि त्यांनी घडवलेल्या कार्यकर्त्यांना जवळून समजून घेण्याची संधी गटकार्यातून मिळाली. अभ्यासादरम्यान या संस्थाच्या माध्यमातून तेथील अनेक महिला स्वयंरोजगारातून स्वयंपूर्ण तर झाल्या आहेतच त्याचबरोबर त्यांचा कौटुंबिक-सामाजिक दर्जाही वाढल्याचे त्यांच्या प्रत्येक अभिव्यक्तीतून निदर्शनास आले.

### २) मनोमापन विभाग

संशोधनासाठी किंवा समुपदेशनासाठी मानसशास्त्रीय चाचण्या महत्त्वाच्या ठरतात. मनोमापनशास्त्र उपविभागामध्ये मुख्यतः मानसशास्त्रीय चाचण्या तयार करणे, त्या चाचण्यांचे प्रमाणीकरण व मानसशास्त्रीय चाचण्यांचे नूतनीकरण करण्याचे काम चालते. त्याचप्रमाणे मानसशास्त्रीय चाचण्यांची ओळख व उपयोग कसा करावा या बद्दल प्रशिक्षण आणि कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

'मला कसे वाटते?' ही चाचणी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये असून ७ ते १२ वयोगटातील बालकांच्या भावनिक बुद्धीमत्तेचे मापन करण्यासाठी उपयुक्त आहे.

'मनशोध' चाचणीचा उद्देश व्यक्तीमधील मानसिक स्वास्थ्याच्या समस्यांचा शोध घेऊन व्यक्तींना योग्य वेळी योग्य ते मार्गदर्शन मिळणे हा आहे. ही चाचणी प्रौढांसाठी आहे. ह्या चाचणीचे प्रमाणीकरणाचे काम चालू आहे. शालेय सुरक्षा व सुरक्षितता आणि शालेय वातावरण प्रश्नावली या चाचण्यांचा उपयोग करून पुणे व आसपासच्या परिसरातील एकूण पाच शाळांच्या शालेय वातावरणाचे मापन झाले. या मापनाचे निष्कर्ष त्या त्या शाळेच्या वातावरण समृद्धीसाठी खूप उपयुक्त ठरले.

### ३) मानव संसाधन विकास विभाग

उपविभागात उद्योग-संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानसिक क्षमतांचे मापन केले जाते. त्यानुसार क्षमतांचा आलेख काढला जातो. व्यक्तीमधील विशिष्ट गुणानुसार संस्था/उद्योगांमध्ये कोणत्या कामासाठी कोण योग्य ठरेल याचा अचूक अंदाज येऊ शकतो आणि खूप सुट्ट्या घेणे, विसंवाद व संबंध बिघडणे अशा अनेक समस्या सोडवण्यासाठी अशा चाचण्यांचा उपयोग होऊ शकतो.

एका मोटार बनविणाऱ्या कारखान्यात एक कामगार दोन वर्षांपासून Assembly Line वर काम करत होता. त्याच्या कामात चिडचीड होणे, कामाचा कंटाळा येतो, अशा तक्रारी होत्या. मात्र 'कामात चुका करत नाही, नवीन काम दिले तर आवडते, खुशीने वेळेत पूर्ण केले जाते.' असेही म्हटले होते. या कारणासाठी मानसशास्त्रीय चाचणी घेऊन बौद्धिक क्षमता, आवडी-निवडी याचा शोध घेतला. त्या वरून असे लक्षात आले की, त्या व्यक्तीची निरीक्षण शक्ती, निर्णय क्षमता उत्तम प्रकारची आहे, म्हणजेच त्याची उच्चतम बौद्धिक क्षमता होती. त्यामुळे ती व्यक्ती रोज तेच तेच काम करण्याचा कंटाळा करत असे, त्यामुळे तिची कामात चीडचीड होत होती. चाचणीवर आढळलेल्या या निरीक्षणाच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली व 'त्या व्यक्तीला बौद्धिक कामात गुंतवले तर त्याचा त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व सुधारण्यास व कामाचे जास्त समाधान मिळवण्यास तसेच संस्थेला कामाची गुणवत्ता वाढवण्यास जास्त उपयोग होईल' असे सुचविले, तसा अपेक्षित बदल झाल्याने सध्या ती व्यक्ती त्याच कारखान्यात उत्तम काम करते आहे.

याच प्रमाणे निरनिराळ्या विषयांवर प्रशिक्षण सुद्धा घेतले जाते. प्रतिभा विकसन, गट बांधणी, समस्या सोडवणे आणि निर्णय घेण्याची क्षमता, सकारात्मक विचारसरणी, वेळ व्यवस्थापन, संप्रेषण कौशल्य, परस्पर वैयक्तिक संबंध, व्यक्तिमत्त्व विकास, प्रगतीशील कुटुंब अशा अनेकविध विषयांवर व संस्थांच्या मागणीनुसार प्रशिक्षण दिले जाते.

### ४) अभिक्षमता मापन

अभिक्षमता मापन उपविभाग मुख्यतः १०वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता आणि कल मोजून आणि त्यावरील अहवालावरून पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन करतो. या क्षमता आणि कल मोजण्यासाठी अभिक्षमता चाचणी (IA) वापरली जाते. या मार्गदर्शनामुळे शिक्षणात खूप पुढे जाऊन यश मिळवता आले असे नंतर परत भेटणारे विद्यार्थी आवर्जून सांगतात.

कधी-कधी पदवी आणि पदवी नंतरही आपल्याला मार्गदर्शनाची आवश्यकता भासते, त्यासाठी खास निर्माण केलेली **'स्वयंम'** चाचणी वापरण्यात येते. पदव्युत्तर शिक्षण कोणते घ्यायचे? किंवा नौकरी कुठे घ्यायची किंवा बदलायची यासाठी क्षमतेबरोबर व्यक्तिमत्त्वाचे पैलूही मोजले जाणे आवश्यक आहे. या सर्व बाबींवर मार्गदर्शनाचे कामही याच विभागातर्फे केले जाते. काही व्यक्तींना व्यवसाय करायचा असतो. पण व्यवसाय कार्यासाठी त्या प्रकारचे व्यक्तिमत्त्व आणि आवड-निवड असणे महत्त्वाचे असते. या वर मार्गदर्शन करण्यासाठी, खास संशोधन करून *Battery of Entrepreneurial Aptitude Measurement (BEAM)* निर्माण करण्यात आली. या चाचणीचा उपयोग करून व्यक्तीला स्वतःची व्यवसाया बाबतची अभिक्षमता तपासण्यात येते. या चाचणीच्या अहवालावरून मार्गदर्शन करण्यात येतेच पण हवे असल्यास प्रशिक्षणाची सोय या उपविभागाने केलेली आहे. आता मराठा चेंबर ऑफ कॉमर्स सोबत हे काम वेगाने चालू आहे.

### ५) क्षमता विकसन विभाग

बालांपासून प्रौढांपर्यंत विविध वयोगटांमधील व्यक्तींचे क्षमता संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध असणाऱ्या या विभाग तर्फे पुढील उपक्रम घेतले जातात.

बालांसाठी व किशोरांसाठी (वयोगट ७ ते १२ वर्षे) गेल्या २२ वर्षांपासून अभ्यासपूर्ण रीतीने उन्हाळी व दिवाळीच्या

सुट्टीत बालविकास शिबिरे घेतली जातात. मुलांमधील विविध प्रकारच्या बौद्धिक क्षमता शोधणे आणि त्याला चालना देणे या हेतूने शिबिरे आयोजित केली जातात. पण याच्याबरोबर मुलांच्या भावनिक व मानसिक गरजांवरही काम होते.

**६) समुपदेशन आणि मार्गदर्शन विभाग**

या विभागात वय वर्ष तीन पासून प्रौढांपर्यंत आवश्यकतेनुसार समुपदेशन आणि मार्गदर्शन केले जाते. शैक्षणिक समस्या, वर्तन समस्या, मानसपट आणि प्रौढांचे समुपदेशन या चार प्रकारांमध्ये विभागाचे काम चालते.

मार्गदर्शनासाठी प्रामुख्याने पालक वर्ग आपल्या बालवर्गापासून ९वी-१०वी च्या पाल्याच्या शैक्षणिक किंवा वर्तन समस्या घेऊन येतो. शिक्षणात येणाऱ्या समस्या म्हणजेच लक्षात न राहणे, वाचन-लेखनात अडचणी, अभ्यासाचा कंटाळा तर वर्तन समस्या म्हणजे खोटं बोलणे, चोरी करणे, या आणि अशा वेगवेगळ्या समस्यांच्या निवारणाच्या उपाय-योजनेसाठी योग्य त्या मानसशास्त्रीय चाचण्यांचा वापर केला जातो. मुलांची एकूणच बलस्थाने आणि कमतरता जाऊन घेण्यासाठी या विभागाने मानसपट (iTap) नावाची चाचणी विकसित केली आहे. ही गटचाचणी ३-४ तासांची असून ५वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहे.

**७) शैक्षणिक विभाग**

हा उपविभाग मुख्यतः औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाद्वारे हे काम करतो. या उपविभागाची सुरुवात शिक्षण क्षेत्रातील चांगल्या प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन शालेय मानसशास्त्राच्या पदव्युत्तर पदविकेने (P.G. Diploma in School Psychology) झाली. या अभ्यासक्रमामध्ये सहभागी होणारे विध्यार्थी हे भिन्न-भिन्न शैक्षणिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमी असणारे तसेच वय वर्ष २१ पासून ६५ पर्यंतच्या वयोगटातील असतात. या वर्षी या अभ्यासक्रमासाठी २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. अधिक क्षमतेच्या मुलांच्या गरजा ओळखून त्यांचा सर्वांगीण विकासासाठी प्रशिक्षित व्यक्ती तयार करण्याच्या उद्देशाने प्रज्ञावंताच्या शिक्षणासंबंधात एक पद्व्युत्तर पदविका (P.G. Diploma in Education of the Gifted: Methods and Strategies) इथे चालवली जाते.

'Our Role in Nurturing Talents of Highly able' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय पातळी वरील परिसंवादाचे आयोजन हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या मागील तीन वर्षांच्या विद्यार्थ्यांनी केले होते. परिसंवादामध्ये काही विद्यार्थ्यांनी पोस्टर द्वारे तर काही विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष त्यांच्या विषयाचे सादरीकरण केले. या सादरीकरणामध्ये विद्यार्थ्यांनी आजपर्यंत केलेले काम, संशोधन तसेच त्यांचा उपयोग यांची मांडणी केली. परिसंवादाच्या अध्यक्षपदी NI-S, Benglore संस्थेच्या प्रमुख डॉ. अनिथा कुरूप यांची उपस्थिती लाभली.

या दोन्ही नियमित अभ्यासक्रमांना जे उपस्थित राहू शकत नाहीत त्यांच्यासाठी एक दूरस्थ अभ्यासक्रम उपलब्ध आहे. बाल व किशोरांच्या मानसशास्त्रासंदर्भातील हा स्वायत्त अभ्यासक्रम (Child and Adolescent Psychology: Enhancing Potentials)आठ महिने चालतो. २०१७-१८ मध्ये या अभ्यासक्रमासाठी सात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता व यशस्वीपणे पूर्ण केला.

**★ राष्ट्रीय परिषद (Quality of Life) ★**

प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे जीवनाची गुणवत्ता (Quality of Life: Concept, Measurement, Enhancement) या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे आयोजन डॉ. नीतू मांडके सभागृह, IMA, पुणे येथे दिनांक १७ व १८ नोव्हेंबर या दिवशी करण्यात आले होते. या परिषदेचे उद्‌घाटन डॉ. मोहन आगाशे यांनी केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोकजी कुकडे अध्यक्षस्थानी होते. उद्‌घाटन प्रसंगी शोधनिबंधाचे सारांश रूपातील Book of abstract चे प्रकाशन झाले. दुसऱ्या दिवशी ज्ञान प्रबोधिनीत झालेल्या स्त्री विषयांच्या संशोधनाचे संकलन असलेल्या 'स्त्री-विधा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

दोन दिवसांमध्ये दोन परिसंवाद व दोन चर्चासत्रे झाली. यामध्ये पद्मभूषण प्रा. माधव गाडगीळ, IIT कानपूरच्या प्रा. लीलावती कृष्णन्, प्रा. मानस मंडल, वा. अनघा लवळेकर, डॉ. अनुराधा सोवनी (मानसशास्त्र प्रमुख - एस्.एन्.डी.टी, मुंबई), पि.चिं.म.न.पा. चे आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, मा. विद्याताई बाळ, डॉ. रोहिणी पटवर्धन, डॉ. कल्पना श्रीवास्तव, प्रा. डॉ मीना हरिहरन, हैद्राबाद विद्यापीठ, IPS अधिकारी मा. श्री. प्रमोद फळणीकर या अकरा मान्यवरांनी विविध विषयांची मांडणी केली. चार समांतर सत्रांमध्ये ३७ शोधनिबंधांचे सादरीकरण झाले. समारोपाच्या सत्रात मा. संचालकांच्या हस्ते समाजकार्यासाठी समर्पित असणाऱ्या श्री. सय्यदभाई, श्री. नरसिंग झरे, मा. शीतल तेली-उगले (आय.ए.एस.) व मा. दीपा पाटील या चौघांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. MKCL चे संचालक मा. विवेक सावंत यांनी परिषदेचा समारोप केला.

ωωω

# ७. संत्रिका

संत्रिकेचे ज्येष्ठ मार्गदर्शक आ. यशवंतराव लेले यांना निनाद, पुणे तर्फे 'गुरूतत्व' पुरस्कार या वर्षी प्राप्त झाला.

❍ **पौरोहित्य उपक्रम**

संस्कृत-संस्कृति-संशोधिका (संत्रिका) विभागाचा मुख्य उपक्रम म्हणजे पौरोहित्य. चार वर्षांच्या प्रशिक्षणानंतर ३ जून रोजी संत्रिकेच्या वतीने डोंबिवली येथे स्वतंत्र पौरोहित्य विभाग सुरू झाला. तेरा महिला पुरोहिता 'नामकरण ते श्राद्ध' असे विविध संस्कार आता मुंबईत व उपनगरांमध्ये करीत आहेत. स्वयंपौरोहित्य हे पौरोहित्य उपक्रमाचे एक उद्दिष्ट आहे. त्याचा प्रसार व्हावा यासाठी डोंबिवली व पुणे केंद्राच्या वतीने 'दीपावलीतील लक्ष्मीपूजन' व 'गणेश प्रतिष्ठापना' कार्यशाळेचे नियोजन केले गेले. एकूण ६० पेक्षा अधिक सदस्यांनी याचा लाभ घेतला. तसेच पुण्यामध्ये नागरवस्ती विभागातील महिला सदस्यांसाठी 'हरितालिका पूजा' कार्यशाळा घेण्यात आली. वर्षभरात पुणे केंद्रातील संत्रिकेच्या पुरोहितांनी पुण्यात, महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर ८०३६ संस्कार केले. विवाह, श्राद्ध या

**एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीतील संस्कार**

| संस्काराचे नाव | एकूण संख्या |
|---|---|
| वेद पूजन | २३०८ |
| एकोद्दिष्ट श्राद्ध | २०१६ |
| वर्ष श्राद्ध | १५७१ |
| सत्यनारायण पूजा | ४६७ |
| वास्तू शांती | ३४७ |
| विवाह | १२७ |
| उपनयन | १०७ |
| दाहकर्म | १०३ |
| गणेश स्थापना | ६३ |
| महालय श्राद्ध | ५३ |
| साठी शांती | ४८ |
| सहस्रचंद्रदर्शन | ३१ |
| साखरपुडा | ३० |
| पंचाहत्तरी | २९ |
| मंगळागौर पूजन | २६ |
| नामकरण | २० |
| लक्ष्मीपूजन | १८ |
| दत्तक विधान | १ |

संस्काराच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी पद्धतीच्या पौरोहित्याचा विस्तार भारतभर होत आहे. कोलकाता येथील बंगाली वर व महाराष्ट्रीय वधूच्या विवाह संस्काराच्या निमित्ताने विवाह पोथीचे बंगाली भाषांतर करण्यात आले.

❍ **विशेष** – संत्रिकेतील पुरोहित ज्ञान प्रबोधिनीच्या अन्य विभागांच्या उपक्रमातही सहभागी होतात. पाणी प्रश्नावर चालू असलेल्या कामासाठी भरभरून देणगी आणणे, विहीर लोकार्पण संस्काराच्या निमित्ताने अन्य विभागांच्या कामात सहभाग घेणे, नागरीवस्तीच्या गटात संस्कार शिकविण्यास व करण्यास जाणे इ. दरवर्षी होणाऱ्या विद्याव्रत संस्कारात संवादिनी व संत्रिका सदस्यांचा उत्साही सहभाग असतो. मार्च २०१७ मधील विद्याव्रतात २५ विद्यार्थी सहभागी होते.

मॅक्सम्यूलर संस्थेबरोबर 'Being Woman' उपक्रमात सहभागी होण्याचे संत्रिकेचे हे तिसरे वर्ष होते. मॅक्सम्यूलर भवनच्या संचालिका हायडी व संत्रिकेच्या वाच. आर्या जोशी यांच्या सहकार्यातून 'सिल्क' नावाच्या दोघी ख्रिश्चन पुरोहिता व संत्रिकेतील महिला पुरोहिता यांचा एकत्रित तीन दिवसांचा कार्यक्रम घेण्यात आला. ५ सप्टेंबरला परदेशी पाहुण्यांनी आपल्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीचा आनंद घेतला. नंतरच्या दोन दिवसात 'मृत्युपंथाला लागलेल्या व्यक्तींचे शेवटचे दिवस आनंदी होण्यासाठी करण्यात येणारे काम व मृत्युपश्चातचे विधी आणि आत्म्याची संकल्पना' याविषयी जर्मन पाहुण्यांनी माहिती दिली व चर्चाही झाली. मॅक्सम्यूलर भवनला संत्रिकेच्या सदस्यांनी भेट दिली. यातून पुरोहितांना जर्मनीतील मृत्युपश्चातचे संस्कार आणि त्यामागील विचार यांचा काही परिचय झाला तसेच हिंदू धर्मशास्त्रातील 'आत्मा-पुनर्जन्म' ही संकल्पना जर्मन मैत्रिणींनी समजून घेतली.

❍ **विशेष उपक्रम** – आदरणीय संचालकांनी या वर्षी संत्रिकेला भेट दिली. प्रदीर्घ काळानंतर झालेल्या या संचालक भेटीमध्ये एप्रिल २०१३ ते मार्च २०१७ या काळातील कामाचे सादरीकरण पुरोहित गट व कार्यालयीन सदस्यांनी केले. संत्रिका सदस्यांचे प्रसिद्ध झालेले शोधनिबंध, स्वयंपौरोहित्यासाठीची तयार केलेली ॲप्लिकेशन, प्रकाशित झालेले विविध लेख, माध्यमांशी झालेले संपर्क, पौरोहित्य उपक्रमाचा भारतभर झालेला प्रसार यांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. संशोधन संस्थेच्या कार्यवाह वाच. सुजला वाटवे, मा. यशवंतराव, मा. विसूभाऊ या साठी उपस्थित होते. या भेटीच्या निमित्ताने पुरोहितांनी सामूहिक कामाचा अनुभव घेतला.

❍ **व्याख्याने** – ३० जून २०१७ रोजी वाच. स्वर्णलता भिशीकर यांचे 'पुरोहित समुपदेशकाच्या भूमिकेत' या विषयावर अर्थपूर्ण व्याख्यान पुरोहित गटासाठी झाले तसेच संत्रिकेच्या पुरोहिता वाच. सुजाता बापट, वाच. आर्या जोशी व माधुरी करवडे यांची संत्रिकेबाहेरील गटासाठी व्याख्याने झाली.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 28 31/08/2018 3:19:44 PM

❍ **प्रसार माध्यमांशी संपर्क** – स्त्री–पौरोहित्याबद्दल निर्माण होणाऱ्या उत्सुकतेमुळे प्रसारमाध्यमांचे संत्रिकेतील महिला पौरोहित्याकडे लक्ष वेधले आहे. गोवा दूरदर्शनवर महिला पुरोहितांची मुलाखत प्रसिद्ध झाली. दैनिक पुढारी, दै. नवशक्ती, कल्याण वैभव, उद्याचा मराठवाडा आणि ई–सकाळ या वृत्तपत्रातून महिला पुरोहितांच्या मुलाखती व पौरोहित्यविषयक लेख प्रसिद्ध झाले. ऑस्ट्रेलियन ब्रॉडकास्टिंग चे Siobhan Heanue व सोम पाटीदार यांनी महिला पुरोहितांविषयी बातमी तयार केली ती abc.net www.abc.net.au येथे उपलब्ध आहे.

संत्रिकेतर्फे शैक्षणिक संस्कार, विविध शांती, विविध पूजा, विविध संस्कार अशा एकूण २१ पोथ्या उपलब्ध आहेत. त्यातील शैक्षणिक संस्कार पुढीलप्रमाणे ---

०१) वर्षारंभ उपासना (श्रावणी)
०२) वर्षान्त उपासना (उत्सर्ग)
०३) दैनंदिन उपासना (संध्या)
०४) उपनयन संस्कार (मुंज) (८ ते १२ वयोगट)
०५) सामूहिक विद्याव्रत (मुंज) (१३ ते १६ वयोगट)

ωωω

## ८. सामाजिक शास्त्र अध्ययन केंद्र

विद्याव्रतावरील वैचारिकाची मालिका पूर्ण झाली. ज्यामध्ये मा. विश्वनाथ गुर्जर, प्रा. विवेक पोंक्षे, वाच. अनघा लवळेकर यांनी मार्गदर्शन केले.

ज्ञान प्रबोधिनीच्या मध्यवर्ती भवितव्य लेखात सामाजिक शास्त्र संशोधिकेचा उल्लेख आहे. यासाठी पायाभरणीचे काम संत्रिकेच्या वतीने अन्य विभागातील अभ्यासू सदस्यांच्या साहाय्याने सुरू झाले आहे. या अंतर्गत आंतरविद्याशाखीय अभ्यासगटाच्या व्याख्यानांना सुरुवात झाली. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान यातील मूलभूत संकल्पना, आंतरविद्याशाखीय अभ्यासाची आवश्यकता इ. विषयावर मा. सुभाषराव देशपांडे, वाच. सदानंद मोरे, मा. अभय टिळक, मा. राजीव साने व आंतरविद्याशाखीय चिंतनगटाच्या सदस्यांनी मांडणी केली. दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी होणाऱ्या या व्याख्यानांना सरासरी ४० ते ४५ सदस्य उपस्थित असतात. एकूण १५० पेक्षा जास्त सदस्य या उपक्रमात वेळोवेळी सहभागी झाले आहेत. आंतरविद्याशाखीय चिंतनगटाची नियमित बैठक सुरू झाली आहे.

'भारतीय मुस्लिम स्त्रियांना शिक्षणामुळे मिळणारी स्वयंविकासाची संधी व प्रेरणा' या विषयावर वाच. मनीषा शेटे व मानसी बोडस यांनी काम सुरू केले आहे. अनुकूल अथवा प्रतिकूल परिस्थितीतही स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या निवडक मुस्लिम महिलांच्या मुलाखती या प्रकल्पात घेतल्या जात आहे. आत्तापर्यंत विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ९ जणींच्या मुलाखती पूर्ण झाल्या आहेत. डॉ. बेनझीर तांबोळी, हीना कौसर खान, वैद्या जस्मिन नैउद्दिन शेख इ.चा ह्यात समावेश आहे. या निमित्ताने मुस्लिम महिलांच्या मनात डोकावण्याची संधी उपलब्ध झाली.

ωωω


### ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके /DVD

**कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके**

**⁕ कथासंग्रह**
१,२. मृद्गंध व मोहोर (प्रत्येकी)६०
३. बहर ५०
४. रस्काझी-रशियन कथा ७०
५. सफर विज्ञानकथांची ८०
६. प्रेरक कथा.. ४०
७. कहाणी दोन भावांची ४०

**⁕ ललित लेखसंग्रह**
८. अलगुज ५०
९. केवड्याचं पान ५०
१०. बकुळफुलं ६०

⁕ कविता/काव्यपंक्ती संग्रह
११. कवितेच्या गावा ७०
१२. शब्दांची रत्ने ६०

**⁕ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**
१३. व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत १००
१४. कल्पक बनू या. १००
१५. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ७०
१६. Be Creative . १५०
१७. तरंग मनाचे ५०
१८. उजळती वाट ४०
१९. निर्णय कौशल्य ४०
२०. नियोजन कौशल्य ४०
२१. भावनांच्या प्रांगणात ७०
२२. गीता-गीताई २०
२३. प्रबोधन गीते भाग १ ४०
२४. प्रबोधन गीते भाग २ .. ३०
२५. प्रबोधन गीते ऑडिओ सीडी.. ५०

**⁕ काव्य-रसग्रहण लेखसंग्रह**
२६,२७. गंध मोहवी काव्याचा भाग १ व २(प्रत्येकी) ७०
२८. पाहिलेच पाहिजे असे काही ८०
२९ ते ३१. वाचलेच पाहिजे असे काही भाग १,२,३ (प्रत्येकी) ४०

**⁕ माहितीपर पुस्तके**
३२. आपला पाऊस ३०
३३. छंद आकाश दर्शनाचा १००
३४. वनस्पतींचे अनोखे विश्व ८०





Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 29 31/08/2018 3:19:44 PM

### ❍ पाणी टंचाई निवारण कार्यक्रम :

भोर व वेल्हे तालुक्यातील डोंगराळ भागातील दुर्गम गावांमधील पाणीटंचाई निवारणाच्या उपक्रमावर गेली पाच वर्षे विभागातर्फे विशेष भर देण्यात येत आहे. यासाठी शासनाच्या अधिकृत पाणीटंचाईग्रस्त गावांच्या यादीचा आधार घेण्यात येत आहे. तीन वर्षांहून अधिककाळ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य देण्यात येते. पाणीटंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरे विकास, नवीन विहीर खोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणी साठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून हाताळण्यात आले. श्रमदान व लोकवर्गणी या आधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करण्यात येत असतो. कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज मात्र पुण्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर निधीतून होते.

**(अ) झरे विकास व विहीर खोदाई उपक्रम :** यंदा बार्शीचा माळ (शेनवड) व दरडीघेवाडी (गुंजवणे) येथे नव्याने विहीर खोदाईचे काम हाती घेण्यात आले. दोन्ही ठिकाणचे खोदकाम पूर्ण झाले आहे. गोरेवस्ती (कुसगाव) येथील झऱ्यांचे खोदकाम प्रगतीपथावर आहे. या व्यतिरिक्त वांगणीवाडी येथील जुन्या सरकारी विहिरीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याचे काम यंदा पूर्ण झाले असून बांधकाम प्रगतीपथावर आहे. कुसारपेठ व वरोती खुर्द (कोलंबी), हिरवेवस्ती (घिसर), गुहीणी व कोंडगाव (ता. भोर) येथील विहिरीभोवतीच्या संरक्षक कठड्याचेही काम पूर्ण करण्यात आले आहे. बांधकाम करण्यात आलेल्या झऱ्याचे अथवा विहिरीच्या जागेचे शासनाच्या नावे बक्षिसपत्र करण्यासाठी चिकाटीने पाठपुरावा करून ती मिळवण्यात आली.

सर्वच गावांमध्ये ग्रामस्थांनी विहीर खोदकामामध्ये मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. ग्रामस्थांच्या श्रमदानाला प्रबोधिनीच्या युवक विभागातील युवकांची मोलाची साथ मिळाली. कंपन्यांच्या अधिकारी-कर्मचारी सदस्यांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या सर्व कामासाठी प्रामुख्याने पर्सिस्टंट फौंडेशन व केपीआटी टेक्नॉलॉजीज् या कंपन्याच्या सीएसआरचे अर्थसाहाय्य लाभले. प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी, संत्रिका विभागातील पुरोहितांनी जमा केलेल्या देणग्या व वैयक्तिक देणगीदार याद्वारेही निधी संकलन करण्यात आले.

**लोकार्पण कार्यक्रम :** शेनवड (ता. वेल्हे) येथे यंदा बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचे उद्घाटन पर्सिस्टंट फौंडेशनच्या अध्यक्षा सोनाली देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह सुभाषराव देशपांडे होते. यावेळी पर्सिस्टंट फौंडेशनचे तांत्रिक सल्लागार वैभव निकम उपस्थित होते. विहिरीच्या कामासाठी सुरुंग उडविण्यामुळे घरावरील फुटणाऱ्या पत्र्यांची नुकसानभरपाई देण्याची गावाने जबाबदारी घेण्याची भूमिका घेण्यासाठी रवींद्र भूरूक या तरुणाने पुढाकार घेतला त्याबद्दल त्याचे यावेळी कौतुक करण्यात आले.

गुहिणी (ता. भोर) येथे बांधून पूर्ण झालेल्या विहिरीचा लोकार्पण कार्यक्रम यंदा संपन्न झाला. विहिरीचे लोकार्पण पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यवाह सुभाषराव देशपांडे होते. याप्रसंगी केपीआयटी टेक्नॉलॉजीज्ची उपकंपनी असणाऱ्या इम्पॅक्ट ऑटोमोटीव्हचे अध्यक्ष चिन्मय पंडित, केपीआयटी सीएसआर अधिकारी तुषार जुवेकर, ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख डॉ. विवेक कुलकर्णी हे उपस्थित होते. सणसवाडी-मेटपिलावरे (ता. वेल्हे) येथील झरे विकास बांधकामाचे लोकार्पण प्रबोध उद्योगसमूहाचे संचालक नंदकुमार कानडे यांच्या हस्ते करण्यात आले.

**माजी विद्यार्थी भेट :** ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थांच्या गटाने वरोती खुर्द येथील विहीर बांधकामात सुरुवातीपासून मोठे योगदान दिले आहे. प्रशालेतील १९७६च्या तुकडीमधील १४ जणांनी आत्तापर्यंत एकूण रु. ३ लक्ष ची मदत या कामासाठी दिली आहे. सुनिल जगताप, प्रमोदराव सडोलीकर व अजितराव कानिटकर यांनी हे निधी संकलन करण्यात पुढाकार घेतला. यापैकी पाच जणांनी नुकतीच वरोती खुर्दला प्रत्यक्ष जाऊन विहिरीच्या कामाला भेट दिली. यावेळी कार्यवाह सुभाषराव देशपांडे तसेच मध्यप्रदेश मधील रामकृष्ण मठाचे स्वामी देवसेवानंद हेही उपस्थित होते.

**(ब) नळपाणी पुरवठा योजना :**

कांबरे बुद्रुक हे भोर तालुक्यातील भाटघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील चाळीस धरणग्रस्त गावांपैकी एक गाव आहे. भोर तालुक्यापासून २४ किलोमीटर असणारे हे गाव वेळवंडी नदीच्या तीरावर वसलेले आहे. गावाची लोकसंख्याही सुमारे सव्वा दोनशेच्या आसपास आहे. या गावामध्ये दरवर्षी उन्हाळ्यामध्ये तीव्र पाणीटंचाई असते.

हे गाव टँकरमुक्त होण्यासाठी या गावात नळ-पाणी पुरवठा योजनेचे काम यंदा हाती घेऊन पूर्ण करण्यात आले. भाटघर धरणाच्या पाण्याच्या डोहापासून सव्वा किलोमीटर पर्यंतची पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असून सबमर्सिबल पंप बसवून त्याची यशस्वीरित्या चाचणीही घेण्यात आली. ग्रामस्थांनी या कामासाठी ५० हजार रुपयांची लोकवर्गणी गावातून उभी केली आहे. या मंडळींनी चिकाटीने गावातील ४२ कुटुंबांकडून टप्प्या-टप्प्यात घरटी पाचशे रुपये याप्रमाणे चार वेळा पैसे एकूण वर्षभरात गोळा केले. या योजनेसाठी केपीआयटी टेक्नॉलॉजीज्ने उर्वरित अर्थसाहाय्य देऊ केले आहे. या नळपाणी योजनेअंतर्गत पंधरा हजार लिटर क्षमतेची पाणी



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 30 31/08/2018 3:19:44 PM

साठवणूक टाकी फेरोसिमेंट तंत्रज्ञानाच्या आधारे बांधण्यात आली. तालुक्याच्या टंचाईग्रस्त गावांच्या यादीतून आता हे गाव हद्दपार झाले आहे ! एकेकाळी धरणातून पायपीट करून पाणी भरणाऱ्या या गावात आता घरपोच नळ झाले आहेत. नळपाणी योजनेच्या पंपांचे वीजबिल भरण्यासाठी ग्रामस्थांनी दूरदृष्टीने आत्ताच लोकवर्गणीतील शिल्लक रक्कम बाजूला काढून ठेवली आहे हे विशेष नमूद करण्यासारखे आहे !!

**इंजिनिअर्स विदाऊट बॉर्डर्स (EWB) प्रतिनिधी भेट :** अमेरिकेतील ॲराझोना विद्यापीठातील सहा विद्यार्थ्यांनी इंजिनिअर्स विदाऊट बॉर्डर्स (EWB) या संस्थेच्या माध्यमातून वरोती खुर्द (ता. वेल्हे) व गुहिणी (ता. भोर) या दोन गावांत प्रबोधिनीतर्फे पाणी विषयक चालणाऱ्या कामांना भेट दिली.

**फेरोसिमेंट टाकी बांधकाम :** यंदाच्या वर्षी पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी एकूण सात गावांमध्ये फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. भोर तालुक्यातील उंबरमाळ (९०००लि.), कांबरे बुद्रुक व डेहेण (१५,०००लि.), गुहिणी (२०,०००लि.), कुसगाव (१०,००० लि) व वेल्हे तालुक्यातील वरोती (१५,०००लि.) येथे या टाक्या बांधून पूर्ण करण्यात आल्या. यासाठी मुंबईमधील जलवर्धिनी संस्थेचे श्री. उल्हास परांजपे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात आले. फेरोसिमेंट साठवण टाकीचे भोर व वेल्हे तालुक्यातील हे सर्व पहिलेवहिले प्रयोग आहेत.

### ❍ पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम

**(अ) लोकसहभागातून शेतबांध दुरुस्ती व जमीन सपाटीकरण :** वेल्हे तालुक्यातील पासली खोऱ्यातील तीन गावात यंदाही शेतबांध दुरुस्ती व जमीन सपाटीकरणाचे काम लोकसहभागातून हाती घेण्यात आले. एकूण ८९ शेतकऱ्यांच्या शेतावरील काम पूर्ण झाले. यात सणसवाडी (मेट पिलावरे) येथील ३२ शेतकरी, वरोती खुर्द येथील १४ शेतकरी, खिळदेववाडी येथील १९ शेतकरी आणि वडे वस्ती (मेट पिलावरे) येथील २४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. या सर्व कामात शेतकऱ्यांनी स्वत:च्या ५० % लोकवर्गणीतून हे काम करून घेतले हे विशेष नमूद करण्यासारखे आहे. उर्वरित ५० % खर्चाची व्यवस्था पर्सिस्टंट फौंडेशनच्या अर्थसाहाय्यातून करण्यात आली. या कामाचे एकूण मूल्य रु. ६,२३,०००/- इतके आहे. यातील ५०% रक्कम रु. ३,११,५००/- इतका लोकवाटा आहे! यात अनेक शेतकऱ्यांनी सपाटीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर स्वखर्चाने दगडांच्या ताली घालून घेतल्या आहेत.

**(ब) श्रमकार्य उपक्रम**

वेल्हे तालुक्यातील बार्शिमाळ येथे यंदा युवक विभागातर्फे पाच वेळा श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. त्यात एकूण ७७ युवकांनी विहिरीतील डबर काढण्यासाठी श्रमदान केले. याशिवाय सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १५० युवक-युवतींनी खोपडेवाडी येथे सलग तीन दिवसांचे मुक्कामी शिबिर घेऊन गावातील डोंगरावर सलग सम पातळी चर खणले. पासली खोऱ्यातील पाच गावांमध्ये सहा बंधारे श्रमदानातून घालण्यात आले. या सर्व श्रमदानाच्या एकूण उपक्रमांमध्ये युवकांसह माहिती तंत्रज्ञान (आय टी) कंपन्यातील कर्मचाऱ्यांनी हिरीरीने सहभाग घेतला. एकूण १८६ महाविद्यालयीन युवकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. याशिवाय केपीआयटी टेक्नॉलॉजीजच्या १०७ तर पर्सिस्टंट फौंडेशनच्या ५३ सदस्यांचा श्रमदानात सहभाग होता.

### ❍ संमेलनात सहभाग

जल-जन-जोडो या अभियानाअंतर्गत तीन दिवसीय वार्षिक अधिवेशनात विभागातील पाच सदस्य सहभागी झाले होते. कर्नाटक राज्यातील विजयपुरा (बिजापूर) येथे हे अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनात ज्येष्ठ जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह राणा हे तीनही दिवस पूर्णवेळ उपस्थित होते. संपूर्ण भारतामधील जलयात्रेमध्ये सहभागी झालेले सदस्य, शासकीय कर्मचारी, पाणी तज्ज्ञ आणि गाव पातळीवरील विविध कार्यकर्ते आणि ग्रामस्थ असे सुमारे १० हजार लोक संम्मेलनात सहभागी झाले होते.

### ❍ प्रकट मुलाखत

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे आयोजित पाणी कवी संमेलनात विभागातील सुनीताताई गायकवाड यांची पाणीप्रश्नाबाबत मुलाखत घेण्यात आली. पुण्यातील साहित्य परिषदेत झालेल्या या कार्यक्रमात आयोजक प्रमोद आडकर व प्रज्ञा महाजन यांनी सुनीताताईंची प्रकट मुलाखत घेतली. त्यानंतर विविध कवींनी आपल्या पाण्याबाबतच्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. मोहनराव गुजराथी होते.

### ❍ सौर ऊर्जा प्रकल्प

जपानी सौर प्रशिक्षक ताजिमा तोशिओ व हितोमी ईनोमोटो यांनी प्रबोधिनीच्या पुण्यातील सौर जुळणी प्रशिक्षण केंद्राला भेट दिली व चालू कामकाजाची माहिती घेतली.

नवी दिल्ली येथील इको (ICCO) संस्थेतील प्रकल्प व्यवस्थापक जस्मीत सिंग यांनी सौर प्रकल्पाला भेट देऊन माहिती घेतली. इको ही संस्था मिलेनिअम अलायन्स या मुख्य संस्थेची सहयोगी संस्था आहे.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय पातळीवरील अपारंपरिक ऊर्जा प्रदर्शनाला (Renewable Energy India Expo 2017) विभागातील दोन सदस्यांनी भेट दिली. सौर पट्टिका जुळणीसाठी लागणारे साहित्य पुरवठादार शोधणे व सौर ऊर्जेबाबत घडामोडींची माहिती होणे हा या प्रदर्शनाला भेट देण्याचा हेतू होता. यावेळी नाईस National Institute for Solar Energy (NISE) या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या संस्थेला भेट देऊन सौर प्रशिक्षणाबाबत माहिती घेण्यात आली.

मध्यप्रदेश राज्यातील विवेकानंद नवयुवक मंडळ, दिंडोरी या संस्थेच्या दोन कार्यकर्त्यांना गेल्या वर्षी पुण्यात सौर दिवे जुळणीचे दोन आठवड्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते. यंदा त्यांनी दिंडोरीत १०० दिव्यांची जुळणी केली असून त्याची परिसरातील गावांमध्ये सवलतीच्या दरात विक्री चालू आहे.

## १०. कृषी तांत्रिक विद्यालय, शिवापूर

शिवापूर येथे गेली ३० वर्षे औद्योगिक/तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे वर्ग चालू आहेत. कातारी (टर्नर) या कौशल्याच्या वर्गाला सध्या विद्यार्थी येतात. संगणकाधारित (सीएन्सी) प्रशिक्षणसुद्धा येथे दिले जाते. विद्यार्थीसंख्या आता मर्यादित असते.

जूनमध्ये केलेल्या कौशल्य प्रशिक्षण वर्गाच्या प्रसाराला प्रतिसाद देऊन ३० विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली होती. प्रत्यक्षात दहा विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण वर्गात प्रवेश घेतला. ऑगस्ट पासून नियमित वर्गाला सुरुवात झाली.

वेळूफाटा येथील सोलर कंपनीचे संचालक श्री. पांडे यांनी वर्गाला सदिच्छा भेट दिली. श्री. तागडे सरांनी मुंबई येथे जाऊन सौर तंत्रज्ञान प्रशिक्षण घेतले. सप्टेंबर महिन्यात 'सौरघट' जुळणी प्रशिक्षण योजले होते. फेब्रुवारी महिन्यात विद्यार्थी 'ऑक्टिजन' या कंपनीत औद्योगिक भेटीसाठी गेले होते. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा ज्ञान प्रबोधिनीच्या इतर केंद्रातील आणि विभागातील सदस्यांच्या कृषी तांत्रिक विद्यालयाला भेटी झाल्या. प्रॅक्टीकल व लेखी परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले व विविध ठिकाणी नोकरी मिळवून कामास सुरुवात झाली.

ωωω

**ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचलित**

## कमला मेहता नेत्र रुग्णालय
**(शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा)**

ग्रामीण भागात नेत्रसेवा करण्याच्या उद्देशाने रुग्णालयाची स्थापना १९९७ मध्ये झाली. पुणे ते सातारा या १२५ किलोमीटरच्या अंतरात कमला मेहता नेत्र रुग्णालय हे एकमेव नेत्र रुग्णालय आहे. आजतागायत दोन लाखांहून अधिक रुग्णांना नेत्रसेवा पुरवण्यात आली आहे. रुग्णालयाचा उद्देश ग्रामीण सेवा हा असून पहिल्यापासून व आजतागायत शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी, औद्योगिक संस्थांच्या कामगारांची नेत्र तपासणी, आठवड्यातून दोन वेळा नेत्रशिबिर, रुग्णांची विनामूल्य ने-आण व शस्त्रक्रिया इ. उपक्रम आवर्जून केले जातात.

**सध्याची परिस्थिती :**

- ✼ शिबिरे : या वर्षात एकूण १९.
- ✼ बाह्य रुग्ण विभाग : दोन द्विपदवीधर स्थायिक नेत्रविशारद उपलब्ध. दरमहा नऊ (honorary) शल्यविशारदांची भेट
- ✼ पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध
- ✼ महिन्यातून एकदा स्पेशॅलिटी ओ. पी. डी. रेटीना ओ.पी. डी., लेसर ओ. पी. डी.
- ✼ आठवड्यातून दोन वेळा फॅको शस्त्रक्रिया
- ✼ महिन्यातून एकदा टेरिजियम, लॅक्रीमल सॅक व ॲन्टीरियर सेगमेंट शस्त्रक्रिया
- ✼ महिन्यातून दोनदा ग्लुकोमा शस्त्रक्रिया
- ✼ शिकाऊ नेत्रविशारदांसाठी योग्य मार्गदर्शन व अनुभव
- ✼ अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णालय - सर्वोत्तम दर्जाची नेत्रचिकित्सा व चष्म्याचे दुकान.
- ✼ या सर्व शस्त्रक्रियांसाठी उपयुक्त असणारा फुंडुस (Fundus) कॅमेरा घेतला आहे.

| **चालू वर्षातील रुग्णसंख्या** | **२०१७-१८** | |
|---|---|---|
| ✼ बाह्यरुग्ण विभाग | नवीन | ९७५० |
| | जुने | २६३२ |
| | एकूण | १२३८२ |
| ✼ शस्त्रक्रिया - मोतीबिंदू | | |
| | सशुल्क | ५४३ |
| | मोफत | १९८ |
| | इतर | ५९ |
| | एकूण | ८०० |

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 32 31/08/2018 3:19:44 PM

## ११. स्त्री शक्ती प्रबोधन - ग्रामीण

- १७-१८ हे वर्ष बचत गटातून सुरू झालेल्या ग्रामीण स्त्री शक्तीच्या कामाचे २३वे वर्ष! ह्या विषयावर सातत्याने काम केल्यामुळे आता स्थानिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने हे काम चालू आहे. साधारण १०० गावांपर्यंत आपला संपर्क आहे तर दरमहा काहीतरी उपक्रम होणारी किमान ७० गावे आहेत.
- बचत गटातून सुरू झालेले हे काम महिलांसाठी बचत गट, स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व विकसन या अंगांनी वाढले तर 'आता पोरीला शिकवा' म्हणणारी आई तयार झाल्यामुळे किशोरी विकास, युवती विकास या अंगांनीही कामाला गती मिळाली. आंबवण्याच्या स्टरलाईट टेक फौंडेशनच्या जीवनज्योती महिला सबलीकरण केंद्राची या वर्षी जबाबदारी घेतल्यामुळे युवतींच्या औपचारिक शिक्षणासाठीही भरीव काहीतरी करता आले.
- या वर्षी ६५ गावात ३२० बचत गटांद्वारे काम केले. तसेच ठरवून नवीन गट दुर्गम भागात सुरू केले. 'आम्हाला कर्ज नको' असं म्हणणारा हा वेल्हे, भोर तालुक्यातला डोंगराळ भाग. या वर्षी ३१ मार्च अखेर २६४ गटांचे आर्थिक हिशोब झाले. त्यात ४४१४ सभासद असून, त्यांनी गट सुरू झाल्यापासून २.७१ कोटी एवढी बचत केली, ६.७५ कोटी कर्ज दिले त्यापैकी ३.८० कोटी येणे बाकी आहे. या व्यवहारात १.२० कोटी व्याज गटात जमा झाले. बहुतेक गावात कामाला सुरुवात करताना आपण बचत गटाच्या माध्यमातूनच सुरुवात करतो. स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व विकसन असे महिलांसाठी उपक्रम करतो. मुलींसाठी किशोरी, युवती विकासाच्या योजना आखतो. आता नव्याने सुनांसाठीही कामाला सुरुवात केली आहे. हा सगळा आटापिटा करतो ते स्थानिक मनुष्य घडण व्हावी यासाठी ज्यातून सक्षम स्थानिक नेतृत्व उभं राहील या विश्वासाने !

❍ **गाव पातळीवर मेळावे :** स्थानिक सक्षम नेतृत्व उभं करण्यासाठी यंदा बहुतेक उपक्रमात छोट्या-मोठ्या जबाबदाऱ्या देऊन कर्त्या गटाला विशेष संधी देण्याची योजना केली होती. गाव पातळीवर मेळावे योजले होते.

❍ **किशोरी विकास :** एप्रिलमध्ये युवतींचे प्रशिक्षण घेतले. त्यांना विज्ञान प्रयोग करायला शिकवले आणि त्यांनी ठरवले की हे प्रयोग २५०० पेक्षा जास्त किशोरवयीन गटापर्यंत पोहोचवायचे! या गटाने खरोखरच प्रयत्नपूर्वक ११७ गावातल्या २५०८ किशोर-किशोरींचा सहभाग असणारे मेळावे घेतले. उद्दिष्ट पूर्तीसाठी शेवटच्या दिवसापर्यंत गटाने कसे झपाटून काम करायचे हे घेणारा २४ युवतींचा गट नक्कीच शिकला!

❍ **महिला मेळावे :** महिलांसाठी मेळावे घेणे ही निवडक महिलांसाठी नेतृत्व संधीच ! अशी संधी घेण्याचे प्रशिक्षण वर्षभर बैठकीत चालू असते. एप्रिलमध्ये हिशोबाचे मेळावे होतात ज्यात गावपातळीच्या सर्व गटांचे एकत्रित हिशोब सांगितले जातात. स्वतः गट घेतात हिशोब चोख ठेवतात अशा महिला या मेळाव्यात हिशोब सांगायला मदत करतात, नवरात्रीच्या दिवसात नवीन गावी कामाच्या विस्तारासाठी मेळावे होतात, ते गटाने जाऊन घ्यायचे असतात. या मेळाव्यात स्पर्धा घेऊन बक्षिस वाटप असा कार्यक्रम असतो व योजक, धडपडणाऱ्या कार्यकर्तीचा सत्कार असे मेळाव्याचे स्वरूप असते, तर संक्रांतीच्या दिवसातला मेळावा गावात होतो त्यासाठी गावातले गट एकत्र येऊन निधी उभा करतात. यंदा अठरा गावात हिशोबाचे मेळावे झाले, नवरात्रीमध्ये सात दिवसात ५२ गावात घेतले. या मेळाव्यांमध्ये १४२० महिला सहभागी झाल्या. दुसऱ्या गावात जावून मेळावा घ्यायची संधी १२२ जणींनी घेतली, ज्यात ५४ जणींनी पहिल्यांदा मेळावा घ्यायची संधी घेतली. असेच संक्रांतीचे स्नेहमेळावे २१ गावात झाले. त्या पैकी सहा गावात ग्रामपंचायत १०% निधीतून हे मेळावे घेण्यात आले. गावातल्याच गटाने नियोजन करून गावातल्या महिलांसाठी संक्रांत वाण आणून लुटले, सगळे नियोजन गावातल्या गटांनी पुढाकार घेऊन केले. मेळाव्यात स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले. व त्याच्या आईचं पण स्वागत करण्यात आले व प्रत्येक मुलीच्या नावाने विमा पॉलिसी काढण्यात आली. काही गावांना शिष्यवृत्ती देण्यात आली. या मेळाव्याला सगळ्या गावांत मिळून ६५० पेक्षा जास्त जणी सहभागी झाल्या तर मेळाव्यासाठी काम करणाऱ्या सात जणींनी कुठली तरी जबाबदारी घेतली.

❍ **स्त्री शक्ती प्रबोधन सप्ताह :** ३ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंती ते १२ जानेवारी जिजामाता जयंती या कालावधीत 'स्त्री शक्ती प्रबोधन सप्ताह' साजरा केला. त्यात ग्रामीण स्त्री शक्ती प्रबोधनाच्या प्रत्येक आयामाचा एक कार्यक्रम ठरवला होता. सहा गावातल्या सतरा जणी तोरणा चढल्या तर युवती-किशोरींचे मेळावे झाले, युवतींसाठी करियर मार्गदर्शन सत्र झाले. दहा गावातल्या २३ महिलांचा स्वयंरोजगार मेळावा झाला, सतरा गावातल्या ३२ महिलांचा ग्राम पंचायत सदस्य मेळावा झाला आणि फक्त ग्रामीण महिलांसाठी वक्तृत्व स्पर्धाही घेतली ज्यात ४८ जणींनी भाग घेतला.

❍ **आत्मप्रचीती परिसंवाद :** साधारण गेल्या दहा वर्षातले ग्रामीण स्त्री शक्ती विभागाच्या कामाचे संकलन करून सादरीकरण करण्यासाठी आत्मप्रचीती परिसंवाद दोन टप्प्यात योजला होता. या सादरीकरणात बचत गट, स्वयंरोजगार, आरोग्य, नेतृत्व विकसन, हिरकणी-बालवाडी-दल उपक्रम, किशोरी विकास, युवती विकास व एकत्रित कार्यकर्ता घडण अशी आठ सादरीकरणे ठरवली होती. त्या त्या विभागाच्या प्रमुखांनी सर्व माहिती गोळा



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 33 31/08/2018 3:19:44 PM

करून स्वतः त्याची दोनदा मांडणी केली. पहिल्या भागात आंबवणे येथे निवडक ९३ ग्रामीण कार्यकर्त्यांसमोर सादरीकरण झाले, ज्या त्या कामात सहभागी होत्या. सादरीकरणा नंतर त्यांनी कामाची पुढील दिशा कशी असावी? असे वाटते असे सांगणारे किमान पंधरा मुद्दे गटा-गटात नोंदवले. दुसरे सादरीकरण पुण्यात प्रबोध सभागृहात झाले. पुणे प्रबोधिनीतील विभागातले ४-५ ज्येष्ठ मार्गदर्शक अन्य केंद्रावरचे निवडक सदस्य, देणगीदार, हितचिंतक असे १३२ जण या दिवसभराच्या कार्यक्रमासाठी टप्प्याटप्प्यात उपस्थित होते. ज्येष्ठ मार्गदर्शक व देणगीदार श्री. अनंतराव सेटलवाड, मा. संचालक, मा. कार्यवाह उपस्थित होते तर डॉ. विवेकराव कुलकर्णी, प्रा. सावितताई कुलकर्णी, वा. सुजलाताई वाटवे, वा. अनघाताई लवळेकर, मा. अजितराव कानिटकर असेही अनेक मार्गदर्शक कार्यक्रमास उपस्थित होते. सादरीकरण करणाऱ्या बहुतेक जणी या उपक्रमाची मांडणी करणाऱ्या नव्हत्या तर त्यातून स्वतः घडल्या होत्या. या निमित्ताने गेल्या दशकाच्या कामाचे संकलन झाले व मांडणी करणाऱ्यांचा कामावरचा विश्वास द्विगुणीत झाला हे विशेष!

❍ **जीवनज्योती महिला सक्षमीकरण केंद्र :** आंबवणे येथे स्टरलाईट टेक फौंडेशनच्या आर्थिक साहाय्याने युवती व महिलांसाठी तंत्र शिक्षण प्रशिक्षण देणारे वर्ग घेतले जातात. ज्यामध्ये संगणकाचे दोन वर्ग (डेटाएन्ट्री ऑपरेटर व एम एस ऑफिस), दोन शिवण वर्ग (फॅशन डिझाईनिंग व बेसिक टेलरिंग), बेसिक पार्लर असे सहा महिन्याचे शासनमान्य अभ्यासक्रम व वर्षभराचा शासनमान्य सर्टिफिकेट कोर्स इन नर्सिंग केअर असे वर्ग घेतले जातात. प्रत्येक वर्गात २५ जणींना प्रवेश दिला जातो. गेल्या वर्षात अशा प्रत्येक वर्गाच्या दोन तुकड्यातून साधारण २८० पेक्षा जास्त मुली उत्तीर्ण झाल्या. त्या जो काळ केंद्रात येतात त्या वेळी त्यांची गावातून जाण्या-येणाऱ्याची व दुपारच्या सकस जेवणाची व्यवस्था आपण करतो. या शिवाय त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून विविध व्यक्तीविकासाच्या सत्रांचीसुद्धा योजना केली जाते. यंदा या मुलींचे विद्याव्रतही केले. मा. संचालक आचार्य म्हणून कार्यक्रमास आले होते.

❍ **बालवाडी –** वेल्ह्याच्या दुर्गम भागात बालवाडी चालवण्याच्या कामाचे हे पाचवे वर्ष! या वर्षी आठ बालवाडींमध्ये ७५ मुले होती. बालवाडीच्या पालक बैठकी नियमित झाल्या. आपण प्रत्येक बालवाडीतील मुलांच्या पायी सहली हा उपक्रम दरवर्षी घेतो. शिक्षकांसाठी प्रशिक्षणाची दरमहा व्यवस्था केली आहे.

❍ **हिरकणी :** हिरकणी प्रकल्प म्हणजे ०-६ वयोगटातल्या मुलांच्या आईचे पालकत्वाचे प्रशिक्षण! या वर्षी हिरकणी प्रकल्पासाठी खांबवडी, चिरमुडी, सोंडे सरपाले, विहीर, हातवे खु., हातवे बु., कोंढणपूर, आर्वी, भाटघर, कासुर्डी ही दहा गावे ठरवली होती. या गावातून नोव्हेंबर पासून हिरकणी सत्र सुरू केली. दरमहा होणाऱ्या या सहा महिन्याच्या प्रशिक्षणात साधारण १०० माता सहभागी झाल्या. विशेष म्हणजे यंदा प्रशिक्षण घेऊन माजी हिरकणींनी जबाबदारीने ही सर्व गावपातळीवरची सत्रे घेतली. या गटाने हराळीला जाऊनही या प्रकल्पाची माहिती देऊन सत्रे घेतली. या शिवाय आजी-माजी हिरकणींचा मेळावा घेतला. त्यात दहा गावातील ४२ जणी स्वतः प्रवास खर्च करून आल्या होत्या. या मेळाव्यात अनुभव कथन व 'तारे जमिनपर' हा सिनेमा पहाणे असे होते.

❍ **दल :** २०१५ पासून गाव पातळीवर दल सुरू केले. ८ ते १२ या वयोगटातील मुलांसाठी यंदा तेरा गावात अठरा ठिकाणी दले सुरू केली. या निमित्ताने सुट्टीत रोज संध्याकाळी ४ ते ५.३० तर एरवी साप्ताहिक गुरु/शुक्र ४.३० ते ५.३० या वेळात साधारण १५ ते २० मुलामुलींचा गट मैदानावर खेळताना दिसू लागला. एकूण २०० मुले-मुली या उपक्रमात सहभागी झाले. काही प्राथमिक शाळेत मुख्याध्यापकांच्या परवानगीने शाळेच्या वेळात शाळेच्या मैदानावर दल चालते. मे मध्ये सुट्टी संपताना जीवनज्योती केंद्रावर या मुलांचा आनंद मेळावा घेतला, त्यात १७५ मुलांचा सहभाग होता. तर बालदिनाला वेगवेगळ्या दहा गावांतल्या दलावर जाऊन त्यांचे मेळावे घेतले.

❍ **एकल महिला :** गेले काही वर्ष नव्याने सुरू केलेला हा विषय. ज्या महिला एकट्या राहतात त्यांना काही वेगळे प्रश्न येतात असे लक्षात आले म्हणून त्यांचे मेळावे घेऊन त्यांच्यासाठी कामाला सुरुवात केली. मे महिन्यात नसरापूरमध्ये एकल महिला मेळावा घेतला. ३२ गावातून १५० महिला मेळाव्याला आल्या होत्या. मेळाव्यात एकल महिलांसाठी असणाऱ्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना अशा सरकारी योजनांची माहिती दिली. वर्षभरात गावोगावच्या २७६ एकल महिलांच्या वैयक्तिक माहितीचे फॉर्म भरून घेतले. आपल्या प्रयत्नामुळे यापैकी ६३ जणींचे शासकीय योजनेच्या लाभार्थी होण्यासाठी काम केले. त्यापैकी ३५ महिलांना सरकारी योजनेतून लाभ मिळायला सुरुवात झाली आहे.

❍ **स्वयंरोजगार प्रशिक्षण :** स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण, उद्योजकता प्रशिक्षण, विक्री *अ*साहाय्य अशा वेगवेगळ्या प्रकारे आपण ग्रामीण महिलांना मदत करतो. यंदा शिवण वर्ग, कापडी पिशव्या बनवणे, खाद्य पदार्थ उत्पादन, उन्हाळी वाळवणे, शेवई उत्पादन अशा वेगवेगळ्या ४० प्रशिक्षणांची गावोगावी योजना केली होती. त्यात १२१ जणी सहभागी झाल्या बारा प्रशिक्षकांनी यात योगदान दिले. त्यातल्या पाच महिलांना नव्याने प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी दिली. उद्योजक महिलांचा उत्पादन विक्रीसाठी आपण दहा लाखां पेक्षा जास्त रकमेच्या उलाढालीला मदत केली. शिवापूर गाव, शिवापूर केंद्र, पुणे केंद्रात प्रदर्शने भरवून स्वयंरोजगाराला प्रोत्साहन दिले.

स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या दोन महिलांना शेवई मशीन उद्योग सुरू करायला भांडवल पुरवून मदत केली तर एकीला फॉल पिको मशीन घेऊन दिले.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 34 31/08/2018 3:19:44 PM

❍ **आरोग्य :** बारा वर्षापेक्षा जास्त काळ आपण गरोदर महिला आरोग्यावर काम करतो आहोत आता त्याचा चांगला परिणाम दिसायला लागला आहे. महिन्यातून दोन वेळा होणाऱ्या या तपासणीला आता दरमहा ८० पेक्षा जास्त गरोदर महिला किंवा त्यासंबंधी तक्रार असणाऱ्या महिला येतात. आपल्याकडे येणाऱ्या सगळ्या जणी आता दवाखान्यातच बाळंत होतात, नियमित औषधे घेतात व सुदृढ बाळाला जन्म देतात.

त्या शिवाय या वर्षी गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची जाणीव जागृती व तपासणी शिबिरे झाली. गावागावात झालेल्या या शिबिरात ३०० पेक्षा जास्त महिला माहिती ऐकायला आल्या तर ६० पेक्षा जास्त जणींनी papsmair तपासणी करून घेतली. कोणालाही कर्करोग निदान झाले नाही पण इतर इनफेक्शन संबंधी सहा शस्त्रक्रीया दीनानाथ रुग्णालयात झाल्या.

या वर्षी नव्याने 'दत्तात्रय' दाताचा दवाखाना जुलै पासून सुरू झाला. पाक्षिक झालेल्या या दवाखान्यात ३२ गावांतून १५७ रुग्णांवर उपचार झाले. डॉ. वैदेही केळकर या प्रशालेय माजी विद्यार्थिनीने जबाबदारी घेतल्यामुळेच हे घडू शकले.

हे सगळे काम करणाऱ्या गटाने या वर्षी जास्त शिस्तीत, नियोजन करून काम केले. विभागाच्या गटागटात २४ बैठका दरमहा नियोजित असायच्या. अशा बैठकांमध्ये ७३ गावातल्या १०२ सदस्य अपेक्षित होत्या. बहुतेक सगळ्या बैठका कमी जास्त नियमिततेने झाल्यामुळेच केवळ परिणामकारक काम होऊ शकले.

❍ **रामसीता पुराणिक तंत्रनिकेतन :** शिवापूर इथल्या रामसीता पुराणिक तंत्रनिकेतनात नेहेमी प्रमाणे यंदाही विविध कौशल्य प्रशिक्षणे व स्वयंरोजगार प्रशिक्षणे घेण्यात आली. त्यात शिवण, मेहेंदी वर्ग, संस्कार भारती पद्धतीने रांगोळी काढणे, मणीकाम, राख्या बनवणे, वाख वस्तू तयार करणे अशी वेगवेगळी अकरा प्रशिक्षणे घेतली, ज्यात १६१ जणी सहभागी झाल्या होत्या. स्थानिक प्रशिक्षिका तयार व्हाव्यात यावर यंदा जोर दिला होता. यंदा अशा सात जणींनी यासाठी नव्याने काम केले. रामसीता पुराणिक तंत्रनिकेतनात उद्योजक मेळावा घेण्यात आला. याला सात गावातून ३६ महिला उपस्थिती होत्या. कुठलातरी उद्योग करावासा वाटणाऱ्या महिला या निमित्ताने एकत्र जमल्या होत्या. या मेळाव्यात आपापली उत्पादने एकमेकींना दाखवणे व आपल्या अडचणी मांडणे, त्यावर गटाने उपाय शोधणे असे केले. त्या निमित्ताने आपल्या केंद्रात काय सोयी आहेत याचीही माहिती महिलांना मिळाली. त्यानंतर शिवण येणाऱ्या काही जणी घरी करायला काम न्यायला लागल्या.

ωωω

## १२. स्त्री शक्ती प्रबोधन - शहरी

**संवादिनी हा मध्यमवयीन महिलांचा शहरी गट आहे. सदस्य संख्या अंदाजे २६० आहे.**

### मासिक बैठक

मासिक बैठक हा संवादिनीचा पायाभूत उपक्रम आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी दु.२.३० ते ४.३० मासिक बैठक होते. एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत झालेल्या मासिक बैठकींचे तपशील खालीलप्रमाणे ––

| दिनांक | विषय | वक्ते | उपस्थिती |
|---|---|---|---|
| एप्रिल | संवाद संवादिनिंशी | संवादिनी सदस्या | ५० |
| जून | प्रतिभा आणि प्रतिमा | डॉ. संगीता बर्वे | ७० |
| जुलै | अवयव दानाचे महत्त्व | डॉ. मेधा परांजपे, वा. रोहिणी आठवले | ४७ |
| ऑगस्ट | मुलांच्या मनाची निगराणी | डॉ. सुजला वाटवे | ४८ |
| सप्टे. | आपले ताण आपल्या हाती | डॉ. अनघा लवळेकर | ८५ |
| ऑक्टो. | दिवाळी अंक प्रकाशन | हस्ते-मा. सुमित्रा भावे | १०० |
| नोव्हें. | दक्षिण भारत अभ्यास दौरा अनुभव कथन | संवादिनी सदस्या | ५० |
| डिसे.२०१७ | आयुर्वेद-भ्रम आणि वास्तव | वैद्य प्रयाग सेठिया | ४२ |
| जाने.२०१८ | संवादिनी स्नेह मेळावा | संवादिनी सदस्या | ९२ |
| फेब्रु. | कचरा व्यवस्थापन | मा. निर्मला कंदलगावकर | ६५ |
| मार्च | मौनसंवाद | मा. आदित्य शिंदे | ८० |

यावर्षी मासिक बैठकीला नवीन व जुन्या सदस्यांची सरासरी उपस्थिती चांगली होती. सप्टेंबर महिन्यामध्ये वा. अनघाताई यांनी सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे रोजच्या आयुष्यात येणारे ताण तणाव आणि त्याचा सामना कसा करावा? असा विषय घेतला. रोजच्या आयुष्यातली विविध उदाहरणे दिल्याने आशय पोचायला मदत झाली.

कचरा व्यवस्थापनात मी काय करू शकते आणि मी काय करायला पाहिजे हे निर्मलाताई कंदलगावकर यांनी फार प्रभावीपणे मांडले. आजच्या काळात 'कचरा' हा सर्वार्थाने ज्वलंत विषय असल्याने ही बैठक फार महत्त्वाची वाटली.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 35 31/08/2018 3:19:44 PM

❍ **संवादिनी संक्रांत स्नेहमेळावा –** २० जाने रोजी संवादिनी स्नेहमेळावा झाला. मा. वनिताताई पटवर्धन यांनी 'बदलांना सामोरे जाताना' हा विषय मांडला. त्यांच्याच हस्ते चारू विधाते, मीनल देशपांडे, सोनाली फापाळे आणि अदिती वाले यांना कृतीशील संवादिनी पुरस्कार देण्यात आला. यावेळी प्रबोधिनीची आणि संवादिनीची ध्वनीचित्र फीत दाखवली. गम्मत खेळ खेळण्याचा आनंदही सदस्यांनी मनापासून अनुभवला. या मेळाव्याला ९२ जणी उपस्थित होत्या.

## समतोल द्वैमासिक

विशिष्ट सूत्र विषय घेऊन समतोल द्वैमासिक काढले जाते. यावर्षीचे समतोलचे विषय खालीलप्रमाणे-:

| | |
|---|---|
| जून २०१७ | वसा स्वच्छतेचा |
| ऑगस्ट २०१७ | पेरते व्हा |
| ऑक्टोबर २०१७ | कुटुंबविश्व आणि विश्वकुटुंब (दिवाळी अंक ) |
| डिसेंबर २०१७ | अभ्यास दौरा विशेषांक |
| फेब्रुवारी २०१८ | ध्यास कलेचा |
| एप्रिल २०१८ | परीक्षा परीक्षा |

समतोल दिवाळी अंक १७ चा विषय 'कुटुंबविश्व आणि विश्वकुटुंब' असा होता आणि याचे प्रकाशन सुप्रसिद्ध सिनेनिर्मात्या आणि प्रथितयश दिग्दर्शिका मा. सुमित्रा भावे यांच्या हस्ते झाले. 'सिने जगतातील माझे कुटुंब' या विषयावर त्यांनी दिलखुलास गप्पा मारल्या. 'परीक्षा परीक्षा' या अंकासाठी बऱ्याच संवादिनी सदस्यांनी उत्स्फूर्त लेखन केले.

## उमलत्या वयाशी जुळवून घेताना.....

उमलत्या वयाशी जुळवून घेताना.....हा किशोरवयीन मुलामुलींसाठी शास्त्रीयदृष्ट्या लैंगिकता प्रशिक्षण देणारा उपक्रम आहे. यामध्ये पालकांसाठी तसेच महाविद्यालयीन गटासाठीही कार्यशाळा घेतल्या जातात.

विविध कार्यशाळांचा तपशील खालीलप्रमाणे-

| क्र. | कार्यशाळा-नाव | एकूण कार्यशाळा | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | उमलत्या वयाशी जुळवून घेताना | ११ | १,१३६ |
| २ | तरुणाईची आव्हाने | ७ | ५९० |
| ३ | बहर जोपासताना | २ | ६४ |
| ४ | प्रशिक्षक-प्रशिक्षण | १ | ४५ |
| ५ | सहजीवनाच्या उंबरठ्यावर | १ | ३८ |
| ६ | ओळख स्पर्शाची(पालकांसाठी) | ३ | ५७५ |
| ७ | ओळख स्पर्शाची(मुलांसाठी) | ११ | ३,७१६ |
| ८ | ओळख स्पर्शाची (प्रशिक्षक-प्रशिक्षण) | २ | ४६ |

❍ **विशेष अनुभव**

१) या वर्षी ठाणे येथे बहर जोपासताना ही कार्यशाळा विद्याव्रत संस्कार झालेल्या मुलांच्या पालकांसाठी घेतली, त्या अनुषंगाने उमलत्या...चे विषय घेतले. या कार्यशाळेला बाबा पालकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. २) प्रबोधिनीतील युवक गटाच्या दादांसाठी प्रथमच कार्यशाळा घेतली. ३) नेतृत्व संवर्धन गटासाठी नेतृत्वाच्या अंगाने विषयांची मांडणी केली. ४) गोगटे जोगळेकर महाविद्यालयात (रत्नागिरी) 'तरुणाईची आव्हाने' ही कार्यशाळा घेतली तेव्हा त्या विद्यार्थांनी निवासी कार्यशाळेची मागणी केली.

## विद्याव्रत संस्कार

प्रबोधिनीबाहेरील १३ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांपर्यंत विद्याव्रत पोहोचविण्यासाठी संवादिनीच्या 'विद्याव्रत संस्कार' गटातर्फे पुण्यातील व पुण्याबाहेरील विविध शाळांमध्ये या संस्काराच्या व्याख्यानमाला घेतल्या जातात.

यावर्षी विद्याव्रत संस्कार उपक्रम प्रशाला बाह्य मुलांसाठी, श्री श्री रविशंकर शाळा, आर. सी. एम. गुजराथी स्कूल, रामकृष्ण बालक संघ आणि ज्ञानदा गुरुकुल येथे झाला. एकूण व्रतार्थी संख्या- ४५०. तसेच पाठपुरावा सत्रामध्ये एकूण तेरा विद्यार्थी सहभागी झाले.

❍ **विशेष गोष्टी –** १) प्रशाला बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पाठपुरावा सत्र घेतले त्यावेळी आर. सी. एम गुजराथी स्कूलच्या खेळ विभागातील मयूरसर (राष्ट्रीय खेळाडू-कब्बडी) यांना मार्गदर्शनासाठी बोलाविले होते. त्यांनी ध्येय, सातत्य, स्वयंशिस्त व मेहनत यावर प्रभावी भाष्य केले. २) ताम्हिणीतील विंझाईदेवी हायस्कूल व पुण्यातील ज्ञानदा प्रशाला येथील विद्यार्थ्यांसाठी पाठपुरावा सत्रामध्ये उपासना विषय कृती रूपात घेण्यात आला. ३) व्रतोपासना या विषयाचे पाठपुरावा सत्र पूर्णपणे कृतीरूप घेतले.

## विकासिका गट

संवादिनीमध्ये नव्याने येऊ लागलेल्या सदस्यांसाठी मुख्यत्वे हा गट सुरू झाला. इ.५वी, ६वी व ७वीच्या विद्यार्थ्यांचे सामाजिक भान वाढावे यासाठी सात विषय ठरवले व त्याची मांडणी केली. हे विषय पुढीलप्रमाणे आहेत. १) परिचय २) आहार ३) प्रसारमाध्यमे ४) निरीक्षण कौशल्ये ५) स्वच्छता ६) आनंद/छंद/सवयी ७) ओळख स्पर्शाची

विविध शाळांमध्ये घेतलेल्या तासिका खालील प्रमाणे ---

| शाळा/संस्था | कालावधी | इयत्ता | संख्या |
|---|---|---|---|
| वेल्हे (सुमेधा प्रकल्प) | १ दिवस | -- | ६१ मुली |
| ज्ञानदा गुरुकुल | ५ दिवस | ७वी | ४५ मुले/मुली |
| ताम्हिणी (विंझाई देवी हायस्कूल) | ४ तासिका | ७वी | २० मुले/मुली |
| असदे (स्वामी विवेकानंद विद्यालय) | ४ तासिका | ७वी | २० मुले/मुली |
| सिद्धिविनायक क्लास | ३ दिवस | ६वी/७ वी | ७५ मुले/मुली |
| वसंतराव वैद्य विद्यालय | ६ तासिका | ६वी/७ वी | ६० मुले/मुली |
| सिद्धिविनायक क्लास | १ तास | संवाद | १५० पालक |

**विशेष नोंदी –** १) स्वामी विवेकानंद यांच्या साहित्याचे वाचन, अभ्यास व त्यावर चर्चा केली.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 36 31/08/2018 3:19:44 PM

२) विषयांच्या एकत्रित प्रभावी मांडणीसाठी श्री अमर देवगावकर यांच्या कडून नाट्य सादरीकरणाचे प्रशिक्षण घेतले.

### कौशल्य गट

संवादिनीमधील समुपदेशनाचे औपचारिक शिक्षण घेतलेल्या सदस्यांचा समावेश कौशल्य गटात आहे.

कौशल्य गटाने घेतलेल्या कार्यशाळांचा तपशील खालीलप्रमाणे--

| ठिकाण | इयत्ता | एकूण विद्यार्थी | एकूण सत्रे |
|---|---|---|---|
| यमगरवाडी | ८वी, ९वी | ११० | ४ सत्रे |
| विद्याविकास विद्यालय | ८वी | १८० | २ सत्रे |
| विद्याविकास विद्यालय | ९वी | ७७ | ८ सत्रे |
| विद्याविकास विद्यालय | १० वी | १० | २२ सत्रे |
| वैद्य शाळा | ८ वी | ४० | ६ सत्रे |

### पालवी

पालवी गटातर्फे नूतन बालविकास शाळेमध्ये आणि ज्ञानदा गुरुकुल येथे दर आठवड्याला एक अशा तासिका घेण्यात आल्या. निरीक्षण व आकलन यावर प्रामुख्याने काम झाले. ज्ञानदा गुरुकुलच्या ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी भाषा, गणित, व भूगोल या विषयांसाठी एक दिवसीय शिबीर घेतले, याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद होता.

### इतर काही महत्त्वाचे

❍ **प्रदीर्घ बैठक –** संवादिनी गटाची प्रदीर्घ बैठक दि. १९ व २० ऑगस्ट या दोन दिवशी सन-वर्ल्ड खानापूर येथे झाली. पुण्याच्या ३५ जणी तर बोरीवलीच्या चारजणी अशा एकूण ३९ जणी उपस्थित होत्या. यावेळी मा. हेमांगी जांभेकर (कार्यकर्त्या व व्यावसायिकता यांची उत्तम सांगड), मा. रामभाऊ डिंबळे (पद्य रचनेमागील भूमिका व अर्थ), मा. सुवर्णाताई (संघटनेतील निसरड्या वाटा), मा. सुजलाताई (संघटनेतील श्रवण व समुपदेशन) अशी सत्रे झाली. तसेच मा. संचालकांचे 'संवादिनी पुढील येत्या काळातील आव्हाने' या विषयावरील मार्गदर्शनपर सत्र झाले.

❍ **प्रतिज्ञाग्रहण –** संवादिनी गटाचा स्वतंत्र असा पहिलाच प्रतीज्ञाग्रहणाचा कार्यक्रम दि. १ ऑक्टो रोजी झाला. या वेळी दहा संवादिनी सदस्यांनी प्रथम, पाच जणींनी द्वितीय तर एकीने पुन्हा तृतीय प्रतिज्ञा घेतली. प्रथम संपूर्ण उपासनेने सुरुवात झाली. नंतर अनघाताईनी प्रस्तावना केली त्यानंतर उतारा वाचन होऊन सदस्यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय प्रतिज्ञा घेतल्या. प्रतिज्ञाग्रहण संदर्भात तीन सदस्यांचे मनोगत कथन झाले मा. संचालकांचे अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

❍ **दक्षिण भारत अभ्यासदौरा –:** पुणे संवादिनीच्या २१ आणि डोंबिवलीच्या दोन अशा एकूण २३ जणी दक्षिण भारत अभ्यास दौऱ्यासाठी दि. २६ ऑक्टो. रोजी गेल्या होत्या. यामध्ये त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, रामेश्वर, मदुराई आणि पुद्दुचेरी या स्थळांना भेटी योजल्या होत्या. 'प्रेरणा स्थळांना भेटी आणि स्थानिक संस्कृतीचा परिचय' हा या अभ्यास दौऱ्याचा प्रधान हेतू होता.

### प्रशिक्षणे

❍ **संवादिनी गटप्रमुख प्रशिक्षण –** दि. ७ डिसें. २०१७ रोजी पूर्ण दिवसाचे 'संवादिनी गटप्रमुख प्रशिक्षण' झाले. यामध्ये सर्व उपक्रमांचे गटप्रमुख आणि एकेक सहकार्यकर्ता अशा एकूण १६ जणी उपस्थित होत्या. निवेदने ह्या सुरुवातीच्या सत्रामध्ये मा. यशवंतराव लेले यांनी तोंडी आणि लेखी निवेदने, प्रतिवृत्ते याबद्दल सविस्तर मागदर्शन केले. त्यानंतर 'शोध नव्या वाटेचा' हा संवादिनीच्या सर्व उपक्रमांमध्ये भर/बदल करण्यासाठी कल्पनास्फोट केला आणि शेवटचे सत्र अनघाताई आणि सुवर्णाताई यांनी 'भवितव्यलेखावर चर्चा' हे घेतले.

ωωω

## १३. जिजामाता दल

❍ **आंबेडकर चरित्र :** जिजामाता दलाच्या सदस्या गेली अनेक वर्षे एक विषय घेऊन प्रकल्प करतात. गेली दोन वर्षे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चरित्राचा आणि विचारांचा अभ्यास दलाच्या वीस सदस्या करत होत्या. त्यांच्या लिखाणातून आणि संकलनातून 'भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर-विचार व आजची परिस्थिती' ही पुस्तिका तयार झाली. दि. १२ एप्रिल रोजी मा. यशवंतराव लेले यांच्या हस्ते, मा. उषाताई खिरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा. रामभाऊ डिंबळे यांच्या उपस्थितीत या पुस्तिकेचा प्रकाशन समारंभ झाला.

जुलै महिन्यात मा. आंबेडकर चरित्र कथन पुस्तक प्रकाशनासाठी झालेल्या प्रवासाबद्दल झेलमताई, सुवर्णाताई, अनुराधाताई यांचा कौतुक सोहळ्याचा कार्यक्रम झाला.

❍ **वर्षारंभ कार्यक्रम :** मा. आर्याताई जोशी यांनी धर्मशास्त्र व व्रतवैकल्याची माहिती दिली. विस्मृतीत गेलेल्या पालेभाज्यांविषयी माहिती संकलन करण्याचा प्रकल्प केला.

❍ **ऑगस्ट २०१७ मध्ये झालेले कार्यक्रम** समर्थ रामदास यांच्या जीवनावर रविंद्र भट यांनी लिहिलेल्या 'भेदिले सूर्यमंडळा' या कादंबरीवर आधारित अभिवाचन झाले.

❍ **नोव्हेंबर मध्ये** संगीताताई कुलकर्णी यांनी मधुमेहावरील औषधी वनस्पती 'स्टिव्हिया' ची माहिती दिली. सुनीताताई देशपांडे यांच्या जीवनावरील माहिती सुषमाताई निसळ यांनी दिली.

❍ **डिसेंबरमध्ये** विभागाची वार्षिक सहल 'तिकोना पिकनिक स्पॉट'ला गेली होती.

❍ **जानेवारी महिन्यामध्ये** मंगेश पाडगावकर यांच्या कवितांचे वाचन व त्यांचे चरित्रकथन असा कार्यक्रम आशाताई होनवाड व अपर्णाताई म्हैसकर यांनी सादर केला. खेड-शिवापूर येथे बचत गटातील महिलांचा संक्रांतीनिमित्त स्नेहमेळावा घेण्यात आला.

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 37 31/08/2018 3:19:44 PM

## १४. नागरी वस्ती विकास विभाग

**मुख्य आठ उपक्रम** : १) **वस्ती भेटी :** संपर्क, संवाद, समाजदर्शन, सर्वेक्षण : गरजा, आस्था, प्रश्नांचा अभ्यास
२) **सल्ला प्रशिक्षण केंद्र** – वैयक्तिक व गट समुपदेशन ३) **प्रेरणा जागृती कार्यक्रम – किशोरी/युवती :** दले, बैठका, मेळावे, प्रशिक्षण वर्ग, सहली, **युवक विकास** : सर्वेक्षण, मेळावे, प्रशिक्षण **महिला विकास :** मासिक बैठक, वार्षिक मेळावा
४) व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे ५) नेतृत्वगुण विकसनासाठीचे उपक्रम ६) समाज ऐक्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम
७) **सेवा योजना** – आरोग्य व अन्य मदत कार्य **८) उद्योजकता** – कला कौशल्य व व्यावसायिक प्रशिक्षण, उद्योग मार्गदर्शन

नागरी वस्ती अभ्यासगटाच्या कामाला सतरा वर्षे पूर्ण होत असताना झालेला अभ्यास व त्यातून जाणवलेल्या गरजांमधून वरील उपक्रम ठरवले गेले.

❍ **वस्तीभेटी व कुटुंब सर्वेक्षण :** नवीन वस्ती जोडत असताना त्या वस्तीतील समस्या जाणून घेण्याच्या दृष्टीने सहा वस्त्यांमध्ये ४७३ कुटुंबांचे सर्वेक्षण केले. यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्य त्यांचे शिक्षण, काही गंभीर आजार, व्यसने इ. माहिती घेतली. याचबरोबर वस्तीमध्ये काय सुधारणा व्हायला हव्यात हेही विचारले गेले. सर्वेक्षण करणाऱ्या कार्यकर्त्यांची घराबद्दलची अथवा आर्थिक सामाजिक परिस्थिती बद्दलची निरीक्षणे सुद्धा नोंदवली गेली.

❍ **किशोरी युवती उपक्रम :** ज्ञान प्रबोधिनीमध्ये २०१७-१८ या वर्षात ५वी ते पदवीधर या गटातील मुली निरनिराळ्या उपक्रमात सहभागी झाल्या. निरनिराळ्या वस्तींमधील ३९ किशोरींचे विद्याव्रत संस्कार शिबिर झाले. स्फूर्तीदलामध्ये पारंपरिक खेळ, बर्चीनृत्य सराव झाला. उपासना घेतली. ऑगस्ट ते डिसेंबर या काळात चार मेळावे प्रबोधिनीत आयोजित केले. 'तरुणाईची आव्हाने' या विषयाअंतर्गत सौंदर्य संकल्पना, मैत्री, प्रेम, आकर्षण, शारीरिक विकसन व लैंगिक दुर्वर्तन, परस्पर पूरकता, व्यसने अशा विषयांवर चार व्याख्याने आयोजित केली गेली. या व्यतिरिक्त बर्चीनृत्य सराव व मिरवणूक सहभाग, अथर्वशीर्ष पठण, भोंडला, खेळ, कलागुणांचं सादरीकरण असे उपक्रम झाले. मे महिन्याच्या सुट्टीमध्ये काशीवाडी, गोसावी वस्ती आणि पाटील इस्टेट या वस्तींमध्ये उन्हाळी शिबिरे झाली. प्रार्थना, पद्य, अभंग गायन, खेळ, रांगोळी, फुले बनवणे, शुभेच्छा पत्र, मेहेंदी असे कला प्रकार शिकवले. कात्रज बाग व डेअरी येथे २४ किशोरींची सहल झाली. राजीव गांधी उद्यान येथे विविध प्राणी बघितले, डेअरी मधील विविध मशिने, दुधापासून बनवलेली उत्पादने बघितली.इस्कॉन मंदिराला भेट दिली.

❍ **किशोर / युवक उपक्रम :** किशोरांसाठी काशीवाडी व वडारवाडी येथे साप्ताहिक दल चालते. MSW विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्य अंतर्गत शाहू वसाहतीमध्ये अभ्यासिका चालवली. दिवाळी मध्ये शिबिर घेतले. आकाशकंदील बनवणे हा उपक्रम झाला. ऑक्टोबर ते डिसेंबर या तीन महिन्यांमध्ये प्रबोधिनीमध्ये किशोर व युवक यांचे तीन मेळावे झाले. काही उपक्रम किशोर आणि युवक ह्यांच्यासाठी वेगळे ठेवले होते. या मेळाव्यांमध्ये पद्य गायन, खेळ, विज्ञान प्रात्यक्षिके – खडू बनवणे, शाई बनवणे, शाईचे डाग काढण्याचे द्रावण, गटकार्य – पणत्या रंगवणे, भेटकार्ड बनवणे, गटचर्चा – किशोर गटात – आदर्श किशोरबद्दलच्या कल्पना, युवक गटात – आदर्श युवकांबद्दलच्या कल्पना, गटचर्चे वर आधारित सादरीकरण, प्रश्नावली भरणे – स्वतः विषयी, किशोर व युवक गट एकत्र उपासना असे विविध उपक्रम झाले.

❍ **युवती प्रशिक्षण :** वस्तीमध्ये काम करणाऱ्या सर्व युवती कार्यकर्त्यांचे दर शनिवारी प्रशिक्षण होते. एकूण दहा कार्यकर्त्या व चार मार्गदर्शक ताया या प्रशिक्षणात सहभागी असतात. प्रशिक्षणामध्ये दलावर करण्याच्या उपक्रमात मदत होईल अशा प्रकारच्या सत्रांचा समवेश आहे. नवीन पद्य शिकणे, पूर्ण प्रार्थनेचा अर्थ, दैनंदिन उपसना, विद्याव्रत पोथी वाचन झाले. कौशल्य प्रशिक्षणात पालवी गटाकडून अध्यापन कौशल्य शिकल्या. सुजाता होनप यांनी बौद्धिक खेळ शिकवले. वैयक्तिक नियोजन – स्वतःच्या व कामाच्या संदर्भात व इतर विषयांवर चर्चा झाली. या गटाची देहूला सहल झाली.

❍ **महिला उपक्रम :** महिलांचे उपक्रम वर्षभर चालू आहेत. मुख्य उपक्रम मासिक बैठका हा आहे. त्याचबरोबर उद्योजिका प्रशिक्षण हा उपक्रम ही चालू आहे. मासिक बैठकीमध्ये वर्षारंभ उपासना, खेळ, वैयक्तिक गप्पा, आत्तापर्यंत करता न आलेल्या गोष्टीची यादी, बचतगट चर्चा-नियम, गटचर्चा-स्त्री शक्तीचे महत्त्वाचे मुद्दे, गटचर्चा-वर्षभर झालेले उपक्रम व त्यावर अभिप्राय, व्याख्यान-स्त्री शक्ती, कणखर कसे बनाल?, व्रतामागील शास्त्रीय दृष्टीकोन, रांगोळी प्रशिक्षण, पुस्तक वाचन, हरितालिका पूजा पोथी वाचन, संत्रिका विभाग माहिती, स्नेहालय संस्थेची माहिती, सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत देवीची गाणी, वर्धापनदिनानिमित्त विविध गुणदर्शन, रामनवमी निमित्त भजने, गाणी इ. कार्यक्रम, तर उद्योजिका प्रशिक्षण अंतर्गत – प्रदर्शन व विक्री, व्याख्यान – उद्योजिकांचे गुण, अनुभव कथन, परीक्षणाप्रमाणे व्यक्तिगत अभिप्राय, उद्योग कौशल्य चर्चा, काशीवाडी उद्योजिका प्रशिक्षण – कागदी पिशव्या, क्विलिंगचे दागिने असे विविध उपक्रम झाले.

❍ **संस्मरणीय घटना :** वर्धापनदिनाला आलेल्या महिलांनी उद्योजकता या विषयावर काही प्रशिक्षण, व्याख्याने आयोजित करावीत असे सुचवले. म्हणून या विषयाची सुरुवात महिलांना काय येते ते समजून घ्यावे या हेतूने ज्या महिलेला जी गोष्ट चांगली येते, ती बनवून आणावी व त्याचे प्रदर्शन करावे असे ठरले. यामध्ये खाद्यपदार्थ किंवा कलावस्तू यांचा समावेश होता. जर कुणाला तयार वस्तू बाजारातून आणून विकायची असल्यास ती संधीही देण्यात आली.

प्रदर्शनात सहभागी असलेल्या सगळ्या महिलांची माहिती गोळा केली. त्याचबरोबर वस्तूचे परीक्षण आणि व्यक्तींचे परीक्षण असे दोन प्रकारे परीक्षण केले.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 38 31/08/2018 3:19:44 PM

प्रदर्शनात मांडण्याच्या वस्तू ताजे खाद्यपदार्थ, टिकाऊ खाद्यपदार्थ, कलावस्तू आणि तयार वस्तू अशा प्रकारे होत्या. प्रदर्शनाची सुरुवात १ वाजता झाली. आलेल्या लोकांना खायला सोयीस्कर व्हावे म्हणून ताजे खाद्यपदार्थ बाहेरील अंगणात मांडले होते. टिकाऊ पदार्थ, कलावस्तू आणि विक्रीच्या वस्तू उपासना मंदिरात मांडल्या होत्या. १.३० वाजता सर्व महिलांच्या वस्तू मांडून तयार होत्या. गटागटाने महिला येत होत्या. आलेल्या महिलांनी प्रदर्शन फिरून बघितले. काही खरेदी केली. प्रत्येक टेबलवर अभिप्राय लिहिण्यासाठी वही ठेवली होती. काहीजणींनी अभिप्राय नोंदवले. प्रदर्शनात आलेल्या पाहुण्यांनी व सहभागी महिलांनी केलेल्या खरेदीतून एकूण प्रदर्शनामध्ये रु. ६,३१२/- इतकी विक्री झाली.

प्रदर्शन चालू असताना जमलेल्या महिलांचे उद्योगावर आधारित असे दोन खेळ घेतले. पहिला खेळ होता आपली क्षमता आजमावण्याचा. खेळामधील लगोर मांडलेली होती. त्यासमोर निरनिराळे टप्पे रंगवले होते. प्रत्येक महिलेने आपण कुठल्या टप्प्यावरून रिंग टाकू शकू ते आधीच ठरवून मग त्याप्रमाणे रिंग टाकायची असा खेळ होता. अशी क्षमता आजमावून त्याप्रमाणे निर्णय घेण्याची क्षमता उद्योगामध्ये उपयुक्त असते. दुसरा खेळ होता Tug Of War. यामध्ये दोन गट केले व रस्सीखेच सुरू झाली. काही मिनटे खेळ झाल्यावर, गटाची प्रमुख बदलायची असे ठरले. असे ठरवल्यावर एकदम तीन ते चार जणी मागे सरकल्या. कोणीही गटाची प्रमुख होण्यास तयार नव्हते. मग परत पहिल्याच गटप्रमुख घेऊन खेळ पूर्ण केला. या खेळात काय शिकायला मिळाले तर उद्योग शक्यतो एकखांबी तंबू असू नये. उद्योगामध्ये दुसरी फळी तयार केली पाहिजे.

चार वाजता ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषरावांनी सत्राची सुरुवात प्रदर्शनाला भेट देऊन केली. त्यांनी प्रत्येक stall ला भेट दिली. यानंतर उद्योजिकांचे गुण या विषयावर मार्गदर्शन करताना मा. सुभाषरावांनी प्रथम उद्योजिका म्हणजे काय ते सांगितले व त्यांनी उद्योजिकांचे महत्त्वाचे गुण सांगितले उदा. स्वतः काम करायला सुरुवात केली पाहिजे, प्रबळ इच्छा, सतत जागरूक, उद्दिष्ट ठरवले पाहिजे व ते उद्दिष्ट वाढवत नेले पाहिजे, उद्दिष्ट कुवतीपेक्षा थोडे अधिक असावे, जोखीम किंवा धोका पत्करला पाहिजे, खर्च व विक्री कागदावर मांडून नफा बघितला पाहिजे, चिकाटी, सातत्य, दुसऱ्या लोकांकडून काम करून घेता येणे इ. प्रदर्शनात आलेल्या सर्व लोकांसाठी हा संस्मरणीय कार्यक्रम ठरला.

ωωω

**नागरी वस्ती ( २०१७ - २०१८) उपक्रम विषय तक्ता व सहभागी संख्या**

| | |
|---|---|
| **किशोरी / युवती - निरंतर नेतृत्वगुण विकास कार्यक्रम** | |
| वस्ती उन्हाळी शिबिरे : खेळ, प्रार्थना, पद्य, कलासत्र - रांगोळी, फुले बनवणे, शुभेच्छापत्र | ९८ |
| सहल - राजीव गांधी उद्यान, कात्रज डेअरी, इस्कॉन मंदिर | २४ |
| निवासी विद्याव्रत शिबिर २ : एप्रिल २०१७ | ३९ |
| स्फूर्ती दल : बर्चीनृत्य सराव, पारंपरिक खेळ, वेळेचे नियोजन, शिवमंत्र व शक्तीमंत्र | ७१ |
| किशोरी मेळावे - ऑक्टोबर ते डिसेंबर चार मेळावे, व्याख्यानमाला (४ व्याख्याने) | २८५ |
| साप्ताहिक दल - काशीवाडी, वडारवाडी, चाफेकर नगर, खैरेवाडी, सातचाळ, स्टेशन परिसर | १२५ |
| **युवती प्रशिक्षण** | |
| कार्यकर्त्या प्रशिक्षण शिबिर : दल प्रशिक्षण, बर्चीनृत्य सराव,<br>स्वतःमधील (क्षमता, कमतरता, संधी, भीती ) SWOT, प्रतिज्ञा ग्रहण | ३० |
| **किशोर / युवक व्यक्तीगुण व नेतृत्वगुण विकास** | |
| अभ्यासिका - ज्ञानदा विद्यालय - शाहू वसाहत | २५ |
| किशोर निवासी शिबिर - प्रबोधिनी वास्तू | १२ |
| दिवाळी शिबिर - शाहू वसाहत | ३३ |
| किशोर मेळावे (३) ऑक्टोबर ते डिसेंबर | २३५ |
| साप्ताहिक दल - काशीवाडी, वडारवाडी , शाहू वसाहत, स्टेशन परिसर | ७० |
| **महिला** | |
| महिला मासिक बैठका | २३३ |
| उद्योजिका प्रशिक्षण सत्र | १७५ |
| **सर्वेक्षण :** कुटुंब सर्वेक्षण : सातचाळ, दहाचाळ, तीनचाळ, गोसावी वस्ती, चाफेकर नगर, खैरेवाडी | ४७३ |
| एकूण | १९२८ |



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 39 31/08/2018 3:19:45 PM

## १५. युवक विभाग

❍ **वर्षारंभ समारंभ :** १७ जून २०१७ ला युवक विभागाचा वर्षारंभ समारंभ झाला. शालेय १९ दलांवर ७५ जणांची नियुक्ती झाली, महाविद्यालयीन पाच दले आणि चार गटांवर ४३, अशी एकूण मिळून ११८ जणांची नियुक्ती झाली. निखील कोकाटे याने हराळीत, शुभंकर केळकर याने साळुंब्रे (तंत्र शिक्षण प्रशिक्षण), कल्पेश कोठाळे याने निगडीत अटल धडपड प्रयोगशाळेची तर दीपक कोतकर याने व्यावसायिकता प्रशिक्षण केंद्राची, अशा या युवक कार्यकर्त्यांनी नियमित दले सोडून प्रबोधिनीच्या कामात विशेष जबाबदाऱ्या घेतल्या. उपस्थिती १७० होती. मा. कार्यवाहांनी मार्गदर्शन करताना युवक विभागाच्या वाढत्या विस्ताराबद्दल आणि पुढे प्रबोधिनीच्या विस्ताराबद्दल मांडणी केली.

❍ **प्रतिज्ञाग्रहण :** दलावर येणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम व्हावा या हेतूने आंतरदलीय सामने झाल्यावर त्याला जोडून प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला. एकूण ३५ जणांनी प्रथम प्रतिज्ञा व दोन युवकांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी मा. संचालकांनी सर्वांना मार्गदर्शन केले. प्रथम व द्वितीय प्रतिज्ञा घेतलेल्यांनी काय करायचे हे सोदाहरण सांगितले.

❍ **इतिहास अभ्यास शिबिर:** शालेय व महाविद्यालयीन दलांच्या मार्गदर्शकांसाठी जून २०१७ मध्ये इतिहास अभ्यास शिबिर झाले. मराठ्यांचा इतिहास, प्राचीन इतिहासाची साधने, भांडारकर संस्था व डेक्कन कॉलेज या संस्थांमधील इतिहास अभ्यासकांच्या भेटी, आधुनिक युगाकडे भारताचा प्रवास अशा विविध विषयांवर पांडुरंग बलकवडे, श्रीनंद बापट, प्रदीप रावत, शिवराम कार्लेकर व विद्याचरण पुरंदरे अशा नामवंतांची व्याख्याने झाली. इतिहासाचा अभ्यास कसा करायचा यावर मा. संचालकांनीही मार्गदर्शन केले. व्हॉटसॅपच्या आधारे, पुण्यात फिरत फिरत, चिठ्ठ्यांचा खेळ – 'सेल्फी विथ हिस्टरी' असा पुण्यातील ऐतिहासिक स्थानांचा परिचय करून देणारा अभिनव खेळही झाला.

❍ **संकल्प निवेदन दिन :** २५ फेब्रुवारी २०१८ रोजी संकल्प निवेदन दिन योजला होता. कार्यक्रमाचे स्वरूप खेळ व व्यायामाची प्रात्याक्षिके, महिनाभर केलेल्या संकल्पांचे निवेदन आणि प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांचे मार्गदर्शन असे होते. कोथरूड भागातील चंद्रशेखर आझाद दल हे महाविद्यालयीन दल व क्रांतिवीर चाफेकर दल आणि लक्ष्मणराव किर्लोस्कर दल ही दोन शालेय दले यात सहभागी होती. दीडशे पालक व युवक यांनी हा सोहळा अनुभवला. व्यक्तिगत आणि सामूहिक संकल्प ठरवायचे आणि कितीही अडथळे आले तरी ते पूर्ण करायचे हा संस्कार यातून घडला. सर्वांच्या संकल्पपूर्तीचे फलक लावले होते.

❍ **दल प्रतिनिधी प्रशिक्षण शिबिर :** दि. १७ व १८ जून असे १०वीची परीक्षा झालेल्या दलप्रतिनिधी गटाचे या वर्षी प्रथमच प्रशिक्षण शिबिर झाले. नऊ भागांमधील दलांवरचे २३ दलप्रतिनिधी या मध्ये सहभागी होते. त्यामध्ये प्रामुख्याने दल म्हणजे काय? दल प्रतिनिधी म्हणजे काय? प्रबोधिनीच्या ध्येयांमध्ये दलाचे महत्त्व किती आणि कसे? अशी प्रस्तावना आशुतोषदादा बारमुखने केली. दुसऱ्या दिवशी खेळ आणि दलावरील रचना समजून घेण्याचे सत्र झाले. तिसऱ्या सत्रात नचिकेतदादाने चालू घडामोडींच्या अभ्यासाचे महत्त्व, प्रासंगिकांचे महत्त्व, वाचन अशा विषयांची मांडणी केली. चौथ्या सत्रात आकाशदादाने शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती, वेळ नियोजन, स्वत:चा अभ्यास अशा विषयांची मांडणी केली. समारोपाच्या वेळेस अखिलेशदादाने दल प्रतिनिधीचे महत्त्व आणि जबाबदाऱ्या असे थोडक्यात समजावले.

### शालेय दले

इ. ४थी ते १०वी मधील विविध शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी आणि महाविद्यालयांमध्ये शिकणारे मार्गदर्शक खेळासाठी मैदानावर जमतात. रोजचा व्यायाम, खेळ, संचलन या सोबत एखाद्या विषयावर प्रासंगिक, पद्य, प्रासंगिक अभ्यासिका इत्यादी अन्य गोष्टी होतात. मुलांच्या पालकांशी संवाद साधणे तसेच ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे विद्याव्रत हीच मध्यवर्ती संकल्पना धरून त्यासाठी संकल्प व व्रतांची मांडणी प्रतोद, मार्गदर्शक दलांवर करतात.

भा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल, सदाशिव पेठ (१२०), स्वातंत्र्यवीर सावरकर दल, सदाशिव पेठ (१२०), छत्रपती शिवाजी दल, सहकार नगर (२५), महाराणा प्रताप दल, कोथरूड (३०), क्रांतिवीर चाफेकर दल, कर्वेनगर (८०), लक्ष्मणराव किर्लोस्कर दल, वारजे (९०), डॉ. वर्गीस कुरीअन दल, धायरी (९०), महात्मा फुले दल, सांगवी (३५), आर्य चाणक्य दल, गोखलेनगर (८०), सरदार वल्लभभाई पटेल दल, गोखलेनगर (४०), डॉ. मेघनाद साहा दल (विज्ञान दल), सदाशिव पेठ (२०), धर्मवीर संभाजी दल, शुक्रवार पेठ (३५), फील्ड मार्शल सॅम माणेकशॉ दल, बिबवेवाडी (६०), राजर्षी शाहू महाराज दल, हडपसर (६०), एकूण दलांमध्ये सहभागी मुलांची संख्या ८८५ आहे तर सरासरी उपस्थिती ४१० असते. (कंसातील आकडेवारी त्या त्या दलांवरील अधिकाधिक उपस्थितीची)

❍ **शालेय मार्गदर्शक दल :** शालेय दले घेणाऱ्या सर्व मार्गदर्शकांचे प्रशिक्षण दर शनिवारी सायंकाळी होणाऱ्या मार्गदर्शक दलावरून होते. मार्गदर्शकांना आव्हानात्मक वाटतील असे सांघिक खेळ (कबड्डी, हँडबॉल इ.) व संचलन असे खेळाच्या भागात होते. बैठकीच्या भागामध्ये दलांच्या उपक्रमांचे निवेदन, मध्यवर्ती उपक्रमाचे शोध– बोध या व्यतिरिक्त वैचारिक विषयांचाही समावेश असतो. या वर्षी १. हिंदुत्व, २. युवक विभागाचे आर्थिक धोरण, ३. शालेय दलांची कार्यपद्धती, ४. पद्ये कशा करता घ्यायची?, ५. शालेय शिक्षण प्रणाली, ६. शिबिरातून काय साध्य होते? असे विषय घेतले गेले. याचबरोबर मा. संचालकांचे विद्याव्रतींची जीवन गुणवत्ता या विषयावर वैचारिकही झाले. (सरासरी उपस्थिती २५)



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 40 31/08/2018 3:19:45 PM

❍ **किशोर आंतरदलीय स्पर्धा :** दि. ३० एप्रिल २०१७ रोजी किशोर दलांचे आंतरदलीय सामने न्यू इंग्लीश स्कूल, टिळक रोडच्या मैदानावर आयोजित केले होते. एकूण अकरा दलांचे २२६ विद्यार्थी उपस्थित होते. लंगडी व डॉजबाल हे सामूहिक तर मिनी marathon, दोरीच्या उड्या व रिले असे वैयक्तिक खेळ होते.

❍ **कुमार आंतरदलीय सामने :** दि. ४ जून रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मैदानावर कुमार वयोगटातील मुलांचे (इ.८वी ते १०वी) हँडबॉल आणि कबड्डीचे आंतरदलीय सामने झाले. एकूण अकरा दलांवरील २२५ मुलांनी आंतरदलीय सामन्यांमध्ये सहभाग घेतला. कबड्डीमध्ये फुले दलानी तर हँडबॉलमध्ये आंबेडकर दलानी विजेतेपद मिळवले. एकूण ६० सामने झाले. प्रत्येक दलावरील मुलांना किमान चार सामने खेळायची संधी मिळाली.

❍ **मेळावा :** गोखलेनगर भागातील दल सुरू होऊन चौदा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल या भागातील युवकांचा मेळावा दि. १९ नोव्हेंबर रोजी आयोजित केला होता. एकूण १६१ युवक या मेळाव्यात उपस्थित होते. यामध्ये सामूहिक खेळ, व्यायाम व पद्य यांचा समवेश होता.

## दलांवरील मुलांसाठीची शिबिरे

❍ **कृषी अनुभव शिबिर :** सावरकर दलावरील इ. ७वीच्या ३४ मुलांचे कृषी अनुभव शिबिर साळुंब्रे येथे चौदा ठिकाणी झाले. गहू, ज्वारी, ऊस, झेंडू, दुधी, कांदा, शाळु, कार्नेशन (हरित-गृह), हरभरा, मका ह्या पिकांची मशागत तसेच कुकुटपालन, गोठा (दुग्धव्यवसाय), दुग्ध-संकलन केंद्र, अन्नपदार्थ प्रक्रिया केंद्र अशा शेतीशी निगडित व्यवसायांची माहिती मिळवली. गोठा / पोल्ट्रीची साफसफाई, गांडूळखत / शेणखत शेतात पांगवणे, पक्षी उडवून लावणे, खुरपणी/तण काढणे, कोळपणी यंत्र चालवणे, वाफे तयार करणे, पाट तयार करणे, शेताला पाणी देणे, दुधीची कापणी करणे, असा शेती बरोबर ग्रामीण जीवनाचाही अनुभव मुलांना मिळाला.

❍ **क्रीडा शिबिर :** कुमार दलांवरील मुलांमध्ये मैदानी खेळाची आवड आणि गुणवत्ता वाढणे या हेतूने क्रीडा शिबिर झाले. यामध्ये विविध भागांतील दलांवरील ६६ विद्यार्थी आणि त्यांच्या बारा मार्गदर्शकांनी सहभाग घेतला. कबड्डी आणि हँडबॉल (पारंपरिक), रग्बी आणि बेस बॉल (नवीन) आणि athletics, gymnastics, archery, कुस्ती, लाठीकाठी (वैयक्तिक) असे खेळ निवडले होते.

## महाविद्यालयीन दले

महाविद्यालयीन दलांवर ११वी पासून विविध महाविद्यालयांमध्ये विविध शाखांमध्ये शिक्षण घेत असणारे व काही प्रमाणात शिक्षण संपवून नोकरी वा व्यवसाय करणारेही युवक सामान्यतः सप्ताहातून एकदा येतात. त्यांच्यासाठी काही समवयस्क व काही वयाने मोठे युवक दादा म्हणून काम करतात. खेळ, चर्चा, अभ्यासगट असे विविध प्रकार वापरून महाविद्यालयीन युवकांचे संघटन केले जाते.

चंद्रशेखर आझाद दल, कर्वेनगर- कोथरूड (५०), डॉ. विक्रम साराभाई (विज्ञान) दल, सदाशिव पेठ (४०), नेताजी सुभाषचंद्र बोस दल (३०), लोकमान्य टिळक दल, सहकारनगर (१५), चाणक्य दल – युवक गट गोखलेनगर (२०), भगतसिंह दल सदाशिव पेठ (३०) अशी वृत्तांत वर्षात पदवीपूर्व व पदव्युत्तर गटांमधील युवकांची दले चालू होती.

१. एप्रिल व मे महिन्यात वेल्हे भागातील प्रबोधिनीच्या झरे विकास प्रकल्पांच्या कामात, एकूण आठ रविवारांमध्ये ६० युवकांनी मिळून घीसर आणि हिरवे वस्ती, या वेल्हे तालुक्यातील गावांमध्ये २५० मनुष्यदिवस काम केले. श्रमदान, सर्वेक्षण व संयोजन अशा प्रकारे हा सहभाग घेतलेला होता.
२. अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाला असणाऱ्या युवकांच्या प्रकल्पांचे सादरीकरण व त्या-त्या विषयातील तज्ज्ञ आणि इतर विद्यार्थी यांच्याकडून मूल्यमापन झाले. अशा स्वरूपाचा हा पहिलाच कार्यक्रम होता. (१७ फेब्रुवारी) एकूण २१ प्रकल्पांच्या गटांनी आपापले सादरीकरण केले.
३. आझाद दलावर मार्गदर्शक म्हणून कार्यरत असलेल्या गिरीशच्या पुढाकारातून सुतारदरा येथे स्वच्छता मोहीम राबवली गेली. जवळपास राहणारे ४०-५० युवक या श्रमकार्यात सहभागी झाले.
४. जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला भीमा कोरेगाव येथे झालेल्या दंगलीला प्रतिसाद म्हणून बोस दलाचे युवक वढू आणि कोरेगाव भीमा येथे भेट देऊन आले. दंगलीमुळे झालेले नुकसान बघत असतानाच वेगवेगळ्या विचारप्रवाहांचा संतुलित अभ्यास करणे किती गरजेचे असते याचा प्रत्यक्ष अनुभव गटाने घेतला.
५. सर्व महाविद्यालयीन मार्गदर्शकांसाठी 'तरुणाईची आव्हाने' (१०-११ फेब्रुवारी) व 'भावनिक व वैचारिक समायोजन' (REBT) (१०-११ मार्च) या विषयांवरील विशेष प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात आली होती. ३५ सदस्य दोन्ही वेळी उपस्थित होते.
६. याशिवाय बोस दलाने अभ्यास यज्ञ, विज्ञान दलाने 'उत्क्रांती अभ्यास शिबिर' असे उपक्रम आपापल्या दलांवर राबवले.

## अन्य उल्लेखनीय उपक्रम

❍ **प्रबोधन शिबिरे :** विविध ठिकाणचे लोक, त्यांच्या चालीरीती आणि समाजातील चांगले काम पाहण्याकरिता अभ्यास दौऱ्यांची योजना केली होती. त्याचा पुढचा टप्पा प्रबोधन शिबिरांच्या स्वरूपात सुरू झाला. छत्तिसगड आणि ओडिशा, जिथे अभ्यास दौरे झाले आहेत त्या ठिकाणी जाऊन युवकांनी पाच दिवस-ांची शिबिरे घेतली. बोस दलाच्या एकूण नऊ युवकांनी यामध्ये सहभाग घेतला. अतिशय दुर्गम भागात राहणाऱ्या एकूण ७५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना या शिबिरांचा लाभ झाला.

❍ **१२वी अभ्यास शिबिर :** जानेवारी महिन्यात बोस दल, आझाद दल आणि चाणक्य दलावरील १२वीतील वीस सदस्यांना अभ्यास कौशल्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तीन युवकांनी मार्गदर्शक म्हणून काम केले.


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 41 31/08/2018 3:19:45 PM

❍ **विज्ञान शिबिरे :** विविध प्रयोग, क्षेत्र भेटी, पुस्तकं वाचन आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे संशोधन पद्धतीची ओळख करून घेऊन संशोधनात्मक प्रकल्प करणे. वर्षभरातील दोन विज्ञान शिबिरांमध्ये नवीन विद्यार्थ्यांसाठी भाग १ व पूर्वी शिबिरात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी भाग २ चे शिबिर होते. दोन्ही शिबिरातील भाग १ मध्ये १०० मुले, भाग २ मध्ये १३ मुले सहभागी झाली होती. दोन्ही विज्ञान शिबिरात मिळून २५ युवक पूर्ण वेळ उपस्थित होते.

याशिवाय विशेष उल्लेखनीय म्हणजे विज्ञान पुस्तिकेचे संपादन व विज्ञान त्रैमासिक अंकाचे प्रकाशन झाले.

❍ **ओडिशा अभ्यास दौरा :** मयूरभंज, भुवनेश्वर, कंधमाल इ. विविध ठिकाणी चालू असलेले सरकारी व गैरसरकारी संस्थांचे प्रदेशविकसनाचे काम बघणे, आदिवासी पाड्यात मुक्काम करून तेथील आदिवासी जीवनाचा अनुभव घेणे, ऐतिहासिक वारसा स्थळांना भेटी देणे. दौरा झाल्यानंतर प्रबोधिनीत युवकांकडून अनुभवांचे जाहीर सादरीकरण झाले.

## विक्री उपक्रम

❍ **गणेश मूर्ती विक्री :** पेणवरून शाडूच्या गणेशमूर्ती विकत आणून गणेशोत्सवाच्या कालावधीत प्रबोधिनीमध्ये विक्रीसाठी ठेवल्या होत्या. महाविद्यालयीन दलांवरील युवकांनी जबाबदारी घेऊन आ-ठवडाभर stall चालवला. पहिलेच वर्ष असून सुद्धा १.४ लक्ष रुपयांची उलाढाल करून ४८ सहस्र रुपये नफा मिळवता आला.

❍ **आकाशकंदील विक्री व पणती विक्री** : अनेक शालेय व महाविद्यालयीन दलांवरील युवकांनी आकाशकंदिलविक्री असा उपक्रम केला. बरोबरीनेच पणती विक्री सुद्धा झाली. महाविद्यालयीन युवकांसाठी शालेय युवकांना मार्गदर्शन करणे आणि एकूण व्यवसाय प्रशिक्षण घेणे ही उद्दिष्टे होती. एकूण नऊ stallवर मिळून ५ लक्ष रुपयांची उलाढाल करून १ लक्ष रुपये नफा मिळवला.

## गणेशोत्सव

शालेय आणि महाविद्यालयीन दलांचा एकत्रित महत्त्वाचा उपक्रम. प्रबोधिनीचा सार्थ, सुरचित संस्कारांचा आग्रह सर्वत्र पोहोचवण्यासाठी अनेकांनी घरोघरी जाऊन गणेशप्रतिष्ठापना पूजा सांगितल्या. ढोल, बर्ची, ताशा, प्राणप्रतिष्ठापना, व्याख्याने इ. कार्यक्रमाचा सराव होऊन अंदाजे ५०० शालेय विद्यार्थी, २५०+ युवक व ५०+ मार्गदर्शक सहभागी झाले. वादन, बर्ची यांचा नियमित सराव होण्यासाठी सारसबागेजवळील गरवारे बालभवन व दत्तमंदिर (कोथरूड) येथे जागा भाड्याने घेतली होती. याशिवाय इतर पथकांच्या मांडवांमध्ये जाऊन त्यांच्याबरोबर युवकांनी वादन केले. पथकांच्या एकत्रीकरणातील हे महत्त्वाचे पाऊल ठरू शकेल.

❍ **काही वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी :**

- बर्चीनृत्यात बारा शालेय दलांवरील सुमारे ३०० विद्यार्थी तसेच तीन युवक दलांवरील अंदाजे २०० युवक सहभागी झाले. सर्व गटांनी मिळून सुमारे ३० प्रात्यक्षिके व सोळा मिरवणुकींमध्ये सहभाग घेतला. गणेश चतुर्थीला पुण्याच्या विविध भागांमध्ये एकूण सात मिरवणुका/प्रात्यक्षिके झाली. अनंत चतुर्दशीला एकाच वेळी तीन मोठ्या मिरवणुका पुण्यात व मुंबईमध्ये मिळून झाल्या.
- बहुतांश मिरवणुकींमध्ये व प्रात्यक्षिकांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. बावधन येथील ग्लोरिया सोसायटीतील नागरिक व धायरी येथील मियामी सोसायटीतील नागरिक/ मुले यांचा स्वतंत्र बर्ची गट होता. सलग तिसऱ्या वर्षी गणेशपेठेतील दोन मंडळांची संयुक्त मिरवणूक झाली.कुष्ठरोग्यांना उत्सवात सहभागी करून घेण्यासाठी कोंढव्याच्या आश्रमात जाऊन आंबेडकर दलावरील ४० मुलांनी उत्स्फूर्त प्रात्यक्षिक केले.
- यावर्षी सावरकर दलाच्या ५वी ते ७वीच्या मुलांनी फितींचे हात बसवले होते. याबरोबरच सावरकर दलातील मुलांनी सुमारे २०० घरांमध्ये गणेश पूजा साहित्याची विक्री केली. एका पथकाने नाटकही बसवले होते. घरोघरी व मंडळांसमोर सार्थ अथर्वशीर्षाचे सादरीकरण झाले.
- सहा दलांचा एकत्र किशोर मेळावा प्रबोधिनीमध्ये झाला, ज्याला ५० विद्यार्थी उपस्थित होते. सजावट स्पर्धा, मंडळे फिरून माहिती गोळा करणे असे उपक्रम त्यामध्ये झाले.

❍ **गांधी वस्तीतील प्रात्यक्षिक :** बकरी ईदच्या दिवशी युवक विभागातील ५० मार्गदर्शकांनी गांधी वस्तीमध्ये बरची नृत्याचं प्रात्यक्षिक केलं. बर्चीनृत्यातील विविध प्रयोग त्या दिवशी करून पाहीले. त्यानंतर हिंदू-मुस्लिम मिश्र वस्ती असलेल्या ठिकाणी २८ घरांत मातृभूमिपूजन केले. बहुतेक मार्गदर्शकांकरिता मातृभूमिपूजनाचा हा पहिला अनुभव होता. विविध घरांमध्ये प्रबोधिनिनी प्रचीतीच्या माध्यमातून केलेल्या कामांच्या आठवणी ऐकायला मिळाल्या. नागरवस्ती अभ्यास गटातील हिराताईंनी या प्रात्यक्षिकासाठी मदत केली.

❍ **पथके मेळावा (१३ ऑगस्ट)** : ५० पथकांचा सहभाग असलेला पथके मेळावा ५०० पुणेकरांच्या उपस्थितीत रमणबाग प्रशालेत झाला. १५० युवक आणि ५० युवतींचे बर्चीनृत्य झाले. खडकवासला येथे असलेल्या धरण खोलीकरण व वृक्षसंवर्धन प्रकल्पात विशेष काम केलेले कर्नल सुरेश पाटील यांचे मार्गदर्शन झाले.

❍ **मंडळे मेळावा (२० ऑगस्ट) :** सलग दुसऱ्या वर्षी प्रबोधिनीच्या ओळखीतील मंडळांना एकत्रीकरणासाठी आवाहन करून एकमेकांशी आपापल्या उपक्रमांबाबत देवाणघेवाण करण्यासाठी एकत्र बोलावले. अनेक मंडळानी त्यांच्या सामाजिक उपक्रमांबद्दल व पुढाकाराबद्दल मांडणी केली. (११ मंडळे)

❍ **विज्ञान प्रदर्शन :** यावर्षी १३ वे विज्ञान प्रदर्शन दि. १ ते ४ सप्टें. मध्ये प्रबोधिनीत सायंकाळी ७ ते ११ या वेळात झाले. यावर्षीच्या विज्ञान प्रदर्शनाचा रसायनशास्त्र असा विषय होता. ६००० प्रेक्षकांनी प्रदर्शनाला भेट दिली. शालेय दलावरील २५ तर युवक दलावरील ३५ विद्यार्थी प्रदर्शनामध्ये सहभागी झाले होते. रसायनशास्त्रातील ४० वैविध्यपूर्ण प्रयोग या प्रदर्शनातून दाखवले गेले.

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 42 31/08/2018 3:19:45 PM

# १६. युवती विभाग

विभागाची वर्षांत उपासना दि. ७ मे रोजी झाली. उपासनेनंतरच्या सभेत विभागाच्या वर्षभरातील विविध उपक्रमांचा व जबाबदार युवतींच्या कामांचा आढावा सादर झाला व सुट्टीतील उपक्रमांविषयी व नियोजित दौऱ्यांविषयी माहिती देण्यात आली. याशिवाय या गटातील सुमारे बारा युवती प्रबोधिनीतील विविध विभागांमध्ये तेथील कामाचा अनुभव घेत आहेत, यातील एक प्रातिनिधिक निवेदन सभेमध्ये झाले. सभेचा समारोप मा. संचालकांच्या मार्गदर्शनाने झाला. 'वर्षभर शिकलेल्याचे उपायोजन सुट्टीत करायला हवं; आपली नियमित बलोपासना-सेवारूप उपासना- कर्तव्यरूप उपासना-पराक्रमाची उपासना सुरू असली पाहिजे, व्यक्तिगत आणि सामूहिक दोन्हीही उपासना गरजेच्या आहेत; याबरोबरच आयुष्यभरासाठी 'संघटना हे सूत्र' किती जणींचे बनले आहे हेही गरजेचे असते, एकदा ते सूत्र ठरले की अडचणींतूनही मार्ग काढता येतो.

दि. १ जुलै २०१७ रोजी झालेल्या पुणे केंद्राच्या वर्षारंभाच्या निमित्ताने विभागातील काही प्रमुख नव्या नियुक्त्या या दिवशी झाल्या:

युवती संघटन सचिव : कु. प्रज्ञा प्रभुदेसाई
महाविद्यालयीन दले प्रमुख : कु. अबोली पुरंदरे
शालेय दले सा. विभागप्रमुख : कु. श्रुती वैद्य

दि. २२ व २३ जुलै रोजी युवती विभागाची प्रदीर्घ बैठक झाली. भवितव्य लेखासंबंधी चर्चा व वार्षिक नियोजन असे बैठकीतील सत्रांचे स्वरूप होते. बैठकीत २२ युवती उपस्थित होत्या.

दि. २३ रोजी नागरवस्ती अभ्यासगटातील युवतींचे प्रतिज्ञाग्रहण, मा. संचालकांचे मार्गदर्शन व त्याला जोडून युवती विभाग वर्षारंभ व नियुक्त्या असा कार्यक्रम झाला. या प्रतिज्ञाग्रहण समारंभात सात जणींनी प्रथम तर दोन जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

नवीन वर्षासाठी युवती विभाग सहविचार समितीच्या सदस्या म्हणून पाच युवतींच्या तर विषयानुरूप निमंत्रित सदस्या म्हणून चार युवतींच्या नियुक्त्या झाल्या. याव्यतिरिक्त अन्य नियुक्त सदस्य संख्या :

प्रशालेय दल प्रतिनिधी - ८
प्रशालेय दल मार्गदर्शिका - ३
प्रबोधशालेय दल मार्गदर्शिका - ६

पुणे केंद्रात दि. १४ जुलै २०१७, आषाढी एकादशीनिमित्त भजन झाले. याची समन्वयाची जबाबदारी युवती विभागाकडे होती. एकूण आठ विभागातील ४६ सदस्यांचा भजन सांगण्यात सहभाग होता.

दि. १३ ऑगस्ट रोजी पुण्यातील सर्व वाद्यापथकांचा मेळावा युवक विभागाने आयोजित केला होता, ज्याला विभागातील काही जणी देखील उपस्थित होत्या. या मेळाव्या दरम्यान तिथे आलेल्या युवतींचा बर्चीचा गट घेतला. सुमारे ४० जणींचा आयत्यावेळेस बर्ची करणारा गट होता.

दि. १० जुलै ते २४ ऑगस्ट दरम्यान झालेल्या सरावाच्या आधारावर, युवती विभागातर्फे गणेशोत्सव उत्साहात पार पडला. ज्यात प्रत्येकी ४० जणींच्या प्रशालेय विद्यार्थिनींच्या तीन बर्चीगटांचा व एका लेझीम गटाचा तसेच ५५ - ६० युवतींच्या महाविद्यालयीन बर्चीगटाचा सहभाग होता. या व्यतिरिक्त वादक गटात ४८ जणींचा ढोलासाठी व बारा जणींचा ताशासाठी सहभाग होता व एकोणीस जणींचा ध्वजधारी गट होता.

प्रबोधिनीच्या पुणे केंद्राव्यतिरिक्त यावर्षी पेरुगेट, विनायक मित्र मंडळ, सहकार नगर, आकाशतारा मित्र मंडळ (कवठे एकंद, तासगाव, सांगली) व ग्राहक पेठ या चार ठिकाणी युवतींनी मिरवणुकीत सहभाग घेतला. तसेच, तेजोवलय सोसायटी वारजे, स्नेह पॅरेडाईज सोसायटी, पौड रोड व प्रगतीशील मित्र मंडळ, मुंजाबाचा बोळ या तीन ठिकाणी बर्चीनृत्याची प्रात्यक्षिके सादर झाली. यापैकी तेजोवलय सोसायटी व स्नेह पॅरेडाईज येथील स्थानिक गटाचा ही सहभाग होता व ग्राहक पेठेच्या मिरवणुकीतही आयत्यावेळेस बघायला आलेल्यांपैकी काही जणींनी बर्चीनृत्यात अंशकालीन सहभाग घेतला. प्रबोधशालेय दलांवर येणाऱ्या दहा मुलींचा एक गट देखील ज्ञान प्रबोधिनीच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाला होता. तसेच यावर्षी देखील काही युवतींनी पाच ठिकाणी गणेश प्रतिष्ठापनेची पूजा ज्ञान प्रबोधिनीच्या पद्धतीने केली.

या वर्षीचे विशेष म्हणजे, दि. ४ सप्टेंबर रोजी आजी व माजी युवतींची गणेशोत्सवानिमित्त आकाशवाणी वर झालेली मुलाखत! ४ सप्टेंबर रोजी या मुलाखतीचे ध्वनिमुद्रण झाले व दि. ६ सप्टेंबर रोजी प्रक्षेपण. यात अनघाताई व सुवर्णाताई यांनी विभागाच्या बर्ची व वादक गटाच्या सुरुवातीच्या काळातील अनुभव सांगितले. मीरा शेटे, वेदांगी पटवर्धन, प्रणाली गोगटे, मुक्ता भिडे, प्रज्ञा प्रभुदेसाई, मृणाल जोशी व निवेदिता जोशी या सध्या कार्यरत असणाऱ्या युवतींनी एकूण बर्चीचा इतिहास, गणेशोत्सवाची तयारी व सराव, शालेय गटाचा सहभाग, वादक व ध्वजधारी गटाचा सहभाग या बद्दल माहिती दिली.

वर्षाच्या सुरुवातीला जबाबदार युवतींच्या होणाऱ्या मासिक बैठकांमधून, दल मार्गदर्शिकांना अधिक सक्षमपणे दल घेता यावे या साठी मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळावे'. असा विचार झाला होता. त्या दिशेने दि. ६ नोव्हें. रोजी झालेल्या बैठकीत याचे पहिले सत्र झाले. या सत्रात शामलीताई व मीराताई यांनी उपस्थित युवतींचे पद्य मार्गदर्शन सत्र घेतले.

- **महाविद्यालयीन**

युवती विभागातर्फे इयत्ता १०वीची परीक्षा दिलेल्या

मुलींचा दि. १२ ते १९ मे या कालावधीत तेलंगणा-आंध्र प्रदेश व दि. २० ते २८ मे या कालावधीत गुजरात अभ्यास दौरा नेण्यात आला. दोन्ही दौऱ्यांमध्ये मिळून इ. १०वीतील २६ मुली, दोन महाविद्यालयीन युवती व चार मार्गदर्शिकांचा समावेश होता. या दौऱ्यांचा मुख्य उद्देश आपण ज्या देशात राहतो तो देश समजून घेणं, यादृष्टीने विविध प्रदेशांची ऐतिहासिक, सांस्कृतिक व सामाजिक परिस्थिती समजून घेणे आणि तिथे विविध विषयांवर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या व संस्थांच्या भेटी घेऊन त्यांचे काम समजून घेणे असा होता.

बागेश्रीताईंनी अभ्यास शिबिरात केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतल्या इयत्ता १०वीची परीक्षा दिलेल्या सुमारे सोळा विद्यार्थिनींनी परीक्षेनंतर सुट्टीच्या काळात विविध विभागांमध्ये काम करण्याचा अनुभव घेतला. आपल्याला कोणत्या विभागात काम करायला आवडेल असं त्यांनी सांगितलं होतं, त्यानुसार त्या-त्या विभागप्रमुखांशी बोलून कामातून प्रबोधिनीचा अधिक परिचय होण्याच्या हेतूने या कामाचे नियोजन करण्यात आले होते. या अंतर्गत संत्रिका, प्रशाला, नैसर्गिक संसाधने विभाग, स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण, शैक्षणिक उपक्रम संशोधिका या विभागांमध्ये मुलींनी कमीत कमी दोन दिवस ते जास्तीत जास्त एक आठवडा रोज दोन ते चार तास काम केले.

दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील, आषाढीनिमित्त वारीत श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीबरोबर विविध टप्प्यांत प्रशालेय युवतींनी सहभाग घेतला. १. प्रशालेच्या इ.१०वीमधील ३३ विद्यार्थिनी, ग्रामीण गटातील तीन युवती, नागरी वस्ती गटातील दोन युवती, सहा साहाय्यक ताया, तीन दल प्रतिनिधी आणि एक मार्गदर्शिका- ४८चा गट- आळंदी - पुणे टप्पा (१७-१८ जून), २. प्रशालेच्या इ. ९वीतील ३८ विद्यार्थिनी व ४ दल प्रतिनिधी- विश्रांतवाडी ते पुणे (१८ जून), ३. या शिवाय इ. ८वीच्या प्रशालेय गटानी हडपसर ते दिवेघाट या टप्प्यात २० जून रोजी सहभाग घेतला.

दि. २८ जाने. रोजी, इ. ७वी मुलींची रोहिडा गडावर सहल गेली. ३२ मुली व तीन मार्गदर्शिका असा सहलीला गेलेला गट होता. सहलीचे स्वरूप सकाळी जाऊन संध्याकाळी परत असे असल्याने खूप फिरता आले नाही, पण एकुणात गटाने या सहलीचा मनसोक्त आनंद लुटला.

### ❍ प्रबोध शालेय दले

पर्वती, पौड रस्ता व सदाशिव पेठ अशा तीन ठिकाणी सुरू असणाऱ्या साप्ताहिक प्रबोधशालेय दलांचा ज्ञान प्रबोधिनी सदाशिव पेठ येथे २६ एप्रिल रोजी मेळावा झाला. या वेळी तिन्ही दलांवरील मिळून सुमारे २५ मुली उपस्थित होत्या. उपासनेने दिवसाची सुरुवात झाल्यानंतर मुलींना प्रबोधिनीची चित्रफित दाखवण्यात आली व प्रबोधशालेय दलांचा गणेशोत्सवात सहभाग वाढावा या दृष्टीने या गटाला पुढील सत्रात बर्चीनृत्याची ओळख करून दिली. मेळाव्याच्या त्यानंतरच्या भागाला मा. संचालकांची वार्षिक भेट योजली होती. तिन्ही दलांवरील मुलींचे मिश्र गट बनवून प्रत्येक गटाने विविध विषयांवर सादरीकरणे बसवून संचालकांसमोर सादर केली. मेळाव्याचा शेवट मा. संचालकांच्या मार्गदर्शनाने झाला.

ज्ञान प्रबोधिनी भवन येथे जमणाऱ्या प्रबोध शालेय दलाचे १७-१८ जून असे निवासी दल झाले. यास एक मार्गदर्शिका व बारा मुली उपस्थित होत्या. स्नेह पॅरडाईज येथे जमणाऱ्या प्रबोध शालेय दलाची १८ जून रोजी पहिली वर्षा-सहल भाजे लेणे व लोहगड येथे झाली. दोन मार्गदर्शिका व आठ मुली अशी उपस्थिती होती.

ωωω


## ज्ञान प्रबोधिनीची संग्राह्य पुस्तके/DVD

**कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके**

**✲ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके**
३५. जिद्दीची लोभस रूपं ६०
३६. आयुष्यातील वादळलाटा ८०
३७. कथा इस्रोची ८०
३८. आम्ही असे घडलो ८०
३९. हरिसिंह नलुआ.. ६०
४०. आमची जडणघडण ८०
४१. गोष्टीरूप आप्पा ५०
४२. आपले आप्पा ५०
४३. समाजशिल्पी आप्पा ८०

**✲ विचार व कृतिप्रवर्तक लेखांचा संग्रह**
४४. स्वीकारशील स्वदेशी ५०
४५. हरित संदेश १५
४६. Green Messages . २०
४७. हट्टी व्हा हट्टी ७०

**✲ अभ्यासविषयक पुस्तके**
४८. असे घटते सुंदर अक्षर २०
४९. प्रज्ञाबोध भाग-४
५०. प्रज्ञाबोध भाग-५ ७०
५१,५२. अभ्यासातील स्वावलंबन
अभ्यासाची पूर्वतयारी भाग १ ६०
अभ्यासाची कौशल्ये भाग २ ८०
५३. चला प्रकल्प करूया १००

**✲ कलाकृतिपर पुस्तके**
५४. त्रिमितीची किमया ८०
५५. 3D Magic ९०
५६. कागदी हस्तकलेच्या दुनियेत ५०
५७. हस्तकलांचा उत्सव ७०
५८. कलेच्या विश्वात ७०
५९. अभिवाचन एक कला ७०





Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 44 31/08/2018 3:19:45 PM

## १७. उद्योजकता विकास केंद्र

प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात सुरू झालेल्या या केंद्राला वृत्तांत वर्षात चांगले भरीव स्वरूप आले. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेच्या वतीने बीम (BEAM) नावाची जी चाचणी विकसित झाली तिचा प्रसार करण्याचे काम एकीकडे तर दुसरीकडे नव उद्योजकांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे, असे यंदाच्या कामाचे स्वरूप होते. ह्या चाचणीचे काम ज्ञान प्रबोधिनीच्या अभिक्षमता मापन विभागात केले जाते. ही चाचणी इ. १२वी नंतर व त्यापुढे असलेल्या सर्वांसाठी उपयुक्त आहे. ज्यांना नवीन व्यवसाय सुरू करायचा आहे किंवा सध्या चालू असलेल्या व्यवसायात काही अडचणी येत असतील, अशा लोकांसाठी ही चाचणी अतिशय उपयुक्त आहे. ह्या चाचणीतून उद्योजकतेसाठी उपयुक्त असणाऱ्या अभिक्षमता (Aptitude) व व्यक्तिमत्त्वाचे पैलू (Personality Factors) मोजले जातात. चाचणीचा अहवाल (Report) समजावून सांगितला जातो. गरज असल्यास ज्ञान प्रबोधिनीच्या उद्योजकता विकास केंद्रात पुढील मार्गदर्शनासाठी (Mentoring) पाठविले जाते. सन २०१७-१८ या वर्षामध्ये ४१ व्यक्तिंनी उद्योजकता अभिक्षमता चाचणी दिली. या चाचणीच्या अहवालाचे स्वरूप गेल्या वर्षभरात अधिक आकर्षक केले असून आलेख व तक्त्यांच्या साहाय्याने व्यक्तिला आपला मानसपट समजण्यास सोपे जाऊ लागले आहे.

❍ **संस्थात्मक संपर्क :**

उद्योजकतेच्या क्षेत्रात ज्या अन्य संस्था अगोदर पासून कार्यरत आहेत त्यांच्याशी काही संपर्क प्रस्थापित झाले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर (MCCIA) यांच्याशी ऑक्टोबर २०१७ पासून वाटाघाटी चालू झाल्या. त्यांच्याद्वारे आपली उद्योजकता चाचणी देण्याचे काम नियमितपणे सुरू व्हावे अशा कराराचा मसुदा मार्च २०१८ अखेर तयार झाला. या साहचर्याची सुरुवात नव्या आर्थिक वर्षापासून होईल. महाराष्ट्र शासनाच्या MCED, पुणे व औरंगाबाद येथील केंद्रांशी संपर्क साधून त्यांनाही या प्रकारचा प्रस्ताव दिला आहे. व्यावसायिक पद्धतीने उद्योजकतेचे मार्गदर्शन करणाऱ्या ज्या संस्था पुण्यात आहेत त्यापैकी MITCON, NCL इनोव्हेशन सेंटर, BHAU Institute of Entrepreneurship तसेच BYST या संस्थांशी गाठीभेटी झाल्या. त्यांच्याकडे चालणाऱ्या उपक्रमांशी आपली चाचणी जोडण्याची शक्यता आजमावून पाहता आली.

नाशिकच्या Entreprenuer's Energy Excellence तसेच वर्धा येथील महात्मा गांधी रुरल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट यांच्याशी संपर्क करून चाचणीची माहिती देण्यात आली. पुण्यातील Seed Infotech यांच्या सहकाऱ्यांमधील चार यशस्वी उद्योजकांच्या चाचण्या होऊन त्या समूहाशी पुढील साहचर्यासाठी वाटाघाटी करण्यात आल्या. Learning Links संस्थेकडूनही अशीच विचारणा झाली.

❍ **परिषदा व प्रदर्शन यात सहभाग :**

गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स यांनी डिसेंबर २०१७ मध्ये योजलेल्या उद्योजकतेवरील परिषदेमध्ये सहभाग घेऊन त्यातील प्रदर्शनात चाचणी संबंधित फलक लावण्यात आले. मोशी येथील किसान प्रदर्शनामधील नाविन्यपूर्ण उद्योगांचा अभ्यास करण्यासाठी युवकांची एक तुकडी पाठवण्यात आली. पाबळ येथील विज्ञान आश्रमाच्या पुढाकाराने अनुभव शिक्षणावर काम करणाऱ्यांचे एक व्यासपीठ म्हणून 'स्टार फोरम' कार्यरत आहे. त्यांच्या वार्षिक सभेत आपल्या केंद्राची माहिती देण्यात आली.

प्रबोधिनीच्या निगडी येथील स्नातक संघापैकी जे तरुण उद्योजक आहेत त्यांच्याशी संपर्क करण्यात आला व त्यांना चाचणीची माहिती देण्यात आली.

❍ **तज्ज्ञ व्यक्तिंशी संपर्क :**

पुण्यातील दे आसरा फौंडेशन या मार्गदर्शक संस्थेतील तज्ज्ञ व्यक्तींशी जानेवारी १८ मध्ये तपशिलवार चर्चा योजण्यात आल्या. सूक्ष्म व लहान उद्योजकांसाठी त्यांनी केलेल्या संगणकीकृत कार्यपद्धतीशी आपल्या केंद्राचे काम जोडून घेण्याच्या दृष्टीने प्राथमिक चर्चा झाल्या. श्री. श्रीरंग गोखले यांच्याशी उद्योजकता चळवळीच्या कार्यपद्धतीविषयी चर्चा झालेल्या. डॉ. राजीव हजरनीस यांच्याद्वारे सहकार भारतीचे डॉ. मुकुंद तापकीर यांच्याशी संपर्क होऊन सहकारी बँकांच्या कर्ज प्रकरणांच्या मंजुरीशी आपली चाचणी जोडण्यासंबंधी प्राथमिक चर्चा झाली.

❍ **संशोधनाविषयी नियमित चर्चा :**

विविध आर्थिक-सामाजिक गटांसाठी व उद्योजकतेच्या आणखी पैलूंच्या खोलात जाण्यासाठी प्रबोधिनीच्या मानसशास्त्रीय संशोधिकेशी दरमहा नियमितपणे चर्चा झाली. चाचणी देणाऱ्यांची संख्या अधिकाधिक वाढवून या संशोधनाचा पाया मजबूत करण्याचा आपला प्रयत्न चालू आहे.

प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांपैकी ज्यांनी गेल्या दहा वर्षात आपले नवे उद्योग सुरू केले आहेत, अशा बारा उद्योजकांची एक बैठक फेब्रुवारी २०१८ मध्ये घेण्यात आली. गुगल ड्राईव्हवर ४२ उद्योजकांची व्यावसायिक माहिती संकलित करण्यात आली. के. आर. ठकार फौंडेशन च्या वतीने या केंद्राला देणगी देणारे श्री. अतुल ठकार व सौ. नीलाताई पुरोहित यांनी जानेवारी १८ मध्ये आणखी रु. १ लक्षची देणगी दिली, ही आनंदाची बाब आहे. श्री. गिरींद्र कसमळकर यांनी राजगुरूनगर येथे Ideas to Impacts या नावाने सुरू केलेल्या software मधील उद्योगाला प्रबोधिनीतील सुमारे पंधरा जणांनी मार्च २०१८ मध्ये भेट दिली व अशा उद्योगाचे स्वरूप समजावून घेतले.

ωωω

# २ विस्तार केंद्रे

## १. डोंबिवली विस्तार केंद्र

### महत्त्वाचे व संस्मरणीय उपक्रम

#### ❍ कोकण अभ्यासदौरा

डोंबिवली विस्तारकेंद्राच्या एकोणिस जणान्चा पहिला अभ्यासदौरा ७ ते १० सप्टेंबर दरम्यान कोकणातील दापोली येथे गेला होता. रोज सकाळी उपासना, 'समुद्रपक्षी जोनाथन' चे वाचन व रात्री संपूर्ण प्रार्थना घेतली. पहिल्या दिवशी राजा दांडेकरांची शाळा पाहून त्यांच्याशी गप्पा मारल्या. नंतर 'आगोम'या आयुर्वेदिक औषधी कारखान्याचे श्री. दीपक महाजन यांची भेट घेतली. जालगाव येथील निवासात श्री. प्रसादकाका काणे या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाची मुलाखत झाली. दुसऱ्या दिवशी श्री. प्रशांत परांजपे यांनी पर्यावरण रक्षणासाठी त्यांनी शोधलेले विविध उपाय, जनजागृतीतून झालेले काम याची माहिती दिली. कृषिविद्यापीठाला भेट, कुडावळे येथे पर्यावरणपूरक जीवनशैली आत्मसात केलेले आ. दिलीपजी व पूर्णिमाताई कुलकर्णी यांची भेट, श्री. विनायक महाजन यांच्या 'कोकमकोला' उत्पादनाविषयी माहिती घेऊन रात्री जेवण आटोपल्यावर वृंदाताईंनी महाभारत व मानवी शरीर-मन यांचा संबंध उलगडून सांगितला. तिसऱ्या दिवशी कार्यकर्त्यांचे चार गट चार ठिकाणी गेले होते. पहिला गट असोंड येथील श्री. विश्वास गोंधळेकर यांची काजू फॅक्टरी बघायला गेला होता. दुसऱ्या गटाने टेटवली येथील श्री. प्रवीण नेवसे यांच्या आंबा कॅनिंग प्रकल्पाची माहिती घेतली. तिसरा गट गव्हे गावातील श्री. विजय गोळे यांच्या शेतीच्या अवजारांचा कारखाना बघायला गेला. चौथा गट डॉ. कोपरकर यांच्या नर्सरीला भेट देऊन आला. सर्व गट एकत्र भेटून हर्णे बंदर बघायला गेलो. तेथे रा. स्वं. संघाचे कार्यकर्ते असलेले व अनेक प्रकारचे व्यवसाय सांभाळणारे श्री. मिलिंद जोशी यांच्याशी गप्पा मारल्या. ज्ञान प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी प्रा. सुरेन्द्रदादा ठाकूरदेसाई आम्हाला मुरुड समुद्रकिनाऱ्यावर घेऊन गेले. समुद्रकिनारा कसा बघावा या विषयी व अजून बरीच अभ्यासपूर्ण माहिती त्यांनी दिली. त्यानंतर नारळाच्या झाडावर चढण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या दर्शनाताई खोत यांची भेट झाली. चौथ्या दिवशी चारही गटांनी (त्यांनी भेट दिलेल्या) प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती सांगितली. सगळ्यांच्या बोलण्यातून एक गोष्ट समजली ती म्हणजे कोकणी माणूस/शेतकरी अल्पसंतुष्ट असल्यामुळे, कर्जाला भीत असल्यामुळे समाधानी आहे आणि म्हणूनच तिथे कोणीही आत्महत्या करत नाहीत. आपल्या ज्येष्ठ कार्यकर्त्या विनयाताई व त्यांचे स्नेही धारप काका-काकू यांनी सगळीच व्यवस्था उत्तम केलेली असल्यामुळे, सर्वांच्या सहकार्यामुळे हा दौरा अविस्मरणीय झाला.

#### ❍ पाण्याची गोष्ट

ज्ञान प्रबोधिनी डोंबिवली विस्तारकेंद्र आणि विवेकवाडी परिवार यांनी आयोजित केलेला पाण्याची गोष्ट हा कार्यक्रम दि. ८ ऑक्टो. रोजी टिळकनगर शाळेच्या पेंढरकर सभागृहात संपन्न झाला. विवेकवाडी परिवाराने ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई यांच्या बरोबर २०१६ आणि २०१७ ह्या दोन वर्षात चार गावात जलसंधारणाचे काम केले. मराठवाड्यात चालू असलेल्या जल संधारणाच्या या चळवळीत नियोजनापासून अंतिम टप्प्यापर्यंत जास्तीत जास्त शहरवासीयांनी सहभागी व्हावे, वेळ, कौशल्य, श्रम आणि अर्थ या सर्व स्वरूपात योगदान द्यावे आणि दुष्काळाची भीषण समस्या, शहरवासी आणि ग्रामवासी दोघांनी मिळून सोडविण्याचा एकत्रित प्रयत्न करावा; असा ह्या उपक्रमाचा उद्देश होता. मागील दोन वर्षात केलेल्या जलसंधारणाच्या कामाची दृक्‌श्राव्य चित्रफित उपस्थितांना दाखवण्यात आली. विवेकवाडी परिवाराने ज्ञान प्रबोधिनी बरोबर काम केलेल्या चार गावांपैकी तीन गावांना पाणी फाउंडेशनची उत्कृष्ट जलसंधारणाची बक्षिसे मिळाली. स्पर्धेत यशस्वी झालेल्या वाठवडा (जि. उस्मानाबाद) गावचे श्री. झुंबर पिंपळकर, कुंबेफळ गावचे श्री. प्रमोद भोसले आणि जायभायवाडी (जि. बीड) गावचे श्री. सुंदर जायभाय या तिन्ही प्रतिनिधींचा सत्कार श्री. सत्यजीत भटकळ ह्यांच्या हस्ते संपन्न झाला. विवेकवाडी परिवाराचे सदस्य श्री. अमित दातार ह्यांनी मुलाखतीच्या माध्यमातून गावकऱ्यांना त्यांचे अनुभव सांगण्यासाठी बोलते केले. वॉटरकपच्या निमित्ताने गावातील सर्वांनी भेद-भाव, भांडण-तंटा विसरून एकत्र येऊन काम करावे, ह्यासाठी गावपातळीवर काय प्रयत्न केले हे विषद केले. सर्वांना एकत्रित आणण्यासाठी प्रसंगी लढवलेली शक्कल व इतरही अनेक किस्से ऐकताना प्रेक्षकांमध्ये हशा पिकला. ज्ञान प्रबोधिनीचे श्री. प्रसाद चिक्षे आणि श्री. सत्यजीत भटकळ ह्यांनीही उपस्थितांना त्यांचे अनुभव सांगत खिळवून ठेवले. 'मराठवाडा म्हणजे दुष्काळ हे समीकरण बदलण्याची गरज आहे' असे म्हणतांना प्रसाददादांनी, दुष्काळामुळे निर्माण होणारे अनेक सामाजिक प्रश्न विषद केले. ह्या कार्यक्रमाला सुमारे २५० नागरिकांची उपस्थिती होती. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या ह्या कार्यक्रमाची सांगता ज्ञान प्रबोधिनीच्या प्रार्थनेने झाली.

#### ❍ विद्याव्रत जोपासना कार्यकर्ता प्रशिक्षण

दि. ३ डिसें. रोजी सकाळी ९.३०-४.३० यावेळेत विद्याव्रत जोपासनाच्या कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आ. गिरीशराव,



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 46 31/08/2018 3:19:45 PM

नचिकेत दादा नित्सुरे, रश्मीताई जोशी व मानसीताई बोडस यांनी घेतले. गीत व प्रस्तावना झाल्यानंतर आधीच ठरल्याप्रमाणे पुढील चार मुद्द्यांवर प्रशिक्षणात भर दिला गेला–

१. व्रतपालन, २. व्रतपालनाशिवायचा इतर दिनक्रम, ३. व्रतांच्या जोपासनेसाठी स्वतःचे प्रयत्न व इतरांचे साहाय्य आणि ४. Life goals, career goals, academic goals आणि personality development goals. हे सर्व मुद्दे खूप छान स्पष्ट झाले. त्यासाठी वापरलेली संदर्भ साहित्य सूची सुद्धा देण्यात आली. मनातल्या शंकांचे निरसन झाले.

### ❍ संवादिनी मेळावा

दि. १३ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी संवादिनीचा एकत्रित कार्यक्रम झाला. सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत कानविंदे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला ५० सदस्या उपस्थित होत्या. उपस्थितांचे स्वागत, गीत झाल्यावर भाग्यश्री गोडबोले यांनी प्रास्ताविकात स्त्री शक्ती जागरण उत्सवा दरम्यान ४४ सदस्यांनी विविध क्षेत्रातील २२ महिलांच्या घेतलेल्या मुलाखतींच्या उपक्रमाचा आढावा घेतला. ज्यांच्या मुलाखती घेतल्या त्या मान्यवर महिलांना आमंत्रण दिले होते. त्यातील काही जणी आवर्जून उपस्थित होत्या. श्रुतीताईंनी सर्व लिखित मुलाखतींचे परीक्षण करून प्रत्येक गटातील एक अशा पाच उत्कृष्ट मुलाखती निवडल्या होत्या. त्यांचे अनुभवकथन सुरुवातीला झाले. मान्यवर महिलांनीही कार्यक्रमाला बोलविल्याबद्दल व नवीन मैत्रिणी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी वा. अनघाताई लवळेकर यांना खास आमंत्रण दिले होते. त्यांचे स्वागत करून श्रुतीताई फाटक यांनी त्यांचा औपचारिक परिचय करून दिला. त्यानंतर श्वेता रानडे यांनी अनघाताईंची मुलाखत घेतली. 'Lamp is mine, light is ours' या त्यांना भावलेल्या वाक्याचा उल्लेख करून त्यांनी महिलांना सांगितले की प्रत्येकीत काही ना काही गुण, कौशल्ये असतात पण सगळ्यांनी मिळून एखादे काम करायचे ठरविले तर कितीही मोठे काम एकत्रितपणे नक्की करू शकतो, गृहिणींनी स्वतःला कमी लेखू नये.

### ❍ विस्तारकार्य

**ठाणे केंद्र :** वर्षारंभ-वर्षांत, दोन मातृभूमिपूजनाचे कार्यक्रम झाले. आ. संचालकांच्या उपस्थितीत बारा विद्यार्थ्यांनी विद्याव्रताची दीक्षा घेतली. शिवसमर्थ शाळेत साप्ताहिक विकासिकेत २५ विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताची पूर्वतयारी म्हणून व्याख्याने, पूरक उपक्रम घेतले. जोपासना गटात भातलावणी, गडसहल, संस्था भेट असे उपक्रम घेतले.

**बदलापूर केंद्र :** शिशुविहार शाळेत ६वी साठी पाक्षिक विकासिका व ७वी साठी विद्याव्रत पूर्वतयारी म्हणून पाक्षिक उपक्रम झाले. या मुलांच्या वैद्यकीय तपासण्या, आहार मार्गदर्शन झाले. पिंपळोली गावातील शाळेतील ३५ विद्यार्थिनींसाठी किशोरी विकास प्रकल्प (पाक्षिक) घेतला. त्यात कथाकथन, खेळ, चेतना व्यायाम, विज्ञान प्रयोग, उमलत्या वयात घ्यायची काळजी इ. सत्रे झाली.

**नियमित उपक्रमांचा आढावा**

| उपक्रमाचे नाव | लाभार्थी | कार्यकर्ते |
|---|---|---|
| प्रबोधक मंडळ (साप्ताहिक) | ३१ | ५ |
| वाचक मेळावा | १२ | ७ |
| विद्याव्रत संस्कार | १७ | ५ |
| विद्याव्रत जोपासना | १५ | ४ |
| युवा गट – निर्माल्य उपक्रम | | २० |
| रात्रशिबिर | ९८ | १५ |
| ग्रामीण विभाग– बाळेवाकळण | | |
| इ. ६वी (पाक्षिक) | ३१ | १० |
| इ. ९वी (पाक्षिक) | ३० | ६ |
| घारीवली (साप्ताहिक) | ११ | २ |
| संवादिनी– ५ गट (मासिक बैठका) | ७० | १० |
| पौरोहित्य विभाग | संस्कार ७९४ | पुरोहिता १३ |
| मातृभूमिपूजन | १३ | १७ |

ωωω

## २. बोरीवली विस्तार केंद्र

**❍ विद्याव्रत मैत्री शिबिर :** चोगले विद्यामंदिर, श्रीकृष्णानगर, बोरीवली, पूर्व या शाळेत इ. ८वी च्या ५५ मुलामुलींसाठी दि. ३ आणि ४ नोव्हे.१७ रोजी सकाळी ८ ते १२. ३० 'मैत्री शिबिर' घेण्यात आले.

ओंकारने सुरुवात झाली. 'प्रबोधिनीत यायचे' हे पद्य सांगितले. त्यानंतर श्री. अतुल साठे यांनी 'मला प्रश्न पडतात का' या विषयाशी गप्पा मारत, संवाद साधत व्याख्यान दिले. हळूहळू मुलांना विद्याव्रतातील 'मी' पर्यंत आणले. मुलांच्या डोक्यात विचार चक्र सुरू झाले आहे. त्या नंतर श्री. नितीन गोखले यांच्या मार्गदर्शना प्रमाणे मैदानी खेळ झाले.

गटागटात बसून न्याहारी झाली. सहा गट होते. आपापल्या गटात प्रश्ना विषयी वैयक्तिक पातळीवर गप्पा झाल्या. गटात 'मूक चित्र' हा खेळ झाला आणि न बोलताही केवळ एकमेकांना समजून घेऊन खूप काही करता येतं हे त्यांच्या लक्षात आले.

**❍ मातृभूमिपूजन :** केंद्रातर्फे आजवर १५६ ठिकाणी मातृभूमि पूजनाचे कार्यक्रम झाले. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक संघ, रामकृष्ण मिशन, आदिवासी कन्या छात्रालय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते, वारकरी संप्रदायातील वारकरी, मेळघाटातील बांबू प्रकल्पातील कार्यकर्ते आणि स्थानिक आदिवासी, आणि


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 47 31/08/2018 3:19:45 PM

आपले कार्यकर्ते अशा निरनिराळ्या संस्था, निरनिराळ्या वयोगटातील सदस्यांबरोबर ही मातृभूमिपूजनाचे कार्यक्रम झाले.

**उल्लेखनीय :**

१. बीमानगर एज्यु. चे माध्यमिक विद्यालय, आदिवासी कन्या छात्रालय, ज्येष्ठ नागरिक संघ, आणि संवादिनी येथे गेली ७/८ वर्षे सातत्याने मातृभूमिपूजन होत आहे.

२. केंद्राला वीस वर्षे पूर्ण झाल्या निमित्त वीस घरांमध्ये सत्यनारायण ऐवजी मातृभूमिपूजन झाले.

३. वर्ष प्रतिपदा (गुढी पाडवा) या मुहूर्तावर अखिल बोरीवली नागरिकांची 'शोभायात्रा' असते. गेली दोन वर्षे या शोभायात्रेचा आरंभ आपल्या मातृभूमिपूजनाने होतो.

**अत्यंत महत्त्वाचे :** बोरीवली केंद्राने मातृभूमिपूजन पोथीची हिंदी आवृत्ती तयार केली असून दि. ९ एप्रिल १७ रोजी मा. संचालक गिरीशराव बापट यांच्या हस्ते तिचे प्रकाशन व वाचनही झाले. लगेचच 'समर्पण सहनिवास' येथे अन्य भाषिकांच्या उपस्थितीत दुसरे हिंदी मातृभूमिपूजन झाले.

### ❍ संवादिनी

दि. १५ डिसेंबरला sound and picture archives for research on women - sparrow - या सामाजिक संस्थेला भेट देण्यासाठी संवादिनीतील २२ मैत्रिणी गेलो होतो. भारतभरातील अगदी कानाकोपऱ्यातीलसुद्धा काही विशेष कामगिरी केलेल्या स्त्रियांची दखल घेऊन त्यांच्या कामाचा दस्तऐवज (documentation) करून ठेवण्याचे काम ते करतात. संस्था १९८२ पासून कार्यरत आहे. संस्थेच्या संचालिका के. एस्. लक्ष्मी यांना पण भेटलो त्यांना ज्ञान प्रबोधिनीची माहिती दिली. सगळ्यांना संस्थाभेट आवडली. दि. ४ एप्रिलला संवादिनीने (बोरीवली) तेरा वर्ष पूर्ण करून चौदाव्या वर्षात पदार्पण केले. सकाळी ११ ते ५ असा वर्धापन दिन होता. सुरुवातीला वर्षभरामध्ये झालेल्या कार्यक्रमाचे अहवाल वाचन झाले. अनुजाताई लिमये यांनी शालेय पाठ्यपुस्तकातील जुन्या काळातील कवितांची आठवण करून देत अनेक कविता म्हटल्या. कृतीसत्रात अगदी सोपे व सुबक कागदी गुलाबाचे फुल व चार पाने असे बनवायला शिकवले. एक शब्दकोडे सोडवायचा खेळ झाला. चार गट पाडून प्रत्येक गटाला एकएक लोकनृत्यप्रकार देण्यात आला. दुष्काळी भागातील पाण्यासाठी ज्ञान प्रबोधिनीने चालू केलेल्या अभियानासाठी मदतीचे आवाहन करायला केवल मुळे आली होती. तिथे तात्काळ सर्वांनी ऐच्छिक देणगी देऊन रु. ७२०० जमा करून केवलच्या सुपूर्द केले. कार्यक्रमात शेवटी संवादिनी सदस्या अर्चनाताई कोरे यांनी पुढच्या वर्षीसाठी संवादिनी प्रमुखपदाची जबाबदारी आनंदाने स्विकारली.

### ❍ जयराजनगर विकसिका

दि. १७ डिसें. रोजी जयराज उद्यान ते गोराई समुद्र अशी सायकल सहल झाली. यात विकसिकेत येणारी दहा मुले, दोन भावंडे, चार कार्यकर्ते, पाच पालक, दहा युवक, युवती अशी ३१ जण सहभागी झाले होते. दि. ४ फेब्रु., घारापुरी लेणी येथे सहल गेली होती. विकासिकेत येणारी सात मुले, चार कार्यकर्ते, पाच पालक, आणि पाच युवा असे २१ जण सहभागी झाले होते. सर्व चढण चढून लेण्यांपर्यंत पोचलो. तेथील प्रसिद्ध त्रिमूर्ती बद्दल अधिक माहिती दिली. घारापुरी लेण्यांची निर्मिती चालुक्य कालीन असून त्याच वेळी बोरीवली येथील मंडपेश्वर मंदिर ही उभारले गेले हे वाचून अभिमान वाटला.

### ❍ रूप पालटू शाळेचे

दि. १६ डिसें. रोजी एकूण सोळा मुले, दोन शिक्षक व दोन कार्यकर्त्या असे एकूण वीसजण नॅशनल पार्क बघायला गेलो होतो. मुलांनी लायनसफारीचा मनमुराद आनंद घेतला. दोन वाघ व दोन सिंह पाहायला मिळाले. जवळच्या उद्यानात मुले खेळत होती. तेथे चिंचा, बोरे, पेरु, काकडी, अशा अनेक गोष्टींचा आस्वाद घेतला.

### ❍ आदिवासी कन्या आश्रम विकसिका

गीत, ओंकार, ध्यान, सुविचार, कथा, खेळ, प्रार्थना, प्रश्नोत्तरे, व्यायाम, खेळ, चित्रकला, कथा, पिशवी शिवणकाम, जयराज नगर विकसिकांना भेट इ. उपक्रम वर्षभरात घेण्यात आले.

दोन्ही विकसिका एकत्र एकाच ठिकाणी झाल्या.

मकरसंक्रांती निमित्त (१४ जाने.) आश्रम शाळेतील २४ मुली सौ. स्मिता फडणीस आणि सौ. सुषमा जोशी यांच्या समवेत जयराजनगर मध्ये आल्या होत्या. विकासकांची आठ मुले आणि आश्रम शाळेतील मुली यांचे एकत्रित मैदानी खेळ घेतले. खूप दिवसांनी असे मोकळेपणी खेळायला मिळाल्याने त्या मुलींना खूप आनंद झाला. यानंतर उपासना, पद्य झाले. मग मुलांच्या जोड्या केल्या आणि एकमेकांची ओळख करून दिली. त्या आधी एकमेकांना अत्तर लावले व तिळगूळ हलवा दिला. विकासिकांच्या मुलांनी प्रत्येकाने जोडीदाराला देण्यासाठी शुभेच्छा पत्र तयार करून आणले होते ते दिले. अलका रानडे यांनी पाहुण्या मुलींना पेन्स दिली. ५ वा. प्रार्थना झाली व एक दिवसाचे शिबिर संपले.

### ❍ विद्याव्रत संस्कार शिबिर

दि. १३ एप्रिल रोजी 'विद्याव्रत सोहळा' पार पडला. सलग सहा दिवस शाळेची जागा उपलब्ध नसल्याने आधी दर शनीवारी सहा व्रतांच्या अनुषंगाने व्याख्याने, कृतिसत्र झाली होती. मुलांनी व्याख्यात्यांशी चांगला संवाद साधला होता. संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान चे विश्वस्त मा. श्री. मोहन सालकर आचार्य होते. कॉसमॉस शाळेच्या मुख्याध्यापिका ठाकरे यांनी आचार्यांचा परिचय करून दिला. आचार्यांच्या हस्ते व्रतचिन्ह दिले. सतरा मुलांनी व्रत घेतले. नंतर पालकांनी आणि मुलांनी मनोगत व्यक्त केले.

### ❍ पाचवे अभ्यास शिबिर – विषय : स्वा. सावरकर

दि. ४ मार्च २०१८ रोजी जयराज नगर उद्यान येथे दु. १ ते ५ या वेळात स्वा. वीर सावरकर शिबिर झाले. विषय विस्तृत असल्याने १.स्वा. सावरकर २. स्वातंत्र्य प्राप्ती नंतरचे सावरकर ३. कवी, साहित्यिक सावरकर असे तीन विभाग



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 48 31/08/2018 3:19:45 PM

करून आपल्या आवडत्या विषयाचा आपणच अभ्यास करून गटात मांडणी करायची होती. १८ जण उपस्थित होते. दु. १ ते २ गटात अभ्यास केला. २ ते २.३० गटप्रमुखांनी आपल्या चर्चेचा गोषवारा सांगितला. ३ ते ४.३० प्रमुख पाहुणे श्री. बापट यांनी सदस्यांच्या अभ्यासाबद्दल अधिक मार्गदर्शन केले. सावरकर कवी मनाचे होते म्हणूनच इतक्या कठीण शिक्षा भोगून, मरणप्राय परिस्थितीतही तग धरून राहिले. जणू काव्य ही त्यांची कवचकुंडले होती असा विचार मांडला. फक्त अभ्यास करून सोडून देण्याचा हा विषय नाही. त्यांच्या एकातरी तत्त्वाचा अंगीकार करून आपल्या रोजच्या आयुष्यात तसे आचरण करावे, असे सांगून त्यांनी समारोप केला.

○ **युवकगट**

दि. १० व ११ जून वीरव्रत पूर्वतयारी/विद्याव्रत पाठपुरावा शिबिर विसापूर गड व ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथे आदित्यदादा शिंदे, सौगंधदादा देशमुख व हिमांशू दादा यांच्या उपस्थितीत पार पडले. पहिल्या दिवशी बोरीवली रेल्वे स्थानकापासून सुरू झालेले शिबिर विसापूर गड चढणे, पाहणे व उतरून ज्ञान प्रबोधिनी निगडी येथ पर्यंत पोहोचणे असे पार पडले. हिमांशू दादा सोबत होते.

दुसऱ्या दिवशी आदित्यदादा शिंदे यांनी प्रबोधिनी परिचय, छत्तीसगड दौरा - अनुभव कथन, विद्याव्रत पुन: उजळणी, संकल्प पुन: उजळणी व संकल्प लिहिणे आणि सौगंधदादा देशमुख यांनी परिस्थिती ज्ञान - मला काय त्याचे इ. सत्रे घेतली. उपस्थिती १६ होती.

○ **सार्थ भजन**

दि. ९ जुलै रोजी सेंट रॉक्स शाळेत 'सार्थ भजन' हा कार्यक्रम ३५ जणींच्या उपस्थितीत झाला. सौ. स्मिता फडणीस यांनी केवलच्या मदतीने सर्वांची तयारी करून घेतली होती. पंधरा जणींनी निरनिराळी भजने, अभंग, गजर, राष्ट्रभक्तीचे गीत इ. निरूपणासह म्हटले.

ωωω

## ३. विस्तारकेंद्र अंबाजोगाई

'सत्यमेव जयते वॉटरकप' स्पर्धेत यावर्षी ज्ञान प्रबोधिनीने अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या चार तालुक्यातील शेपवाडी, काशीदवाडी, केवड, कोळपिंपरी, जायभायवाडी व वाठवडा या गावात जलसंधारणाचे काम केले. अंतिम निकाल आल्यावर राज्य पातळीवर जायभायवाडी ३० लाखाचे बक्षीस घेऊन दुसऱ्या क्रमांकावर आले. तर केज, धारूर व कळंब तालुक्यातील रु. १८ लाखाचे पहिले बक्षीस अनुक्रमे काशीदवाडी, कोळपिंपरी व वाठवडा या गावांना मिळाले. अंबाजोगाई तालुक्यातील ७,५०,००० रुपयांचे दुसरे बक्षीस शेपवाडीला मिळाले. अशी एकूण रु. ९१,५०,०००/- ची पाच बक्षिसे आपल्या पाच गावांना मिळाली. सर्वांच्या संघटित प्रयत्नांचे अभिनंदन !!!

या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ बालेवाडीत मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला.

दि. १५ ऑक्टोंबर रोजी दीपोत्सव हा कार्यक्रम संपन्न झाला. या वेळी छात्र प्रबोधन दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. छात्र प्रबोधन दिवाळी अंकाचे प्रकाशन सारंग पुजारी (पालक व उपनगराध्यक्ष, अंबाजोगाई), ग्रामीण दिवाळी अंक प्रकाशन वॉटरकप स्पर्धेत भरीव कामगिरी करणाऱ्या कैलास शेप या शेपवाडी येथील कार्यकर्त्यांच्या हस्ते, युवोन्मेष अंकाचे प्रकाशन, प्रा. राजेंद्र फुलतांबकर यांच्या हस्ते व इंग्रजी अंकाचे प्रकाशन, प्रीतम पन्हाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

दि. १ डिसें. रोजी अंबाजोगाईतील विविध शाळेतील शिशु अध्यापिकांचा प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता. या वर्गात ३७ शिशु अध्यापिका नोंदणी करून आल्या होत्या. या प्रशिक्षण वर्गात चार सत्रे झाली. यामध्ये प्रीतम पन्हाळे यांनी 'पूर्व प्राथमिक शिक्षणामागील भूमिका' प्रश्नोत्तरे, लोकसत्ता मधील आलेल्या लेखाचे गटश: वाचन, त्यावर चर्चा व त्यातील महत्त्वाचे वाटणाऱ्या मुद्यांचे सर्वांसमोर वाचन, डॉ अतुल देशपांडे यांनी ०-८ वयोगटातील विद्यार्थ्यांचे शारीरिक विकसन व शिक्षण' अशी सत्रे झाली. समारोप सत्रात पूर्व प्राथमिक शिक्षणातील गटबांधणी, आगामी उपक्रम व सहभागी पैकी चार ताईंनी मनोगत व्यक्त केले.

विवेकानंद जयंती निमित्त दि. १२ जानेवारी रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

१) सकाळी ६.३० वा सर्व कार्यकर्त्यांची एकत्रित उपासना झाली. नंतर विवेकानंद जीवन आणि संदेश या चार पुस्तकातील लेखांचे वाचन केले. या उपासनेला ४२ जण उपस्थित होते.

२) सायंकाळी ६.३० वा युवक गटाने मातृभूमिपूजनाचे आयोजन केले होते. २२ जण उपस्थित होते. मातृभूमिपूजना मागील भूमिका अभिजीत जोंधळे यांनी मांडली. या विषयावर चर्चा होऊन प्रार्थनेने समारोप झाला.

३) शिशूविहारच्या मयूर गटातील सोळा विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

४) शेपवाडी येथे तेथील अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांनी विवेकानंदांचे विचार एकत्रित सादर केले. मुलांची भाषणे झाली. आनंद कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. एकूण ४६ जणांची उपस्थिती होती.

ωωω



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 49 31/08/2018 3:19:45 PM

# ५ ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र

२०१७-१८ हे वर्ष निगडी केंद्रात संगीत वर्ष म्हणून साजरे केले गेले. अनेक नवनवीन प्रयोग व उपक्रमांनी हे वर्ष समृद्ध झाले. त्यापैकी काही निवडक वृत्त.

❍ **गणेशोत्सव**

यावर्षी प्रथमच आठ दिवसांच्या ऐवजी संपूर्ण बारा दिवस गणेशोत्सव झाला. पहिले सात दिवस विद्यार्थ्यांनी घरच्या गणपतीला महत्त्व द्यावे व त्यानंतर केंद्राचे कार्यक्रम असावेत असा विचार होता. परिसरातील नागरिकांसाठी गणेशपूजा प्रशिक्षणाचे दोन वर्ग झाले. एकूण २५ जणांनी प्रशिक्षण घेतले. प्रत्येक विभागातून एक सदस्य असलेली निगडी केंद्राची गणेशोत्सव समिती तयार झाली. या समितीने उत्सवाचे नियोजन व कामे केली. पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा झाली. गणेश मूर्तीभोवती वाद्यांची सजावट करण्यात आली व सभागृहात शास्त्रीय संगीताविषयीचे प्रदर्शन मांडण्यात आले. मुख्य कार्यक्रमांमध्ये दोन संगीत सभांचे आयोजन केले होते. प्रथमेश लघाटे याचा नाट्यगीत-भक्तीगीतांचा श्रवणीय कार्यक्रम झाला. तसेच डॉ. स्वाती दैठणकर यांच्या गटाने मराठी अभंगांवर आधारित भरतनाट्यम् नृत्याचा 'राजस सुकुमार' हा कार्यक्रम सादर केला. नृत्यातून भावनिर्मितीचे अप्रतिम प्रात्यक्षिक सर्वांनी त्यातून अनुभवले. गणेशोत्सवात एक दिवस निगडी केंद्रातील सर्व विभागांचा एकत्रित पद्यगायन कार्यक्रम झाला. प्रत्येक विभागाने एक पद्य सादर केले.

गणेशोत्सवातील व्याख्यानमाला यावर्षी फक्त प्रौढ गटासाठी आयोजित केली होती. यामध्ये प्रा. परिमल माया सुधाकर यांचे 'चीनचे आर्थिक व राजकीय आव्हान' या विषयावर व्याख्यान झाले. लोकसत्ताचे संपादक श्री. गिरीश कुबेर यांनी 'देशाची आर्थिक वाटचाल' या विषयावर तसेच प्रा. हरी नरके यांनी 'देशासमोरची सामाजिक आव्हाने' हा विषय मांडला. सर्व व्याख्यानांना सुमारे ३०० ते ४०० जण उपस्थित होते. पहिल्या दोन व्याख्यानानंतर छोट्या गटात सुमारे तासभर प्रश्नोत्तरे झाली.

अनंत चतुर्दशीला सकाळी रावेत परिसरात केंद्राची विसर्जन मिरवणूक उत्साहात पार पडली.

❍ **आंतरपथकीय क्रीडा स्पर्धा**

दि २२ ते २५ जानेवारी या काळात शिशुवर्ग ते १०वी अशा सर्व वर्गांच्या सर्व विभागांतील सर्व विद्यार्थ्यांच्या आंतरपथकीय क्रीडा स्पर्धा मैदानावर झाल्या. स्पर्धांचे उद्घाटन आमदार डॉ. गौतम चाबुकस्वार यांच्या हस्ते झाले. विविध सांघिक व वैयक्तिक खेळांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचा सहभाग होता. या जोशपूर्ण स्पर्धांमध्ये व्यास पथक व माताजी पथक विजयी झाले. प्रजासत्ताक दिनी या स्पर्धांची बक्षिसे दिली गेली.

❍ **संगीत संमेलन (२१ व २२ फेब्रुवारी २०१८)**

दि २१ व २२ फेब्रुवारी या दिवशी निगडी केंद्रात संगीत संमेलन घेण्यात आले. या वेळी संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवर कलाकार, माजी विद्यार्थी, पालक, परिसरातील रसिक आणि इ ८वी-९वीचे विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. अनेक व्याख्याने, प्रात्यक्षिके व संगीत मैफिली यांमधून सर्वांनी संगीताचा मनापासून आस्वाद घेतला आणि या कलेचे विविध आयाम समजून घेतले. सुप्रसिद्ध तबला वादक रामदास पळसुले संमेलनाचे अध्यक्ष होते तर प्रसिद्ध शास्त्रीय गायक समीर दुबळे उपाध्यक्ष होते. ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ. विकास कशाळकर यांनी संमेलनाच्या आयोजनात मार्गदर्शन केले. संमेलनात कीर्तन, शास्त्रीय गायन, नृत्य, संवादिनी वादन यांची प्रात्यक्षिके झाली. संगीत रसग्रहण, संगीताचा इतिहास या विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने झाली. संगीतातील विविध प्रकारांचे प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या बारा कार्यशाळा घेण्यात आल्या. यात तज्ज्ञ व्यक्तींनी विद्यार्थ्यांना विषयाधारित मार्गदर्शन केले. जलतरंग, सुंद्री, सनई, व्हायोलीन, सतार, पखवाज यांची ओळख करून देणारे विशेष सत्र झाले. भावसंगीताचे महत्त्व सांगणारे सत्र डॉ. सलील कुलकर्णी यांनी घेतले.

दोन दिवस चाललेल्या भरगच्च अशा संगीत संमेलनाची सांगता संगीत सभेने झाली. या वेळी श्री. नचिकेत देव यांचे गायन व संमेलनाध्यक्ष पं. रामदास पळसुले यांचे सोलो तबला वादन झाले. संगीत संमेलनामुळे विद्यार्थ्यांची संगीतातील समज व रुची वाढायला खूप उपयोग झाला.

## पूर्व प्राथमिक विभाग

**क्षेत्र प्रणालीवर आधारित अभ्यासक्रमाचा समावेश :** सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात विभागात प्रथमच सर्व वर्गांचा अभ्यासक्रम युनिसेफने मांडलेल्या क्षेत्रप्रणालीवर आधारित म्हणजे भाषानुभव, परिसर-विज्ञान, वाचन-गणन-लेखन, शारीरिक-कारक विकास, कलानुभव या पाच क्षेत्रांनुसार आखला गेला. विद्यार्थ्यांना कृतियुक्त अनुभव देण्यासाठी मुबलक प्रमाणात साधन साहित्याचा वापर करण्यात आला.

## पूर्व माध्यमिक विभाग

**विशेष उपक्रम**

१. **पाचगणी शिबिर -** दिवाळीच्या सुट्टीत प्रथमच तीन दिवसांचे निवासी शिबिर वाई-पाचगणी परिसरात झाले. इ. ५वी ते ७वीच्या वर्गातील इच्छुक विद्यार्थी शिबिरात सहभागी झाले. ७वीच्या तीन दादांमध्ये शिबिराचे खाते-वाटप केले होते. त्यामुळे त्यांना नियोजन करण्याचा व गट हाताळण्याचा अनुभव घेता आला. हळद निर्मितीची प्रक्रिया पहाणे,



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 50 31/08/2018 3:19:45 PM

महागणपतीचे दर्शन, कृष्णेच्या घाटावर पोहण्याचा अनुभव, तानाजी मालुसरेंच्या गोडवली गावाला भेट, स्ट्रॉबेरीच्या शेतात मनसोक्त स्ट्रॉबेरी खाण्याची मजा, पुस्तकांचे गाव-भिलारला भेट, प्रतापगडचे दर्शन, दृष्टीहीन उद्योजक भावेश भाटीया यांचा व्यक्तिपरिचय अशा विविध अनुभवांनी शिबिर आनंददायी व प्रेरणादायी झाले.

२. **नाट्य-त्रिवेणी कार्यक्रम** – इ. ५वी, ६वी मध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अभिव्यक्तीच्या तासिकेला नाट्य विषयाचा अनुभव घेतला. इ.७वीत मात्र आवड व कौशल्य असणाऱ्या विद्यार्थ्यांना निवडून त्यांचे साप्ताहिक नाट्य प्रशिक्षण घेण्यात आले. वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी दगडा-दगडा शिकव धडा, रावीपार व दांडगी मुलं या तीन एकांकिका सादर केल्या. उत्तम अभिनयाच्या जोडीला उत्तम प्रकाश योजना व नेपथ्य यामुळे एकांकिका खूपच प्रभावी झाल्या. विद्यालयाचा माजी विद्यार्थी गौरव पत्की हा प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित होता.

३. **गीतांजली कार्यक्रम** – संगीत वर्षानिमित्त सर्व विद्यार्थ्यांनी 'गीतांजली' हा राज्यातील विविध लोकगीतांवर आधारित कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये नांदी, पाळणा, ओव्या, फटका, गोंधळ, भारुड, भावगीत, संतवाणी इ. प्रकार सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची दाद घेतली. अध्यापकांनी धनगरगीत तर पालकांनी बहारदार गवळण सादर केली. याच कार्यक्रमात इ. ७वीतील निवडक विद्यार्थ्यांनी अठरा वाद्यांचे वादन केले. कु. सिद्धी कापशीकर हिने ह्या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमासाठी तानसेन संगीत विद्यालयाचे संचालक श्री. शरद शिधये हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## माध्यमिक मराठी

### विशेष विद्यार्थी यश

शासकीय चित्रकला परीक्षा : एलिमेंटरी मध्ये A श्रेणीत २३ विद्यार्थी B श्रेणीत ३४ विद्यार्थी

इंटरमिजीएटमध्ये A श्रेणीत १९ विद्यार्थी B श्रेणीत ३० विद्यार्थी

कु. राधा येळगावकर राज्यात दुसरी ९ क

कु. गायत्री मार्णे राज्यात तिसरी ९ क

## Secondary English Section

During the month of November all classes from V to X were taught group songs with different themes. Every class learnt five new group songs. Out of these 2 songs were selected. On 14th December a program of group songs - संघस्वर - was presented by all students of the section. Elevan students of every class sang the songs together in one voice. It helped to imbibe a group feeling in the students. Shri Rambhau Dimble, graced the occasion and spoke to the parents about the great impact the recitation of group songs can have on young minds. He said that singing motivational songs together builds the spirit of the nation.

## क्रीडाकुल

**क्रीडाकुलचा मल्लखांबचा राष्ट्रीय खेळाडू चि. संतोष घाडगे याला महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च शिवछत्रपती क्रीडापुरस्कार मिळाल्याबद्दल दि. २७ फेब्रुवारीला भव्य मिरवणूक काढण्यात आली.**

भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयांतर्गत दिल्ली येथे आयोजित केलेल्या 'खेलो इंडिया' या राष्ट्रीय स्पर्धेत क्रीडाकुलचा इ.१०वी चा खेळाडू चि. प्रथमेश फुगे धनुर्विद्या या खेळात तर क्रीडाकुलची इ. ८वीची खेळाडू कु. अंकिता बोडके कबड्डी या खेळात सहभागी झाली होतीफ

मृण्मयी कुरळे या ॲथलेटिक्सच्या महाविद्यालयीन खेळाडूची शालेय ॲथलेटिक्सच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी संभाव्य भारतीय संघाच्या सराव शिबिरात निवड झाली आहे.

पिंपरी-चिंचवड शारीरिक संघटनेचा सन २०१७-१८ चा उत्कृष्ठ क्रीडा प्रशिक्षिका पुरस्कार क्रीडाकुलच्या ॲथलेटीक्सच्या प्रशिक्षिका सौ. संपदाताई कुलकर्णी यांना देण्यात आला.

## गुरुकुल

स्वच्छ भारत- समर्थ भारत,<br>
निगडी ते कन्याकुमारी सायकल यात्रा<br>
पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे !!!

ज्ञान प्रबोधिनी, गुरुकुलाच्या विद्यार्थी, माजी विद्यार्थी, अध्यापक, माजी पालक अशा ५७ जणांनी २५ डिसेंबर,२०१७ ला पहाटे ६.०० ला प्रबोधिनीतील स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून निगडी ते कन्याकुमारी या सायकल यात्रेला 'स्वच्छ भारत- समर्थ भारत' असा संदेश सोबत घेऊन सुरुवात केली.

एकूण तीन राज्यांमधून (महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू) १७०० किमी चा प्रवास करत पंधरा वेगवेगळ्या ठिकाणी मुक्काम करत हा गट भारताच्या दक्षिण टोकाला, कन्याकुमारीला पोहोचणार होता. रोज सरासरी १०० किमी चा प्रवास करत ठरल्या प्रमाणे सोळाव्या दिवशी ९ जानेवारी २०१७ ला सकाळी १०.०० वाजता कन्याकुमारीमधील स्वामी विवेकानंद केंद्रात पोहोचला.

या सोळा दिवसांच्या सायकल वरील प्रवासात विद्यार्थ्यांनी तिन्ही राज्यांमधील भौगोलिक परिस्थितीत होणारे बदल, आपल्या अभिमानास्पद इतिहासाचे साक्षीदार असणारे किल्ले, समृद्ध संस्कृतीचे व स्थापत्य कलेचे नमुने अनुभवले. या संपूर्ण प्रवासात राणी चन्नामाचा कित्तूर येथील किल्ला, नायक साम्राज्याचा भव्य चित्रदुर्गचा किल्ला, दगडातील २००० वर्ष जुने हरिहर चे मंदिर, जागतिक वारसा म्हणून जाहीर केलेले मदुराई मधील मीनाक्षी मंदिर विद्यार्थ्यांनी बघितले.

कर्नाटक मधील अन्य सर्व ठिकाणी कर्नाटकातील मोठी संस्था 'राष्ट्रोत्थान सेवा समिती' च्या पुढाकाराने व साहाय्याने झाला. या संस्थेच्या चार शाळांना या गटाने भेटी दिल्या. तेथील विद्यार्थ्यांसोबत मैत्रीपूर्ण मैदानी खेळांचे सामने, चर्चा, राष्ट्रोत्थान व प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांचा एकमेकांसोबत संवाद झाला. संस्थेचे जेष्ठ कार्यकर्ते श्री. गजानन लोंढे यांनी विद्यार्थ्यांना संस्थेचा इतिहास व सध्या चालू असलेले काम समजावून सांगितले.

कर्नाटकातील हावेरी येथील गावाच्या यात्रेमध्ये विद्यार्थी सहभागी झाले. गटकार्याच्या माध्यमातून सर्वांनी यात्रेचा इतिहास, मठ परंपरा समजून घेतली, सार्वजनिक स्वच्छता केली, पदार्थांमधील वैविध्य अनुभवले. या २० दिवसांमध्ये रोज रात्री होणाऱ्या बैठकांमधून, गटचर्चांमधून सायकल सहली सोबत होणारा मातृभूममिपरिचय हा देखील प्रवासाचा मुख्य भाग होता.

प्रवासात व स्वामी विवेकानंद केंद्रात पाणी फौंडेशन चे प्रणेते डॉ. अविनाश पोळ, स्वच्छ भारत लोगो चे चित्रकार श्री. आनंद खासबागदार, केंद्राच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा मा.निवेदिता दीदी अशा अनेक दिग्गज व्यक्तींसोबत संवाद साधण्याचे भाग्य विद्यार्थ्यांना मिळाले.

स्वामी विवेकानंद जयंतीला या सर्व विद्यार्थ्यांनी कन्याकुमारीत १००० सूर्यनमस्कार घालून वर्षारंभाला केलेला संकल्प आत्मविश्वासाने व मेहनतीने पूर्ण केला.

**राखी विक्री :** *दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील इ. ९वीच्या उत्स्फूर्त सहभागामुळे राखी विक्री चा उपक्रम जोरदार झाला. इ. ५वी ते १०वी या सर्वच विद्यार्थ्यांच्या सहभागातून यावर्षी विक्रमी म्हणजे रु. ३ लक्ष ६० सहस्र एवढी राखी विक्री झाली. यात सर्व वर्गांचा मोलाचा वाटा होता. इ. ९वी ने १६ सहस्र रुपये तर इ. ५वी च्या वर्गाने ७२ हजार रुपये इतकी राखी विक्री केली. इ. ९वी मधील चि. वेदांत सावदेकर याने १७ हजार रुपयांची राखी विक्री करून गुरुकुलातील आजवरचा उच्चांक निर्माण केला.*

## संगणक विभाग

तंत्रज्ञानाच्या मदतीने समस्या निवारणासाठीची साधन निर्मिती :

१. शिष्यवृत्ती परीक्षेस उपयुक्त प्रणालीची निर्मिती : इ. ५वी शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव होण्यासाठी व त्यातील संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी उपयुक्त अशा प्रणालीची निर्मिती ५वीच्या विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आली.

२. निगडी केंद्राच्या द्रुकश्राव्य कक्षांची मोबाईल द्वारा नोंदणी करणाऱ्या प्रणालीची निर्मिती : इ. ८वीच्या विद्यार्थ्यांनी शिकलेल्या कौशल्यांच्या आधारे आपल्याला जाणवणाऱ्या समस्येचे उत्तर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शोधावे यादृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्यात आले व त्याद्वारा त्यांनी निगडी केंद्राच्या द्रुकश्राव्य कक्षांची मोबाईल द्वारा नोंदणी करणाऱ्या प्रणालीची निर्मिती केली. त्याचा वापर भविष्यात निगडी केंद्रात सुरू करावा अशी योजना आहे.

## जम्मत घर

सुमारे १५० सदस्यांनी जम्मत घरातील विविध साधनांचा वर्षभरात लाभ घेतला. याशिवाय वर्षभरात सहा भित्तिचित्र कार्यशाळा घेण्यात आल्या. सुमारे ८० विद्यार्थी व पंधरा कला अध्यापकांनी चित्रकार आभा भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली सहा वर्गातील भिंतींवर सुंदर चित्रे काढली. या मोठ्या कॅनव्हास वर चित्र काढण्याचा अनुभव मुलांना खूप काही शिकवून गेला. मुख्य म्हणजे एका कलाकाराची कला जवळून अनुभवता आली. आणि याहून महत्त्वाचं म्हणजे 'मी माझ्या वर्गाची भिंत रंगवली', ही मुलांच्या दृष्टीने कदाचित आयुष्यभर लक्षात राहणारी ठेव असेल.

## जैव तंत्रज्ञान विभाग

या वर्षी जैव तंत्रज्ञान विभागांतर्गत Conservation of Medicinal Plant using Plant Tissue Culture ह्या कोर्सची सुरुवात करण्यात आली. यामध्ये आयुर्वेद व संशोधन महाविद्यालय, निगडीच्या चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. येत्या वर्षात आयुर्वेद विद्यालयाचा पदव्युत्तर विद्यार्थी व रामकृष्ण मोरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह सफेद मुसी, कडू पडवळ, अनंतमूळ, मंजिष्ठा, वावडिंग या वनस्पतीवर काम करण्यात येईल.

ज्ञान प्रबोधिनीच्या जैवतंत्रज्ञान विभागामार्फत डोंगराळ भागात (Institute Conservation) साळूंगण (ता. भोर) येथे बांबू व औषधी वनस्पती लागवड करण्यात येणार असून साळूंगण व शेजारील २५ गावातील लोकांना व महिला बचत गटांना बांबू व औषधी बनविण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## अटल टिंकरिंग लॅब

**मेकर फेअर :** देशभरातील विविध टिंकरिंग संस्था, व्यक्ती यांचा मेळावा म्हणजे मेकर फेअर. सन २०१७चा मेकर फेअर बंगलोर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात विद्यालयातील अरुंधती जाधव यांच्यासोबत तीन विद्यार्थिनी गेल्या होत्या. तिथे आयोजित विविध कृतिसत्रे, प्रदर्शन इत्यादींमध्ये विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला.

**अटल टिंकरिंग मॅरेथॉन :** नीती आयोगातर्फे ऑक्टोबर महिन्यात देशभरातील सर्व अटल टिंकरिंग लॅब-प्राप्त शाळांसाठी अटल टिंकरिंग मॅरेथॉन या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपापल्या परिसरातील विविध समस्या ओळखून त्यावर तंत्रज्ञानात्मक उत्तरे मांडणे, असे या स्पर्धेचे स्वरूप होते. यासाठी स्वच्छ ऊर्जा, सुपरिवहन, कृषि-तंत्रज्ञान, कचरा-व्यवस्थापन, जल-संसाधने व आरोग्य ही सहा विषय-क्षेत्रे होती. विद्यालयातील विद्यार्थ्यांतर्फे एकूण अठरा प्रकल्प या स्पर्धेसाठी पूर्ण करण्यात आले. त्यांचे शाळा पातळीवरील एक परीक्षण घेण्यात आले. परीक्षक म्हणून आदित्य पोंक्षे, मोहिनी धांदल व आरतीताई बिजुटकर यांनी काम पाहिले. त्यामधील, एकूण पाच विषय-क्षेत्रातील पाच प्रकल्प, अंतिम प्रवेशिका म्हणून नीती आयोगाकडे पाठविण्यात आले होते.

देशभरातील एकूण ३०,००० विद्यार्थ्यांनी १०,००० प्रकल्पांच्या माध्यमातून या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यात ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील दोन प्रकल्प राष्ट्रीय पातळीवर उत्कृष्ट १०० मध्ये निवडले गेले. या दोन्ही प्रकल्पांचे १०-१५ मिनिट कालावधीचे छायाचित्रण करून पुढच्या परीक्षणासाठी नीती आयोगाकडे पाठविण्यात आले. या उत्कृष्ट १०० पैकी पुन्हा उत्कृष्ट ३०ची निवड करण्यात आली. या उत्कृष्ट ३०मध्ये उपरोक्त दोन प्रकल्पांची पुन्हा निवड झाली. सदर प्रकल्प आरोग्य व जल-संसाधने या विषय-क्षेत्राशी संबंधित आहेत. सदरहू दोन्ही प्रकल्प गटात अनुक्रमे मल्हार लिंबेकर, वरुण कोल्हटकर, तन्मय वाल्हेकर आणि श्रावणी लिमये, श्रेया गायकवाड, जय आहेरकर यांनी काम केले होते. प्रकल्प करतांना अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

## युवक विभाग

मागील वर्षीची रचना कायम ठेवत या वर्षी नियमित येणाऱ्या सतरा जणांनी मिळून शालेय व महाविद्यालयीन गटातील सुमारे २०० विद्यार्थी-युवकांसाठी काम केले.

**गणेशोत्सव :-** गणशोत्सव प्रमुख म्हणून आदित्य काळभोर याने काम बघितले. अनुराग हिंगे याने निगडी केंद्राचा गणपती विसर्जन मिरवणूक प्रमुख म्हणून काम केले. महिन्याभराच्या या उपक्रमामध्ये एकूण ११५ युवक सहभागी झाले. ऐच्छिक बर्चीचा गट याही वर्षी उभा करण्यात आला. यात एकूण १२० विद्यार्थी सहभागी झाले. चापेकर दलाने मोहन नगर येथील जय भवानी विद्यालयात बर्ची प्रशिक्षण घेतले. संपूर्ण गटाने एकूण सात मिरवणुका व दोन प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेतला. युवकांनी या वर्षी देखील ३१ ठिकाणी गणपती प्राणप्रतिष्ठापनेची पूजा सांगितली.

**विशेष उपक्रम :**

१. **सायकल सहल :** फेब्रुवारी महिन्यात महाविद्यालयीन गटामधील २५० युवकांची अलिबाग येथे २५० किमी ची सायकल सहल झाली. यातील वीस युवकांनी पूर्णवेळ सायकल चालवली. दोन युवकांनी खोपोलीचा पूर्ण घाट सायकल वरून न उतरता चढला.
२. **साहस शिबिर :** भोर येथील मढे घाट येथे इ. ८वी व ९वी च्या ५५ विद्यार्थ्यांचे शिबिर झाले. विद्यार्थ्यांनी तंबूत राहण्याचा, धाडसी खेळ शिकण्याचा अनुभव घेतला. श्री. शिवराज पिंपुडे यांच्या अनुभव कथनाने शिबिराचा समारोप झाला.
३. **गिर्यारोहण :** इयत्ता ९वी मधील ४० विद्यार्थ्यांचे नंदगिरी व जरंडेश्वर तर ५० युवकांचे कमळगड येथे दुर्गभ्रमण झाले. पहिल्यांदाच चापेकर दलाच्या युवकांचे जीवधन-नाणेघाट येथे दुर्गभ्रमण झाले.

## युवती विभाग

**१. पश्चिम बंगाल दौरा –** दिनांक ३ ते १२ एप्रिल २०१७ रोजी १०वीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थिनींचा प. बंगाल येथे अभ्यास दौरा आयोजित केला होता. १०वीच्या अठरा विद्यार्थिनी या मध्ये सहभागी झाल्या होत्या. बंगाल मधील दक्षिणेश्वर काली मंदिर, बेलूर मठ या ठिकाणच्या भेटींमधून रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद यांच्या कार्याविषयी अधिक माहिती मिळाली. नेताजी भवन मध्ये नेताजीं सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनकार्याचे प्रदर्शन, रविंद्रनाथांच्या घरी उभे केलेले त्यांच्या जीवनविषयक संग्रहालय आणि विवेकानंदांचे घर बघून विद्यार्थिनींना त्यांच्या कार्याची प्रेरणादायक माहिती मिळाली. नेताजी, रवींद्रनाथ आणि विवेकानंद या तिघांच्या कार्याचा युवतींनी दौऱ्यापूर्वी अभ्यास केला होता आणि त्यांच्या घरांना भेटी देण्यापूर्वी त्यांनी विद्यार्थिनींसमोर त्याची मांडणी केली. याचा खूप चांगला परिणाम त्या भेटींवर झाला. प. बंगाल मधील Additional DCP अपराजिता रे या खास मुलींना भेटण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी मुलींना छोट्या छोट्या गोष्टींमधून, सोप्या पद्धतीने त्यांच्या काही केसेस चे अनुभव सांगत खूप महत्त्वाचे मार्गदर्शन केले. दौऱ्यामध्ये विद्यार्थिनींना 'एकला चलो रे' हे बंगाली गीत शिकविले.

**२. संगीत वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम – पद्यगायन कार्यक्रम – स्वर-चेतना :** यंदाचे वर्ष हे निगडी केंद्राचे 'संगीत वर्ष' होते. त्याचे औचित्य साधून युवतींचा पद्यगायनाचा कार्यक्रम दि. ४ फेब्रुवारी, २०१८ रोजी झाला. प्रबोधिनीची सगळी शिकवण ही वेगवेगळ्या पद्यांमधून आपल्यापर्यंत पोहचत असते. वर्षभर काम करताना लागणारी प्रेरणा ही या पद्यांमधून, कधी कधी तर एखाद्या पद्याच्या एखाद्या ओळीतूनही मिळत असते. ही प्रेरणा वाढण्याच्या उद्देशानेच हा कार्यक्रम करण्यात आला. यामध्ये ११वी -१२वीच्या पंधरा युवतींनी निरनिराळी अकरा पद्ये सादर केली. त्या निमित्ताने बऱ्याच नव्या – जुन्या युवतींना संपर्क झाला. वर्षभर दलावर येत असणाऱ्या सर्व युवतींच्या पालकांनाही या निमित्ताने आमंत्रण दिले होते.

**पालक महासंघ :**

१. **क्रीडास्पर्धा :** साधारण ६०० पालकांचा सहभाग असलेली पालक-शिक्षक क्रीडास्पर्धा नियोजनबध्द स्वरूपात घेण्यात आली.
२. **सायकल सहल :** नवीन पालकांना पुणे ते गोवा, कात्रज-सिंहगड पदभ्रमण अशा साहसी उपक्रमाद्वारे सामील करून घेतले.
३. **पालक कार्यशाळा :** यजुर्वेंद्र महाजन यांनी ''पाल्याच्या सामाजिक विकासातील आपली भूमिका'' व मा. वा. ना. अभ्यंकर (भाऊ) यांनी पालकांची मातृभूमी प्रती भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. २५० पालकांचा सहभाग असलेल्या दोन कार्यशाळा झाल्या. दीपस्तंभ संस्थेला आर्थिक साहाय्य केले. किशोरवयीन मुलांशी आनंददायी संवाद कसा साधावा यासाठी बहार जोपासताना कार्यशाळा संवादिनीमार्फत आयोजित केली होती. साधारण ३५ पालकांनी त्याचा लाभ घेतला.

ωωω


Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 53 31/08/2018 3:19:45 PM

# ३ ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र

## पूर्वप्राथमिक विभाग

निरागस व निर्मळ अशा ३॥ ते ५॥ वर्षांच्या विद्यार्थ्यांचा कारकविकास, पंचज्ञानेंद्रिय विकास, चांगल्या सवयी रुजविण्यासाठी रंजक उपक्रमांची रेलचेल शिशु विभागात असते.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला पालकांची सभा झाली. त्यात इतर विषयांसोबतच 'सुजाण पालकत्व' या विषयावर पालकांना मार्गदर्शन झाले. योगदिनानिमित्त शिशुंनी सोपी आसने केली. आषाढी एकादशी निमित्त पाऊल भजन, बालभारूड, धुनींचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. वीणा, टाळ, तबला, मृदुंग या वाद्यांची ओळख करून घेतली. जुलै-ऑगस्ट महिन्यात शिशु प्रज्ञा कसोटीच्या माध्यमातून एकाग्रता, आकलन, स्मरण, कारक कौशल्य इ. निरिक्षणांची नोंद करून लेखी अहवाल पालकांना देण्यात आला. राखी पौर्णिमेनिमित्त अन्य चार शाळांतील १७६ विद्यार्थ्यांना मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी राखी बांधली. गोकुळ अष्टमी निमित्त हिंदी, तेलुगु, कन्नड अशा विविध भाषेतील धुनी शिशुंनी ऐकल्या. तसेच लाह्या कशा तयार करतात, दुधाचे दही कसे होते याचे प्रात्यक्षिक अनुभवले. पिंपळपानांची पिपाणी करून येणाऱ्या आवाजाचा आनंद घेतला. गणेशोत्सवात विद्यार्थ्यांनी शाडूचे गणपती बनवले. ११ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०१७ या कालावधीत भाषाविषयांतर्गत 'शब्दसंग्रह वाढ' हा प्रकल्प विविध खेळातून संपन्न झाला. त्यामुळे शिशुंचा शब्दसंग्रह वाढण्यास मदत झाली. दिवाळीत शिशुंनी ठसे कामाचे शुभेच्छाकार्ड तयार केले. डिसेंबर महिन्यात सहली झाल्या. विवेकानंद जयंतीनिमित्त मोठ्या गटातील ८० शिशुंनी विवेकानंदांवरील नाटुकलीचे पाठांतर केले व स्नेहमेळाव्यात त्याचे सादरीकरण झाले. विज्ञान दिनानिमित्त मोठ्या गटातील ६० मुलांनी छोट्या गटातील मुलांना छोटे छोटे प्रयोग करून दाखवले. तसेच विज्ञान खेळ, विज्ञान केंद्र, तारांगण पाहण्याचा आनंद घेतला. मार्च महिन्यात मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी कापसापासून टॉवेल कसा बनतो? याची प्रक्रिया पाहिली. छोट्या गटातील मुलांनी विविध व्यावसायिकांच्या कामाचे निरीक्षण केले. दि. २९ व ३० मार्चला पालकांचा (संमेलनाचे बदलते स्वरूप) स्नेहमेळावा संपन्न झाला. यात नृत्य, नाट्य, पाठांतर इ. चे सादरीकरण झाले. तसेच भाषा, गणित व इंद्रिय विकास या विषयांवर विविध खेळांची योजना झाली. या कार्यक्रमात पालकवर्गासह आजी-आजोबाही उत्साहाने सहभागी झाले होते.

## प्राथमिक विभाग

शिक्षणाची गोडी लावणे, मूल्य रुजविणे व मूलभूत कौशल्ये विकसित करणे असा प्राथमिक शाळेत प्रयत्न केला जातो.

शिक्षक प्रेरणासंपन्न व्हावेत व शिक्षणातील नवविचार कळावे यासाठी ८ ते १० जून दरम्यान भावनाकोष समृद्ध करणारे शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या अंतररंगाची जडणघडण या विषयावर वाचन, चर्चा, व्याख्यान झाले.

विद्यार्थ्यांच्या अनुभव समृद्धीसाठी सहली, सहाध्याय दिन व क्षेत्रभेट इ. योजना केली होती. इ. ४थीच्या विद्यार्थ्यांनी सहाध्याय दिनी विविध किल्ल्यांचा अभ्यास केला तर ३रीच्या मुलांनी स्वयंपाकासाठी वापरले जाणारे ऊर्जा स्रोत याची माहिती घेतली. क्षेत्रभेटीमध्ये ४थीतील विद्यार्थी शेतीची प्रक्रिया समजून घेण्यासाठी श्री. चिकलंडे यांच्या शेतावर गेले. गव्हाच्या लोंब्या, ज्वारीची कणसं, मोहरीच्या शेंगा, द्राक्षाची वेल इ. मुलांना प्रत्यक्षात पाहायला मिळाले. शहरी मुलांना ही पर्वणीच ठरली. ३रीच्या विद्यार्थ्यांनी सिद्धेश्वर साखर कारखान्यात जाऊन साखर निर्मिती प्रक्रिया समजाऊन घेतली.

भाषिक कौशल्य विकासाअंतर्गत विद्यार्थ्यांचा 'शब्द संग्रह वाढवणे' हा प्रकल्प यशस्वीरित्या संपन्न झाला. १५ नोव्हे. ते २० डिसें. दरम्यान २०-२० विद्यार्थ्यांचे गट करून पाच भाषिक खेळ घेण्यात आले. विद्यार्थ्यांना नवनवीन शब्द व त्याचे उपयोजन लक्षात आले व त्यांची शब्दसंपत्ती वाढली.

समाज संवेदना वाढवण्यासाठी अंध विद्यार्थ्यांची भेट घडवून त्यांचा दिनक्रम कसा असतो?, त्यांनी आपल्या व्यंगावर मात कशी केली आहे?, समाजाकडून त्यांना कोणत्या गोष्टीची अपेक्षा असते? या सर्व गोष्टी मुलांच्या लक्षात आल्या. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्राथमिक शिक्षक प्रयत्नशील आहेत.

## माध्यमिक विभाग

किशोर वयातील विद्यार्थ्यांना जिज्ञासा पूर्तीसाठी संशोधन करण्याची सवय लावणे, समाजाबद्दल आस्था निर्माण करणे व देशाभिमान निर्माण करण्यासाठी अनेक उपक्रमांची योजना माध्यमिक विभागात केली जाते.

जागतिक योग दिनानिमित्त २१ जून रोजी इ. ५वी ते १०वीतील ५०० विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार व योगासने केली. ११ जुलैला बालविकास मंदिराचा ७२वा वर्धापनदिन साजरा झाला. यात १६८ विद्यार्थ्यांनी विविध पारितोषिके मिळवली. ४ सप्टें. रोजी जुना अक्कलकोट नाका ते वालचंद कॉलेजपर्यंत श्रीगणेश विसर्जन मिरवणुकीत बर्ची, लेझीम, रिंगनृत्य, काष्ठसंचलन, झांजनृत्य अशी विविध पथके होती. श्रीगणेशोत्सव काळात विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर, निबंध लेखन, अभिवाचन इ. कार्यशाळा संपन्न झाल्या. तसेच इ. ८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी इलेक्ट्रॉनिक्स कार्यशाळा झाली. जून-जुलै दरम्यान आषाढी एकादशीनिमित्त समाजदर्शन उपक्रम झाला. इ. १०वीच्या वर्गासाठी मातृभूमी परिचय सहली झाल्या.



Varshik Vrutta 2017-18 final Prabodh.indd 54 31/08/2018 3:19:46 PM

